मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.
https://www.vruttamanas.in/
# वृत्तमानस
Email : vrittamanas1@gmail. com
मुंबई/ पालघर | मंगळवार, ०५ नोव्हेंबर २०२४ | वर्ष- २९ | अंक - १३५ | पाने- ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये

## पोलीस महासंचालक रश्मी शुक्लांची बदली



**नवी दिल्ली :** महाविकास आघाडी सरकारच्या काळात फोन टॅप केल्याचे आरोप रश्मी शुक्ला यांच्यावर आहेत. सातत्याने विरोधकांकडून रश्मी शुक्ला यांच्या बदलीची मागणी केली जात होती. असं असतानाच केंद्रीय निवडणूक आयोगाकडून रश्मी शुक्ला यांची बदली करण्यात आली आहे. काँग्रेस नेते नाना पटोलेंनी यांनी रश्मी शुक्ला यांची बदली करण्यात यावी, अशी मागणी केली होती. यानंतर आता केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानंतर रश्मी शुक्ला यांची राज्याच्या पोलीस महासंचालक पदावरुन बदली करण्यात आली आहे. रश्मी शुक्ला यांच्यावर विरोधकांचे फोन टॅप केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणामुळे त्या वारंवार वादाच्या भोवऱ्यात सापडल्या होत्या.



## जम्मू-काश्मीर विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनात गदारोळ

पान ४

## महत्त्वाचे

### घड्याळ पवारांचे आणि शिवसेना बाळासाहेबांचीच...



**डोंबिवली :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरेंनी डोंबिलीमध्ये जाहीर सभा घेत प्रचाराचा नारळ फोडला. या सभेत महाराष्ट्रातील पक्ष फोडाफोडीच्या राजकारणावर राज ठाकरेंनी जोरदार टीका केली. ही टीका करत असताना मूळ शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कोणाचा? हे राज ठाकरेंनी सांगितले. राज ठाकरे म्हणाले, शिवसेना आणि धनुष्यबाण चिन्ह ही एकनाथ शिंदेंची, उद्धव ठाकरेंची प्रॅपर्टी नाही. ती बाळासाहेबांची प्रॅपर्टी आहे. त्याच्यावर तुम्ही कसला दावा सांगताय?

सविस्तर वृत्त पान 5 वर

### आग्रा येथे हवाई दलाचे मिग-29 विमान कोसळले

**आग्रा :** आज आग्रा येथे हवाई दलाचे मिग-29 विमान कोसळले. टेक ऑफ करत असताना विमानाला आग लागली. क्षणार्धात विमान आगीचा गोळा बनून मैदानात कोसळले. विमान जमिनीवर पडताच स्फोटही होऊ लागले. अपघाताच्या वेळी विमानात दोन पायलट होते. आग लागण्याच्या अवघ्या काही सेकंद आधी दोघांनी पॅराशूटच्या साहाय्याने विमानातून उडी मारली. कागरौल येथील सोंगा गावाजवळील रिकाम्या शेतात विमान पडले आहे. हवाई दलाने विमान अपघाताच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. या फायटर प्लेनने पंजाबच्या मॅन-ईटर येथून उड्डाण घेतल्याचे सांगितले जात आहे. अपघातानंतर ग्रामस्थांनी तत्काळ पोलिस आणि अग्निशमन दलाला माहिती दिली. अग्निशमन दल घटनास्थळी पोहोचले आहे. यानंतर हवाई दलाचे अधिकारी, डीएम आणि पोलिस घटनास्थळी आहेत. विमान ज्या ठिकाणी कोसळले त्या ठिकाणी आजूबाजूचे गावकरी जमले आहेत. हे विमान पंजाबमधील आदमपूरहून आग्रा येथे नियमित सरावासाठी जात होते. या अपघाताच्या कोर्ट ऑफ इन्क्वायरीचे आदेश देण्यात आले आहेत.

### दिलीप भोईर यांची भाजपातून हकालपट्टी

**अलिबाग :** पक्षविरोधी कारवाया केल्याचा ठपका ठेवून भाजपचे बंडखोर उमेदवार दिलीप भोईर यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली. जिल्हाध्यक्ष खासदार धैर्यशील पाटील यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यावेळी भाजपचे जिल्हा संघटक सतीश धारक, जिल्हा सरचिटणीस महेश मोहिते, गिरीश तुळपुळे यांच्यासह भाजपचे प्रमुख पदाधकारी उपस्थित होते. दिलीप भोईर यांनी अलिबाग विधानसभा मतदारसंघातून बंडखोरी करत उमेदवारी अर्ज दाखल केला होता. पक्षश्रेष्ठींकडून त्यांना उमेदवारी अर्ज मागे घेण्याचे निर्देश देण्यात आले होते. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. मात्र पक्षादेश डावलून त्यांनी उमेदवारी अर्ज कायम ठेवला. त्यामुळे भोईर यांची पक्षातून सहा वर्षांसाठी हकालपट्टी करण्यात येत असल्याचे खासदार धैर्यशील पाटील यांनी जाहीर केले.

## बंडोबांच्या हट्टामुळे मविआ, महायुतीपुढे पेच

# अनेक मतदारसंघांत 'दोस्ती में कुस्ती'

प्रतिनिधी
मुंबई

**उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी अधिकृत उमेदवारांसमोर घटक पक्षांनीच आव्हान निर्माण केल्यानं अनेक मतदारसंघात 'दोस्तीत कुस्ती' होणार आहे. महायुती आणि मविआ दोघंही आपली सत्ता येणार असा दावा करत असताना अनेक ठिकाणी मैत्रीपूर्ण लढती पाहायला मिळत आहे. मविआ आणि महायुती यांच्यातील बंडोबांनी मित्र पक्षविरुद्ध दंड थोपटल्याने अनेक ठिकाणी 'दोस्ती मे कुस्ती' असे चित्र विधानसभा निवडणुकीत दिसणार आहे.**



विधानसभा निवडणुकीसाठी मैत्रीच्या आणाभाका घेणारे राजकीय पक्ष आपल्याच दोस्तांशी अनेक मतदारसंघात कुस्ती खेळतायेत असं चित्र निर्माण झालं आहे. मैत्रीपूर्ण लढती होणारच नाहीत असा दावा करणारे उमेदवारी अर्ज माघारी घेण्याच्या शेवटच्या दिवशी एकमेकांशी भिडणार असल्याचं स्पष्ट झालं आहे. महायुती आणि महाविकास आघाडीत अनेक मतदारसंघात दोस्तीत कुस्ती लागल्याचं समोर आलं आहे.

यापूर्वी दोस्तीत कुस्ती होणारच नाही असं दोन्ही राजकीय आघाड्यांचे नेते म्हणाले होते. पण महायुती आणि आघाडीला एकमेकांसोबत लढत असतानाच आपापसातही लढावं लागत आहे. त्यामुळे मैत्रिपूर्ण लढती कुणाच्या फायद्याच्या ठरणार आणि कुणाचं नुकसान करणार? यासाठी 23 नोव्हेंबरपर्यंत वाट पाहावी लागणार आहे.

### दोस्तीत कुस्ती होणारे मतदारसंघ

- मानखुर्द-शिवाजीनगर मतदारसंघात अजित पवारांच्या राष्ट्रवादीनं नवाब मलिक उमेदवार आहेत. तर शिंदेंच्या शिवसेनेनं सुरेश पाटील यांना उमेदवारी दिलीय.
- अणुशक्तीनगर विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादीकडून नवाब मलिक यांची मुलगी सना मलिक विरुद्ध शिवसेनेचे अविनाश राणे मैदानात आहेत.
- देवळाली मतदारसंघात राष्ट्रवादीनं सरोज अहिरे उमेदवार आहेत. शिवसेनेकडून राजश्री अहिरराव यांना उमेदवारी.
- मोर्शीत भाजपचे चंदू यावलकर विरुद्ध राष्ट्रवादीचे देवेंद्र भुयार.
- आष्टी विधानसभा मतदारसंघात भाजपकडून सुरेश धस तर अपक्ष उमेदवार बाळासाहेब आजबे यांच्यात लढत.
- पुण्यातील पुरंदर विधानसभा मतदारसंघात शिवसेनेच्या विजय शिवतारेविरोधात अजित पवारांचे संभाजी झेंडे .
- सांगोल्यात उद्धव ठाकरे शिवसेनेचे दीपक साळुंखे आणि शेकापचे बाबासाहेब देशमुख यांच्यात लढत.
- नांदेड जिल्ह्यातील मुखेड मतदारसंघात भाजपच्या तुषार राठोड यांच्याविरोधात बालाजी खतगावकर हे अपक्ष उमेदवार रिंगणात आहेत.

## तुल्यबळ उमेदवार भेटला नाही म्हणून बकरी गळ्यात मारली...

- सुनील राऊत यांच्या विधानाने वातावरण तापले

प्रतिनिधी
मुंबई


उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे उमेदवार सुनील राऊत यांनी एका कार्यक्रमांमध्ये केलेल्या विधानाने विक्रोळीत वातावरण तापले आहे. राऊत यांचा व्हिडिओ व्हायरल होताच, शिंदे गटाच्या उमेदवार सुवर्णा करंजे यांनी थेट राऊत यांच्या विरोधात विक्रोळी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.



राऊत यांनी एका कार्यक्रमात केलेल्या वक्तव्यात "माझ्यासमोर उभे करण्यासाठी कुणी तुल्यबळ मिळाले नाही. टक्कर बरोबरीने व्हायला हवी. कुणीही माझ्यासमोर टिकले नाही. आता कुणाला तरी बकरा बनवायचा होता तर या बकरीला माझ्या गळयात टाकले. २० तारखेला आपण ती बकरी कापून टाकू असे विधान त्यांनी केले आहे. याचा व्हिडिओ सोमवारी व्हायरल होताच, करंजे यांनी पोलिसांत धाव घेतली आहे.

विक्रोळी विधानसभा मधून शिंदे गटाच्या सुवर्णा करंजे आणि मनसेतून विश्वजीत ढोलम निवडणुकीच्या रिंगणात आहे. करंजे यांच्या म्हणण्यानुसार, हे महिलांचे खच्चीकरण करणार वक्तव्य आहे. पूर्वी बाळासाहेबांच्या काळात महिलांच्या संदर्भात असे उच्चार काढण्याची कोणाची हिम्मत नव्हती. परंतु आता मात्र सर्रासपणे अशा पद्धतीने महिलांना हिणवले जात आहे. त्यामुळे आता सरकारने याची दखल घ्यावी असे त्यांनी सांगितले. याप्रकरणी विक्रोळी पोलीस ठाण्यात तक्रार दिली असून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे.

## अमेरिकेने भारताला धोका देताच रशियाने केला मदतीचा हात पुढे



- तेजससाठी इंजिन पुरवठा करण्यास अमेरिकेची टाळाटाळ
- रशियाची आपले हायटेक सुखोई ७५ भारतात तयार करण्याची ऑफर

वृत्तसंस्था
मॉस्को

अमेरिकेने तेजस लढाऊ विमानासाठी लागणाऱ्या इंजिनबाबत भारताला पुन्हा एकदा मोठा धक्का दिला आहे. अमेरिकेच्या GE एरोस्पेस या कंपनीने आता भारताच्या स्वदेशी तेजस Mk1A फायटर जेटसाठी लागणाऱ्या इंजिनचा पुरवठा २०२५ पर्यंत पुढे ढकलला आहे. यामुळे भारतीय हवाई दलाच्या आधुनिकीकरणाला मोठा धक्का बसला आहे. एकीकडे भारतीय मिग-२१ विमाने निवृत्त होत असताना आणि दुसरीकडे चीनपासून पाकिस्तानपर्यंत मोठ्या प्रमाणावर आधुनिक लढाऊ विमाने त्यांच्या हवाई दलात समाविष्ट करत असताना भारताची अडचण वाढली आहे. अमेरिकेने भारताला धोका दिला असताना आता मित्र रशियाने भारताला आपल्या नवीन आणि अत्याधुनिक सुखोई विमानांसाठी मोठी ऑफर दिली आहे.



रशियाने भारताला त्यांचे सर्वात आधुनिक सुखोई-७५ 'चेकमेट' आणि सुखोई-३५ संदर्भात ही मोठी ऑफर दिली आहे. रशियाने सुखोई ७५ हे लढाऊ विमान भारतात तयार करण्याची ऑफर दिली आहे. रशिया हा भारताचा सर्वात मोठा शस्त्रास्त्र निर्यातक देश आहे आणि तो गमावू इच्छित नाही. दुसरीकडे, भारताने आपले F-35 लढाऊ विमान खरेदी करावे, अशी अमेरिकेची इच्छा आहे, परंतु तेजस वादानंतर आता त्यांच्या आशांना धक्का बसू शकतो.

पान 8 वर

## मनोज जरांगेंची निवडणुकीतून माघार

- मित्र पक्षांची यादी न आल्याचे दिले कारण

प्रतिनिधी
जालना

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मुस्लिम आणि दलित समाजासोबत विधानसभा निवडणुकीला सामोरे जाण्याची घोषणा केली होती. मात्र, उमेदवारी अर्ज वापस घेण्याच्या दिवशी सकाळपर्यंत उमेदवार देण्याबाबत मित्र पक्षांची यादी आली नसल्याने आपण कोणत्याच मतदारसंघात उमेदवार देणार नसल्याची घोषणा मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे. मराठा समाजाचे उमेदवार एका जातीवर निवडून येऊ शकत नाही त्यामुळे एका जातीवर लढणे शक्य नसल्याचे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी निवडणूक न लढवण्याचा निर्णय जाहीर केला.

याला पाडा, त्याला पाडा, अशी भूमिका देखील घेणार नसल्याचे मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले आहे. मात्र, मराठा समाजाचे आंदोलन सुरूच राहणार असल्याचे जरांगे पाटील यांनी म्हटले आहे. निवडणूक झाल्यानंतर पुन्हा एकदा मराठा आंदोलन सुरू करणार असल्याचा इशारा देखील त्यांनी सरकारला दिला. मतदारसंघ निश्चित झाले होते. उमेदवारांची नावे देखील निश्चित झाली होती.

पान 8 वर



> जे उमेदवार मराठा समाजाच्या मागण्या मान्य करून देतील. त्या पूर्ण करतील असं जे लिहून देतील त्यांनाच मराठा समाज निवडून देणार.
> - मनोज जरांगे

## जरांगे यांनी उमेदवार दिले असते तर भाजपला फायदा झाला असता



### पवारांकडून निर्णयाचे स्वागत

प्रतिनिधी
मुंबई

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक 20 नोव्हेंबर रोजी होणार आहे. यासाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत आता संपली आहे. त्यामुळे विधानसभेच्या रणांगणाला सुरुवात झाली आहे. पुढचे 12 दिवस महाराष्ट्राचे राजकारण चांगलेच तापलेले दिसणार आहे. मराठा समाज निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याची घोषणा मनोज जरांगे यांनी केली होती. मनोज जरांगे यांच्यावर शरद पवारांचा वरदसहस्त असल्याची टीका भाजप नेत्यांकडून केली जात होती. दरम्यान मराठा समाज निवडणुकीच्या रिंगणात उतरणार नसल्याचे मनोज जरांगे यांनी सष्ट केले आहे. यानंतर शरद पवार काय बोलतायत? याकडे साऱ्यांचे लक्ष लागले होते. आता शरद पवार यांनी यावर आपली प्रतिक्रिया दिली आहे.

मनोज जरांगे यांनी आपले उमेदवार मागे घेण्याचा निर्णय घेतला. मला आनंद आहे. त्यांनी हा निर्णय घेतला, असे शरद पवार म्हणाले. भाजप हाच आमचा विरोधक आहे, असे जरांगे सातत्याने म्हणत आले आहेत. उमेदवार दिले असते

## माझ्या निवृत्तीनंतर न्यायालय सुरक्षित हातात

नवी दिल्ली

भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती डीवाय चंद्रचूड म्हणाले- न्यायमूर्ती संजीव खन्ना हे अतिशय शांत व्यक्ती आहेत. गंभीर आणि वादग्रस्त प्रकरणांमध्येही हसू शकता. माझ्या निवृत्तीनंतर न्यायालय सुरक्षित हातात आहे. मीडिया हाऊसमध्ये एका कार्यक्रमात पोहोचलेले सीजेआय चंद्रचूड म्हणाले की, राजकारणात परिपक्वता असली पाहिजे. न्यायाधीशांवर संशय घेणे म्हणजे व्यवस्थेला बदनाम करणे होय. CJI चंद्रचूड 10 नोव्हेंबर 2024 रोजी निवृत्त होणार आहेत.



## फणसाळकर यांच्याकडे पोलिस महासंचालकपदाचा अतिरिक्त कार्यभार

### रश्मी शुक्लांची निवडणूक आयोगाकडून बदली

प्रतिनिधी
मुंबई

निवडणूक आयोगाच्या आदेशांनंतर पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांची बदली करण्यात आल्यानंतर मुंबईचे पोलिस आयुक्त विवेक फणसाळकर यांच्याकडे पोलिस महासंचालकपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे. ते पुढील आदेश येईपर्यंत या पदाचा कारभार पाहतील.



निवडणूक आयोगाने सोमवारी सकाळी काँग्रेस व इतर पक्षांच्या तक्रारींवर कारवाई करत महाराष्ट्राच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांची तत्काळ प्रभावाने बदली करण्याचे आदेश दिले होते.

## सदा सरवणकरच आमचा महायुतीचा उमेदवार

### राणेंच्या भूमिकेमुळे राज ठाकरेंना धक्का



प्रतिनिधी
मुंबई

आमचा महायुतीचा उमेदवार सदा सरवणकर आहे. त्यासाठीच आम्ही काम करणार. आमची भूमिका स्पष्ट आहे, असे म्हणत भाजप नेते नारायण राणे यांनी त्यांची भूमिका स्पष्ट केली आहे. त्यामुळे माहीम विधानसभा मतदारसंघात राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे यांना मोठे आव्हान निर्माण झाले आहे. माहीम मतदारसंघात मनसेकडून अमित ठाकरे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. सदा सरवणकर हे शिंदे गटाचे उमेदवार आहेत. त्यामुळे इथे मनसे विरुद्ध शिंदे गट असा सामना होणार आहे.

अमित ठाकरे यांना उमेदवारी दिल्यानंतर महायुतीकडून सदा सरवणकर यांना त्यांची उमेदवारी मागे घेण्यासाठी दबाव निर्माण करण्यात आला होता. मात्र सदा सरवणकर हे त्यांच्या उमेदवारीवर ठाम राहिले. यामुळे राज ठाकरे यांना मोठे आव्हान शिंदे गटाकडून तसेच महायुतीकडून निर्माण झाले आहे. आम्ही सकाळी इकडे आणि संध्याकाळी तिकडे त्यातले नाहीत, आमचा जॉब पर्मनंट आहे, असा टोला देखील लगावला आहे.

उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अंतिम क्षणी सदा सरवणकर यांनी राज ठाकरे यांच्यासोबत भेटीची इच्छा व्यक्त केली. पण राज ठाकरे यांनी ती मागणी फेटाळली. तुम्हाला निवडणूक लढवायची असेल तर लढा नाहीतर नका लढू. आम्हाला काही देणघेणं नाही, असे म्हणत राज ठाकरे यांनी सदा सरवणकर यांच्या भेटीची मागणी फेटाळली.

### मनसे विरुद्ध शिंदे शिवसेना

*माहीम विधानसभा निवडणुकीत मनसे विरुद्ध शिवसेना शिंदे गट असे चित्र तयार असतानाच आता नारायण राणे यांनी देखील त्यांचा पाठिंबा हा सदा सरवणकर यांनाच असल्याचे स्पष्ट केल्याने महायुती आणि मनसेमध्ये देखील दुरावा निर्माण झाला आहे. याचा फटका मनसेला बसण्याची शक्यता आहे.*

## वळणावर नियंत्रण सुटले अन् 150 फूट खोल दरीत कोसळली बस



# उत्तराखंडमध्ये बस अपघात 36 ठार, 6 गंभीर जखमी

वृत्तसंस्था
अल्मोडा

उत्तराखंडमधील अल्मोडा येथे सोमवारी सकाळी 8 वाजता एक प्रवासी बस 150 फूट खोल दरीत कोसळली. या अपघातात 36 जणांचा मृत्यू झाला, तर 6 जण गंभीर जखमी झाले.

अल्मोडा येथील कुपीजवळ हा अपघात झाला. बसमध्ये 42 प्रवासी होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृतांचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे. अपघाताचे कारण समजू शकलेले नाही. वळणावर बसचे नियंत्रण सुटले आणि ती खाली कोसळली.

कुमाऊं विभागाचे आयुक्त दीपक रावत म्हणाले, 'बस नदीच्या 10 फूट आधी झाडात अडकल्याने थांबली. खड्ड्यात पडताना धक्का लागल्याने अनेक प्रवासी खिडक्याबाहेर पडले. बस किनाथहून रामनगरकडे जात होती.

बसमध्ये बहुतांश स्थानिक लोक प्रवास करत होते. दिवाळीच्या सुट्टीनंतरचा सोमवार हा पहिला कामाचा दिवस होता. त्यामुळे बस पूर्ण भरली होती. जास्तीत जास्त स्थानिक लोक प्रवास करत होते. ही बस गढवाल मोटर्स ओनर्स युनियन लिमिटेडची असल्याचे पोलिसांनी सांगितले. बसची अवस्था अत्यंत बिकट असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी 4 लाख रुपये आणि जखमींना प्रत्येकी 1 लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. आयुक्तांनी कुमाऊं विभागाला या घटनेची दंडाधिकारी चौकशी करण्याचे निर्देश दिले. पौरी आणि अल्मोडा येथील एआरटीओला निलंबित करण्यात आले आहे.

वृत्तमानस
पालघर, मुंबई
मुंबई, मंगळवार, ०५ नोव्हेंबर २०२४

## एक आगळी वेगळी दिवाळी स्मशानभूमितील कर्मचारी बांधवा समवेत

**मुंबई :** यंदाचे 9 व्या वर्षी कोकण कट्टा मार्फत अंधेरी पार्ले येथील पारशिवाडा स्मशानभूमीत काम करणाऱ्या कर्मचारी वर्गातील सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. तेव्हा कोकण कट्टाचे समस्त सदस्य उपस्थित होते. कोकण कट्टाचे अध्यक्ष नितीन कुलकर्णी यांच्या सौजन्याने कर्मचाऱ्यांना फराळ व भेटवस्तू देण्यात आल्या. यावेळी कोकण कट्टा संस्थापक अजित पितळे, सुजित कदम, विवेक वैद्य, दयानंद मांडवकर, प्रसाद वालावलकर , प्रथमेश पवार, प्रभाकर खेडेकर, मधुकर हेगडे आदी सदस्य उपस्थित होते. दशक्रिया करणारे ज्येष्ठ मोडक गुरुजी मनपा कर्मचारी निलेश तेंडुलकर, व कांबळे, कर्मचारी शिवकुमार आणि सदस्यांनी यां भेटीचा आनंद व्यक्त केला



## थोडक्यात

### बुधवारी सफाई कामगारांचा मेळावा

**मुंबई:** म्युनिसिपल मजदूर युनियन, मुंबई (संलग्नः हिंद मजदूर सभा) यांच्या वतीने मुंबई महानगरपालिकेतील संपूर्ण साफसफाई तसेच रुग्णालये खात्यामध्ये काम करणारे उपाध्यक्ष, संघटक, कार्यकारिणी सदस्य, मुकादम आणि सफाई कामगार यांचा मेळावा बुधवारी, ६ नोव्हेंबर, २०२४ रोजी सायकाळी ४.०० वा.
कै. गोपाळ शेट्टीगार सभागृह, बाळ दंडवते स्मृति, २३७-२३९, ना.म. जोशी मार्ग, येथे आयोजित करण्यात आला आहे.
या मेळाव्यात कामगारांच्या विविध प्रश्नावर भूमिका घेण्यात येणार आहे.अँड. महाबळ शेट्टी (प्रमुख सल्लागार) अशोक जाधव (अध्यक्ष) हे कामगारांना मार्गदर्शन करणार आहेत.
या मेळाव्याला कामगारांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन वामन कविस्कर (सरचिटणीस) यशवंतराव देसाई (कार्याध्यक्ष) शरद राघव (कोषाध्यक्ष) यांनी केले आहे.

### गोरेगाव येथे वाहनातून सहा लाखांची रक्कम जप्त

**मुंबई:** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक -२०२४ च्या अनुषंगाने तपासणी करताना १६३- गोरेगाव विधानसभा मतदारसंघातील आचारसंहिता भरारी पथक क्र. ८ मधील अधिका-यांना जैन मंदिर, एस. व्ही. रोड गोरेगाव (प) येथे वाहन तपासणी दरम्यान एका वाहनात 6,11,820/- इतकी रोख रक्कम सापडली. आचारसंहिता कालावधीमध्ये नियमानुसार विहित रकमेपेक्षा अधिक रोख रक्कम बाळगल्याबद्दल गोरेगाव पोलिस ठाणे येथे रीतसर पंचनामा करून नोटांच्या तपशीलासह जप्त रक्कम जमा करण्यात आली. यासंदर्भात पथकातील अधिकारी पुढील कार्यवाही करत आहेत.

### आचारसंहिता भंगाच्या 2452 तक्रारी निकाली; 253 कोटी जप्त

**मुंबई:** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक – २०२४ साठी १५ ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबर २०२४ पर्यंत राज्यभरात सी-व्हिजिल (C-Vigil app) ॲपवर एकूण 2469 तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी 2452 तक्रारी निवडणूक आयोगाकडून निकाली काढण्यात आल्या आहेत, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे. नागरिकांना आचारसंहिता पालनासाठी सहकार्य करणारे सी-व्हिजिल ॲप हे कोणत्याही ॲपस्टोअरमधून डाऊनलोड करता येते. या ॲपद्वारे नागरिकांना आचारसंहिता भंगाबाबत तक्रार करता येते. तक्रार दाखल झाल्यानंतर संबंधित पथकाद्वारे चौकशी करुन योग्य ती कारवाई करण्यात येते. राज्य व केंद्र सरकारच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांद्वारे करण्यात आलेल्या कारवाईत बेकायदा पैसे, दारू, ड्रग्ज व मौल्यवान धातू इत्यादी बाबतीत एकूण 253 कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

# वसईत निवडणुकीचा ज्वर चढला; उमेदवार आजपासून रस्त्यावर

**प्रतिनिधी**
■ **वसई**

पालघर जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघांमध्ये उमेदवार ठरले असून सोमवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख संपल्यानंतर आता प्रचाराला जोर येणार आहे. सोशल मीडियावर चाललेली प्रचार मोहीम संपुष्टात येत असून, उमेदवार आता रस्त्यावर उतरून प्रत्यक्ष जनसंपर्कात व्यस्त होणार आहेत.

वसई, नालासोपाराआणि बोईसर या प्रमुख मतदारसंघांमध्ये आजपासून प्रचाराचा तडाका लागणार आहे. स्थानिक नेत्यांपासून ते बड्या राजकीय नेत्यांपर्यंत सर्वच प्रचारात सहभागी होणार असल्यामुळे प्रचाराची तीव्रता वाढणार आहे.

वसईत बहुजन विकास आघाडीचे आमदार हितेंद्र ठाकूर, महाविकास आघाडीचे विजय पाटील आणि महायुतीच्या स्नेहा दुबे-पंडित यांच्यात प्रमुख लढत रंगणार आहे. नालासोपाऱ्यात आमदार क्षितीज ठाकूर यांच्यासह महायुतीचे राजन नाईक, महाविकास आघाडीचे संदीप पांडे आणि अपक्ष उमेदवार धनंजय गावडे यांच्यात चौरंगी सामना होणार आहे. बोईसरमध्ये बहुजन विकास आघाडीचे आमदार राजेश पाटील यांना महायुतीचे विलास तरे आणि महाविकास आघाडीचे डॉ. विश्वास वळवी यांचे आव्हान असणार आहे.

या मतदारसंघांमध्ये प्रचाराचे ढोल वाजू लागल्याने वातावरणात उत्साह आणि चुरस निर्माण झाली आहे. गावागावांत, गल्लोगल्ली प्रचार फेरी आणि सभा होणार असून पोलीस बंदोबस्तही कडक ठेवण्यात आला आहे, जेणेकरून प्रचार शांततेत पार पडेल.

# विधानसभा निवडणुकीत बविआला न्यायालयाचा दिलासा

## शिट्टी चिन्हावरच बविआची लढाई

**प्रतिनिधी**
■ **वसई**

बहुजन विकास आघाडीला (बविआ) विधानसभा निवडणुकीसाठी मुंबई उच्च न्यायालयाचा मोठा दिलासा मिळाला आहे. केंद्रिय निवडणूक आयोगाने 'शिट्टी' हे चिन्ह जनता दल (युनायटेड) पक्षासाठी राखून ठेवण्याच्या निर्णयाला आव्हान देत बविआने मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. सुनावणीदरम्यान न्यायालयाने बविआच्या बाजूने निर्णय देत 'शिट्टी' हे निवडणूक चिन्ह वापरण्याची परवानगी दिली आहे, ज्यामुळे पक्षाला निवडणुकीत लढण्यासाठी मोठा आधार मिळाला आहे.

या प्रकरणाची सुरुवात केंद्रिय निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणुकीसाठी 'शिट्टी' हे चिन्ह जनता दल (युनायटेड) पक्षासाठी राखीव ठेवल्याने झाली. बविआसाठी हा निर्णय धक्कादायक ठरला असता, परंतु पक्षाने तत्काळ न्यायालयाचा दरवाजा ठोठावून याचिका दाखल केली. ही याचिका न्यायाधीश जितेंद्र जैन यांच्या समोर सुनावणीसाठी ठेवण्यात आली होती. न्यायालयाने याचिकेच्या महत्त्वाला लक्षात घेऊन प्रतिवादींना तपशील पाठवला आणि त्यावर तातडीने सुनावणी होण्याचे निर्देश दिले.

२ नोव्हेंबर रोजी झालेल्या सुनावणीत निवडणूक आयोगाच्या बाजूने कोणी उपस्थित राहू शकले नाही. त्यानंतर सोमवारी ४ नोव्हेंबरला उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख असल्याने आणि चिन्ह वाटपाची वेळ समीप असल्यामुळे न्यायालयाने तातडीने निर्णय देऊन बविआला 'शिट्टी' हे चिन्ह वापरण्याची परवानगी दिली.

न्यायालयाच्या या निर्णयामुळे बहुजन विकास आघाडीला विधानसभा निवडणुकीत 'शिट्टी' या त्यांच्या ओळखीच्या चिन्हावर लढण्याची मुभा मिळाली असून निवडणूक प्रचाराची दिशा आणि रणनीती यामुळे सुलभ झाली आहे.

# दिवाळीच्या सुट्ट्यांत वसईत अवैध बांधकामांचा धडाका

**प्रतिनिधी**
■ **वसई**

वसई तालुक्यातील वालीव, पेल्हार, आणि चंदनसार प्रभाग समिती हद्दीत दिवाळीनिमित्त सलग तीन दिवसांच्या सुट्ट्यांचा गैरफायदा घेत अवैध बांधकामांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. महानगरपालिकेच्या संबंधित विभागांच्या सुट्ट्या आणि आचारसंहितेमुळे कारवाईच्या आदेशात खंड पडल्याने बांधकामे थांबविण्यासाठी कोणतेही ठोस पाऊल उचलले गेले नसल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

दिवाळीच्या काळात अधिकाऱ्यांचे लक्ष उत्सव व इतर शासकीय कामकाजात गुंतल्याने अवैध बांधकाम करणाऱ्यांनी याचा फायदा उचलला . दरम्यान,अतिक्रमण विभागाला कारवाईसाठी आवश्यक आदेश मिळत नसल्याने ते निष्क्रीय झाल्याचा आरोप होत आहे. स्थानिक नागरीक आणि सामाजिक कार्यकर्ते यांनी या परिस्थितीवर संताप व्यक्त केला असून पालिकेच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.विधानसभा निवडणुकांमुळे लागू असलेल्या आचारसंहितेमुळे अतिक्रमण अधिकाऱ्यांना वरिष्ठांकडून कोणतेही स्पष्ट आदेश मिळत नाहीत. त्यामुळे या काळात अवैध बांधकामांवर कारवाई करणे कठीण झाले आहे.

### पालिका मात्र बघ्याची भूमिकेत

सियुसी विभागाला गंज पकडल्याचा आरोप होत आहे कारण काही महिन्यांपासून विभागाने कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही. यामुळे अवैध बांधकामे करणाऱ्यांचा आत्मविश्वास वाढला आहे आणि ते कोणत्याही भीतीविना अवैध बांधकामांत गुंतलेले आहेत.

वसईतील अनेक स्थानिक रहिवाशांनी या प्रकारावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. त्यांचे म्हणणे आहे की, या बांधकामामुळे परिसरातील नागरी सुविधा आणि संसाधनांवर अतिरिक्त ताण पडतो. तसेच अपूर्ण आणि अयोग्य रचना असलेल्या या इमारती, चाळी भविष्यात धोकादायक ठरू शकतात.

पालिकेने या प्रकरणी तातडीने कारवाई करून या अवैध बांधकामांना आळा घालण्याची आवश्यकता आहे. यामुळेच भविष्यात नागरी सुविधांची हानी आणि शहराच्या सौंदर्यावर झालेला आघात टाळता येईल.

# जनसेवा फाउंडेशन यांची दिवाळी निमित्त अनोखी भेट

**प्रतिनिधी**
■ **मोखाडा**

मोखाडा जन सेवा फाउंडेशन भारत यांच्या मार्फत दिवाळी निमित्त जांभूळवाडी,जव्हार येथे गरीब गरजू लोकांना कपडे वाटप करण्यात आले यावेळी जनसेवा फाउंडेशन चे अध्यक्ष सचिन पाटील,संपर्क प्रमुख राजेश भालींगे व पदाधिकारी उपस्थित होते.

दिवाळी ही समाजाच्या प्रत्येक घटकात खेड्या पाड्यातील लोकांन सोबत साजरी करावी या हेतूने जनसेवा फाउंडेशन यांनी एक पाऊल उचलून सर्व सामान्य जनतेच्या सेवे साठी व त्यांना एक छोटीसी मदत म्हणून गाव पाड्यात जाऊन समाज बांधवांना दिवाळी निमित्त कपड्याचे वाटप करण्यात आले यावेळी लहान मुलांचे कपडे ते मोठ्या माणसाचे स्त्री पुरुषाचे कपडे वाटप करण्यात आले यावेळी जमलेल्या लोकांन मध्ये त्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद होतो यावेळी जमलेल्या लोकांनी जनसेवा फाउंडेशन चे आभार मानले व अशीच मदत आपल्या हातून व्हावी व आपल्या संस्थेचे नाव खूप मोठे व्हावे अश्या शुभेच्छा दिल्या.



यावेळी जनसेवा फाउंडेशन भारत च्या पदाधिकाऱ्यांनी ही उपस्थित जनतेचे आभार मानले व ही एक छोटीसी भेट असल्याने यापुढे ही आपणास मोठ्या प्रमाणात भेट देऊन आपली दिवाळी साजरी करू असे जनसेवा फाउंडेशन च्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

# बंडखोर उमेदवार विनायक निकम यांची माघार; विजय पाटील यांच्या प्रचारात नवचैतन्य

**प्रतिनिधी**
■ **वसई**

वसई विधानसभा निवडणुकीत महत्त्वपूर्ण बदल घडवून आणत शिवसेनेचे बंडखोर उमेदवार विनायक निकम यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला आहे. या निर्णयामुळे महाविकास आघाडीला (मविआ) मोठा दिलासा मिळाला असून त्यांच्या अधिकृत उमेदवार विजय पाटील यांच्या प्रचारात उत्साह आणि नवचैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे.

निकम यांच्या अर्ज माघारीमुळे वसईतील राजकीय समीकरणांना नवीन वळण लागले असून मतदारांच्या मनोभूमिकेवर सकारात्मक परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. विजय पाटील यांची प्रचार मोहीम आता अधिक तीव्रतेने राबवली जाणार असून मविआचे स्थानिक नेते व कार्यकर्ते एकत्रित येऊन पाटील यांना पाठिंबा देण्यासाठी कंबर कसत आहेत.

निकम यांनी त्यांच्या निर्णयाच्या कारणांची थेट माहिती दिलेली नसली तरी हा पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांच्या सल्ल्यानुसार घेतलेला निर्णय असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीत विजय पाटील यांना प्रचंड पाठिंबा मिळण्याची शक्यता अधिक वाढली आहे. सद्यस्थितीत, वसईच्या राजकीय रंगमंचावर या घडामोडींचे पडसाद उमटत असून मतदारांमध्ये या बदलाचा कोणता परिणाम होईल हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

# रुपाली धुमाळ (पाटील) यांना 'जनसेवा संघर्ष कन्या' पुरस्कार

**प्रतिनिधी**
■ **वसई**

दिवाळीच्या उत्सवात जनसेवा फाऊंडेशनने आयोजित केलेल्या प्रेरणादायी पुरस्कार वितरण सोहळ्यात महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यातील रुपाली धुमाळ (पाटील) यांना 'जनसेवा संघर्ष कन्या पुरस्कार' हा सन्मान देऊन गौरवण्यात आले.

समाजात अनेक महिला आजच्या अत्याधुनिक युगात आपल्या कुटुंबाचे जबाबदारी सांभाळून विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करताना दिसतात. रूपाली धुमाळ यांनी उद्योग जगतात आपल्या कर्तृत्वाने एक वेगळी ओळख निर्माण करून महिलांना आर्थिक स्वावलंबनाच्या दिशेने प्रोत्साहित केले आहे.




रुपाली धुमाळ यांनी केवळ स्वतःच्या प्रगतीवर लक्ष केंद्रित न करता हजारो महिलांना उद्योग जगतात आर्थिक सक्षम बनविण्याचा वसा घेतला आहे. या कार्यामुळे त्या महिलांना स्वाभिमानाने व आत्मविश्वासाने उभे राहण्याची संधी मिळाली. त्यांच्या या योगदानामुळे समाजात महिलांच्या सशक्तीकरणाची चळवळ बळकट झाली आहे.

रुपाली धुमाळ यांचा हा सन्मान समाजातील इतर महिलांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. त्यांच्या कर्तृत्वाने महिलांना त्यांच्या स्वतःच्या क्षमतांचा शोध घेऊन आत्मनिर्भर होण्यासाठी एक दिशा दाखवली आहे.

***पुरस्कार सोहळा आणि गौरव***

*हा सन्मान मुंबई विद्यापीठाचे स्वेच्छा सेवानिवृत्त उच्च अधिकारी विकास वारीक, जनसेवा फाऊंडेशनचे अध्यक्ष विजय वैती आणि उपाध्यक्ष प्रिती वैती यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमात धुमाळ यांच्या प्रेरणादायी कामाचे आणि त्यांच्या प्रयत्नांचे कौतुक करण्यात आले. त्यांच्या व्यावसायिक आणि सामाजिक जीवनातील संघर्ष आणि अडचणींवर मात करत त्यांनी आपल्या कार्याची एक आदर्शमय छाप समाजात निर्माण केली आहे.*

# आठ उमेदवारांच्या माघारीमुळे होणार वसई व नालासोपारात राजकीय रणसंग्राम रंगतदार

## अर्ज माघारीने चित्र स्पष्ट

**प्रतिनिधी**
■ **वसई**

वसई आणि नालासोपारा विधानसभा मतदारसंघातील निवडणूक चित्र सोमवारी अर्ज माघारीमुळे अधिक स्पष्ट झाले. नालासोपारा मतदारसंघातून एकूण चार उमेदवारांनी तर वसईतून चार उमेदवारांनी आपल्या अर्जाची माघार घेतली, ज्यामुळे लढतीचा रंग खुला झाला आहे.

वसई विधानसभा मतदारसंघात एकूण ११ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. परंतु सोमवारी अर्ज माघार घेण्याच्या शेवटच्या दिवशी शिवसेना (उद्धव ठाकरे गट) बंडखोर उमेदवार विनायक निकम, माजी महापौर प्रविणा ठाकूर, एड. भावना अबंळकर आणि एड. राजकुमार दुबे यांनी माघार घेतली. त्यामुळे आता वसईतील निवडणूक सात उमेदवारांच्या रंगीत लढतीमध्ये रूपांतरित झाली आहे.दुसरीकडे नालासोपारा मतदारसंघात परेश घाटाळ, दिलीप गायकवाड, अमर कवळे आणि माजी महापौर प्रविणा ठाकूर यांनी माघार घेतल्याने उर्वरित १२ उमेदवारांच्या दरम्यान निर्णायक लढत होईल. वसईत बविआ ,माविआ आणि महायुतीच्या उमेदवारांत जोरदार मतसंघर्ष अपेक्षित आहे. त्यामुळे सर्वच पक्षांनी बंडोबांना थंड करण्यासाठी कंबर कसली होती. त्यामुळे अनेकांनी माघार घेतली आहे. या माघारीमुळे वसईत ठाकरे शिवसेनेला मात्र मोठा दिलासा लाभला आहे.


या निवडणुकांच्या प्रक्रिया संपूर्ण पारदर्शक ठेवण्यासाठी वसईत डॉ. संदीप चव्हाण आणि नालासोपारात प्रांताधिकारी शेखर घाडगे हे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहत आहेत.वसई आणि नालासोपारा मतदारसंघातील या उमेदवारांच्या माघारीने राजकीय समीकरणे बदलली असून निवडणुकीचे अंतिम चित्र स्पष्ट झाले आहे.

# मुंबईकरांचे पाणी विधानसभा निवडणुकीनंतर महागणार . . .

## राजकीय हस्तक्षेपामुळे दोन वर्षे रखडली होती 'पाणीपट्टी वाढ'

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

लोकसभा व विधानसभा निवडणुकीमुळे गेल्या दोन वर्षांपासून पाणीपट्टी वाढ सरकारने रोखून धरली होती. मात्र आता विधानसभा निवडणुकीनंतर मुंबईचे पाणी महागणार आहे. सुमारे ८ टक्केपर्यंत ही पाणीपट्टी वाढण्याची शक्यता असून याची अंमलबजावणी तातडीने करण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत आहे.





पाणीपट्टीत वाढ झाल्यानंतर घरगुती व व्यावसायिक पाणीपट्टीत किमान प्रति एक हजार लिटर मागे ५५ पैसे ते ६ रुपये पर्यंत वाढ होण्याची शक्यता आहे. त्याशिवाय नियमानुसार ७० टक्के मलनिःसारण शुल्क स्वतंत्र द्यावा लागणार आहे.जल अभियंता खात्याचा आस्थापना खर्च (कर्मचाऱ्यांचा पगार व अन्य भत्ते), प्रशासकीय खर्च, प्रचालन व परिरक्षण खर्च, विद्युत खर्च व शासनाच्या भातसा व अप्पर वैतरणा धरणातून उपसा केलेल्या पाण्याची पाणीपट्टी यांच्या एकत्रिक खर्चाचा आढावा घेतला असता खर्च वाढलेला दिसून आला. त्यामुळे गेल्या वर्षभरापासून मुंबई महापालिका पाणीपट्टी वाढ करण्यासाठी राज्य सरकारकडे परवानगी मागत आहे. परंतु निवडणुका लक्षात घेऊन, राज्य सरकारने पाणीपट्टी वाढीस महापालिकेला परवानगी दिली नाही. त्यामुळे पालिकेला किमान ३०० कोटी रुपयांच्या महसुलावर पाणी सोडावे लागले आहे.

प्रतिवर्षी ८ टक्केपर्यंत पाणीपट्टीत वाढ करण्याचा अधिकार स्थायी समितीने पालिका प्रशासनाला दिला आहे. त्यामुळे दरवर्षी १६ जूनपासून पाणीपट्टीत वाढ करण्यात येते. मात्र गेल्या दोन वर्षापासून राजकीय हस्तक्षेपामुळे रखडलेली पाणीपट्टी वाढ विधानसभा निवडणुकीनंतर करण्याचा निर्णय मुंबई महापालिकेने घेतला आहे.

**परिशिष्ट क्र. १६**
**(उपविधी क्र. ३५ अन्वये)**
**नोटीस**

श्री. मनोहर बाबू भेलसेकर, सदनिका क्र.१/१०५, परेल शिवसंदेश को - ऑपरटिव्ह हाऊसिंग सोसायटी, कस्तुरबा गांधीनगर, दैनिक शिवनेर मार्ग, अपो. महालक्ष्मी इंडस्ट्रियल इस्टेट, मुंबई नं. ४०००१८ असून यांनी ही सदनिका श्री. सुखचंद बिष्टुपदा अदक यांना विकली आहे. असे अदक यांचे म्हणणे आहे.
परेल शिवसंदेश को-ऑपरेटिव्ह सोसायटीतील श्री. मनोहर बाबू भेलसेकर यांचे हक्कदार दावेदार आक्षेप घेणाऱ्या कडून सोसायटीच्या भांडवलात मालमत्तेतील मृत सभासदांचे वक्त शेर आणि भांडवल हस्तांतरित करण्यासाठी दावा कोणाचा आक्षेप असल्यास ही नोटीस प्रकाशन झाल्यापासून सात दिवसाच्या आत परेल शिवसंदेश को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीशी संपर्क साधून लेखी आपले म्हणणे सादर करावे. उपरोक्त विहित कालावधीत कोणतेही दावे आक्षेप प्राप्त न झाल्यास सोसायटीच्या उप कायद्यांतर्गत प्रदान केल्याप्रमाणे सोसायटीच्या भांडवलात मालमत्तेतील मृत्यू सदस्यांचे शेअर आणि भांडवल हस्तांतरण करण्यासाठी सोसायटीस मुभा असेल. सदर आक्षेप, नोटीस सोसायटीच्या कार्यालयात सादर करावी ही विनंती.
दिनांक : ५/११/२०२४

सही/-
परेल शिवसंदेश को - ऑपरटिव्ह हाऊसिंग सोसायटी

**वसई विरार शहर महानगरपालिका**
**शुध्दीपत्रक**
जा.क्र. वविशम / बो./कर ३६६/२०२४-२५
दि. २२/१०/२०२४
वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती अ, बोळींज या कार्यालयात आमच्या वृत्तमानस च्या वृत्तपत्रात दिनांक २३ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या अंकात पान क्र. ०२ मध्ये वसई विरार शहर महानगरपालिका चौ जाहिरात जा.क्र./वविशम/बो./कर/३६६/२०२४-२५ दि. २२/१०/२०२४ च्या जाहिर नोटीस सुचना नजरचुकीने मालमत्ता क्रमांक BL ०६ / १९ / ६५ असे आहे. तरी जाहीर नोटीस सुचना मालमत्ता क्रमांक BL०६ / ११ / ६५ असे वाचण्यात यावे.
सही/-
सहा आयुक्त

**वसई विरार शहर महानगरपालिका**
**शुध्दीपत्रक**
जा.क्र. वविशम / बो./कर ३६६/२०२४-२५
दि. २२/१०/२०२४
वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती अ, बोळींज या कार्यालयात आमच्या वृत्तमानस च्या वृत्तपत्रात दिनांक २३ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या अंकात पान क्र. ०२ मध्ये वसई विरार शहर महानगरपालिका ची जाहिरात जा.क्र./वविशम/बो./कर/३६६/२०२४-२५ दि. २२/१०/२०२४ च्या जाहिर नोटीस सुचना नजरचुकीने मालमत्ता क्रमांक BL०७ / १२ / २५ असे आहे. तरी जाहीर नोटीस सुचना मालमत्ता क्रमांक BL०७/९२/१५असे वाचण्यात यावे.
सही/-
सहा आयुक्त

**वसई विरार शहर महानगरपालिका**
**शुध्दीपत्रक**
जा.क्र. वविशम / बो./कर ३६६/२०२४-२५
दि. २२/१०/२०२४
वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती अ, बोळींज या कार्यालयात आमच्या वृत्तमानस च्या वृत्तपत्रात दिनांक २३ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या अंकात पान क्र. ०२ मध्ये वसई विरार शहर महानगरपालिका ची जाहिरात जा. क्र. / वविशम/बो./कर/३६६/२०२४-२५ दि. २२/१०/२०२४ च्या जाहिर नोटीस सुचना नजरचुकीने मालमत्ता क्रमांक BL०७/३१५/६९ असे आहे. तरी जाहीर नोटीस सुचना मालमत्ता क्रमांक BL०७/३१५/६१ असे वाचण्यात यावे.
सही/-
सहा आयुक्त

**वसई विरार शहर महानगरपालिका**
**शुध्दीपत्रक**
जा.क्र. वविशम / बो./कर ३६६/२०२४-२५
दि. २२/१०/२०२४
वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती अ, बोळींज या कार्यालयात आमच्या वृत्तमानस च्या वृत्तपत्रात दिनांक २३ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या अंकात पान क्र. ०२ मध्ये वसई विरार शहर महानगरपालिका ची जाहिरात जा.क्र./वविशम/बो./कर/३६६/२०२४-२५ दि. २२/१०/२०२४ च्या जाहिर नोटीस सुचना नजरचुकीने रुम नं. ६०९ असे आहे. तरी जाहीर नोटीस सुचना रूम नं. ६०१ असे वाचण्यात यावे.
सही/-
सहा आयुक्त

**परिशिष्ट क्रमांक 16**
**(उपविधी क्रमांक 34 अन्वये )**
**नोटीस**

चेंबूर टिळक नगर संघमित्र को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि. सहकारी गृहनिर्माण संस्था टिळक नगर, चेंबूर, मुंबई : 400089,या संस्थेचे सभासद असलेल्या व संस्थेच्या इमारतीत / भूखंडावर सदनिका क्र. अ - 25, 5 वा मजला धारण करणाऱ्या श्री. रामभाऊ काळुजी हाटे,यांचे दि. 30/05/2004 रोजी निधन झाले. तसेच त्यांची पत्नी यांचे दि. 27/08/2003 रोजी निधन झाले आहे. त्यांनी नामनिर्देशन केलेले नाही. संस्था या नोटीशीद्वारे संस्थेच्या भांडवलात / मालमत्तेत असलेले मयत सभासदांचे भाग व हितसंबंध हस्तांतरित करण्यासंबंधी मयत सभासदांचे वारसदार किंवा अन्य मागणीदार / हक्कदार यांच्याकडून हक्क मागण्या / हरकती मागविण्यात येत आहेत. ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून 07 दिवसात त्यांनी आपल्या मागण्यांच्या व हरकतींच्या पृष्ठथं आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमूद केलेल्या मुदतीत कोणाही व्यक्तींकडून हक्क मागण्या किंवा हरकत सादर झाल्या नाही तर मयत सभासदाचे संस्थेच्या भांडवलातील / मालमत्तेतील भाग व हितसंबंध यांच्या हस्तांतरणाबाबत संस्थेच्या उपविधी नुसार कारवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर अशा कोणत्याही हक्क मागण्या / हरकत आल्या तर त्याबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कारवाई करण्यात येईल. नोंदी व उपविधीची एक प्रत मागणीदारास / हरकतदारास पाहण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात सचिव यांच्याकडे सकाळी 10 ते दुपारी 12 व संध्याकाळी 07 ते 09 पर्यंत नोटीस दिल्याच्या तारखेपासून नोटीशीची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध राहील. चेंबूर टिळक नगर संघमित्र को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि. सहकारी गृहनिर्माण संस्था म., यांच्याकरिता आणि वतीने.

सही/-
सचिव

ठिकाण : मुंबई
दिनांक : ५/११/२०२४

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Twenty Nine**
**Issu - 135**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊळकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- एकोणतीसावे**
**अंक - १३५**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

## अन्नमित्रने शेकडो गरीबांची दिवाळी केली गोड

**मुंबई :** नेहमीच गरीब गरजू आणि भुकेल्यांना आपुलकीचे आणि प्रेमाचे दोन घास देणाऱ्या सौरभ मित्र मंडळाच्या 'अन्नमित्र' सत्कार्याने टाटा रुग्णालय परिसरात ३०० गरीब, गरजूंसह कॅन्सरग्रस्त रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना फराळ देऊन त्यांची दिवाळी गोड केली. सौरभ मित्र मंडळाच्या अन्नमित्र उपक्रमाच्या माध्यमातून गेली चार वर्षे केईएम आणि टाटा रुग्णालयाच्या परिसरात गरीब, गरजू आणि भुकेल्यांना अन्नदान केले जात आहे. मात्र यंदाही दिवाळीनिमित्त अन्नमित्रचे सर्वेसर्वा संजय सोमनाथ शेटये यांनी पुढाकार घेत ३०० गरीबांची दिवाळी गोड करण्याचे कार्य केले. या सत्कार्यासाठी राजेश सोनावडेकर, भारतेंदु तिवारी, दिलीप कदम, संभाजी कदम, संदीप शुक्ला, सुलभा गोरिवले, अनन्या गुरव, नुरूर खानोलकर, सुजाता परब, दर्शना पाटील यासारख्या अनेक दात्यांनी सढळ हस्ते फराळाचे साहित्य देऊन सहकार्य केले. सौरभच्या या सत्कार्याला माजी महापौर महादेव देवळे, रणजीपटू सिद्धेश लाड, मुंबई पोलीस दलातील अशोक शिरसाट, वसंत खामकर, अनिल बोंग यांनीही प्रत्यक्ष उपस्थिती दाखवत गरीबांना फराळाचे वाटप केले. या दिवाळी फराळासोबत किरण शेट्टी आणि सुनीता कोटियन यांनी १२५ महिलांना साड्याही वितरित केल्या.



# मुख्यमंत्री शिंदे, अभिनेता गोविंदा शिवसेनेचे 'स्टार प्रचारक'

प्रतिनिधी
■ मुंबई

विधानसभा निवडणूक २०२४ साठी उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. ते अर्ज मागे घेण्याचा मंगळवार हा शेवटचा दिवस आहे. आजपासून खऱ्या अर्थानं प्रचाराच्या तोफा धडाडणार आहेत. रविवारपासून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबईतील कुर्ला इथं पहिली सभा घेऊन प्रचाराला सुरुवात केली. या प्रचारात शिवसेना पक्षानं आपल्या ४० स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली. यात स्वतः मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अभिनेता गोविंदा, अभिनेता शरद पोंक्षेसह मंत्री दीपक केसरकर, उदय सामंत, गुलाबराव पाटील, नीलम गोऱ्हे आदींचा समावेश आहे. त्यामुळे आता हे स्टार



प्रचारकांच्या तोफा विरोधकांवर धडाडणार आहेत.

आजपासून खऱ्या अर्थानं प्रचाराला सुरुवात होणार आहे. या प्रचारात विरोधक सत्ताधारी एकमेकांची ऊनीदुणी काढताना दिसणार आहेत. तर मागील एक दोन दिवसांपासून मुंबईत जे उमेदवार उभे आहेत, त्यांनी आपली प्रचाराची कार्यालय उघडली आहेत. रविवारी उबाठा माहीम विधानसभा



मतदारसंघातील उमेदवार महेश सावंत यांनी कार्यालयाचं खासदार अनिल देसाई यांच्या हस्ते उद्घाटन केलं. तर हे एक दोन दिवसात अनेक उमेदवार आपल्या कार्यालयाचे उद्घाटन करणार आहेत. अशातच आज वरळी विधानसभा मतदारसंघातील शिवसेना उमेदवार मिलिंद देवरा यांच्या प्रचार कार्यालयाचं उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते दुपारी होणार आहे.

***शिवसेना स्टार प्रचारकांची यादी***

*एकनाथ शिंदे,रामदास कदम,गजानन कीर्तिकर, आनंदराव अडसूळ,प्रताप जाधव,गुलाबराव पाटील, नीलम गोऱ्हे,मीना कांबळी,उदय सामं। शंभूराज देसाई, दीपक केसरकर,तानाजी सावंत,दादाजी भुसे,संजय राठोड, अब्दुल सत्तार,भरत गोगावले,संजय शिरसाट,श्रीकांत शिंदे, धैर्यशील माने,नरेश म्हस्के,श्रीरंग बारणे,मिलिंद देवरा, किरण पावसकर,राहुल शेवाळे,शरद पोंक्षे,मनीषा कायंदे, गोविंदा आहुजा,कृपाल तुमाने,डॉ दीपक सावंत,आनंद जाधव, ज्योती वाघमारे,शीतल म्हात्रे,राहुल लोंढे,हेमंत पाटील,हेमंत गोडसे, डॉ राजू वाघमारे,मीनाक्षी शिंदे,ज्योती मेहेर,अक्षय महाराज भोसले, तेजस्विनी केंद्रे.*

# महाराष्ट्रात 9.7 कोटी मतदार; पुण्यात सर्वाधिक

### पाच जिल्ह्यांमध्ये महिला मतदारांची संख्या अधिक



प्रतिनिधी
■ मुंबई

विधानसभा निवडणुकीसाठी २८८ मतदारसंघातील सुमारे ९ कोटी ७० लाख २५ हजार ११९ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदारसंख्येत पुणे जिल्हा आघाडीवर आहे. रत्नागिरी, नंदुरबार, गोंदिया, भंडारा आणि सिंधुदुर्ग या पाच जिल्ह्यात महिला मतदारांची संख्या पुरुष मतदारांच्या तुलनेत अधिक आहे.

पुण्यातील एकूण मतदारसंख्या ८८ लाख ४९ हजार ५९० आहे तर मुंबई उपनगरात ७६ लाख ८६ हजार ९८ मतदार आहेत. ठाण्यात ७२ लाख २९ हजार ३३९, नाशिक जिल्ह्यात ५० लाख ६१ हजार १८५ आणि नागपुरात ४५ लाख २५ हजार ९९७ मतदार आहेत.

११ लाख २५ हजार १०० असून यामध्ये १० तृतीयपंथींची नोंद आहे. यामध्ये पुरुष मतदार ५ लाख ५३ हजार ६८५ आणि महिला मतदार ५ लाख ७१ हजार ४०५ आहेत. भंडारा येथे एकूण मतदार १० लाख १६ हजार ८७० असून यामध्ये ४ तृतीयपंथींची नोंद आहे; पुरुष मतदार ५ लाख ६ हजार ९७४ आणि महिला मतदार ५ लाख ९ हजार ८९२ आहेत. सिंधुदुर्गात एकूण मतदार ६ लाख ७८ हजार ९२८ असून यामध्ये ३ तृतीयपंथींची नोंद आहे. पुरुष मतदार ३ लाख ३६ हजार ९९१ आणि महिला मतदार ३ लाख ४१ हजार ९३४ आहेत.

राज्यात विधानसभेसाठी २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. एकूण ९ कोटी ७० लाख २५ हजार ११९ मतदारांची नोंद आहे ज्यामध्ये ५ कोटी २२ हजार ७३९ पुरुष, ४ कोटी ६९ लाख ९६ हजार २७९ महिला आणि ६ हजार १०१ तृतीयपंथी मतदार आहेत.

अहमदनगर, सोलापूर, जळगाव, कोल्हापूर आणि औरंगाबाद या पाच जिल्ह्यांमध्ये ३० लाखांहून अधिक मतदार आहेत. सोलापूरमध्ये ३८ लाख ४८ हजार ८६९, अहमदनगरमध्ये ३७ लाख ८३ हजार ९८७, जळगावमध्ये ३६ लाख ७८ हजार ११२, कोल्हापूरमध्ये ३३ लाख ५ हजार ९८ आणि औरंगाबादमध्ये ३२ लाख २ हजार ७५१ मतदार आहेत.बुलढाणा, अमरावती, यवतमाळ, नांदेड, रायगड, मुंबई शहर, बीड, सातारा, सांगली आणि पालघर या १० जिल्ह्यांमध्ये २० लाखांहून अधिक मतदार आहेत.

***पाच जिल्ह्यात महिला मतदारांची संख्या अधिक***

*रत्नागिरी, नंदुरबार, गोंदिया, भंडारा आणि सिंधुदुर्ग या पाच जिल्ह्यात महिला मतदारांची संख्या पुरुषांपेक्षा अधिक आहे. रत्नागिरीतील एकूण मतदार संख्या १३ लाख ३९ हजार ६९७ असून यामध्ये ११ तृतीयपंथींची नोंद आहे. यामध्ये पुरुष मतदार ६ लाख ४६ हजार १७६ आणि महिला मतदार ६ लाख ९३ हजार ५१० आहेत. नंदुरबारमध्ये एकूण मतदार १३ लाख २१ हजार ६४२ असून यामध्ये १३ तृतीयपंथींची नोंद आहे. यामध्ये पुरुष मतदार ६ लाख ५४ हजार ४१२ आणि महिला मतदार ६ लाख ६७ हजार २१७ आहेत.*

# भाजपच्या गोपाळ शेट्टींची बोरीवलीतुन माघार तर वर्सोव्यात राजू पेडणेकर यांची बंडखोरी कायम

प्रतिनिधी
■ मुंबई

पश्चिम उपनगरातील बोरिवली विधानसभा मतदार संघात भाजपने यावेळीही स्थानिक उमेदवार न दिल्याने कार्यकर्त्यांनी लोकसभा निवडणुकीत पक्षाने अन्याय केलेल्या माजी खासदार गोपाळ शेट्टी यांच्या माध्यमातून भाजपच्या अधिकृत उमेदवाराविरोधात बंडाचे निशाण फडकवले होते. पण भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी त्यांची समजूत काढल्याने शेट्टी यांनी आपली उमेदवारी मागे घेतली आहे. तर वर्सोवा मतदारसंघात माजी नगरसेवक राजू पेडणेकर यांनी शिवसेना उबाठा उमेदवाराविरोधात आपला उमेदवारी अर्ज कायम ठेऊन निवडणूक लढवून जिंकण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

बोरिवली मतदारसंघाकडे साऱ्यांचेच लक्ष लागले होते. बोरिवली हा भाजपचा बालेकिल्ला आहे. तरीही भाजप तेथून नेहमीच बाहेरचा उमेदवार देत आहे. यावेळीही पक्षाने बाहेरचा उमेदवार दिल्याने





कार्यकर्त्यांनी आंदोलन केले. व त्यानतंर गोपाळ शेट्टी यांना अपक्ष म्हणून उमेदवारी दाखल करण्याचा निर्णय घेण्यात आला. शेट्टी यांनी शेवटच्या दिवशी २९ ऑक्टोंबर रोजी अर्ज दाखल केला होता. काल अर्ज मागे घेण्याच्या दिवशी स्थानिक खासदार व केंद्रीय मंत्री पियूष गोयल व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गोपाळ शेट्टी यांच्याशी २ तास चर्चा केल्या नंतर गोपाळ शेट्टी यांनी आपली उमेदवारी मागे घेण्याचा निर्णय घेतला. गोपाळ शेट्टी यांना एखाद्या मोठ्या राज्याचे राज्यपाल देण्यात येणार असल्याचे समजते.

उमेदवाराच्या नावावरून दोन दिवस मतभेद नाही मुद्यांवर चर्चा होत होती. पक्ष मोठा आहे मी फार लहान कार्यकर्ता आहे. मुंबईच्या प्रश्नासाठी मी काम करत राहणार आहे.अशी प्रतिक्रिया शेट्टी यांनी व्यक्त केली.

दरम्यान, अंधेरी पश्चिम येथूनही माजी नगरसेवक मोहसिन हैदर यांनी काँग्रेसचे अधिकृत उमेदवार अशोक जाधव यांच्या विरोधात दाखल केलेली अपक्ष उमेदवारी मागे घेतली आहे. पक्षाच्या वरिष्ठांनी सांगितल्यामुळे आपण आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला असे त्यांनी सांगितले. माझ्या उमेदवारीमुळे जातीयवादी शक्तींना ताकद मिळाली असती.असेही ते.म्हणाले. महा विकास आघाडीचे काम करणार आहे असेही मोहसिन हैदर यांनी सांगितले.

# मुंबई उपनगर जिल्ह्यातील 26 विधानसभा मतदारसंघात 315 अंतिम उमेदवार

### 53 जणांची माघार

**मुंबई:** मुंबई उपनगर जिल्ह्यातील 26 विधानसभा मतदारसंघांमध्ये विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ साठी काल उमेदवारी मागे घेण्याची मुदत संपल्यानंतर अंतिम 315 उमेदवार आहेत, अशी माहिती मुंबई उपनगर जिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी राजेंद्र क्षीरसागर यांनी पत्रकार परिषदेत दिली. 171- मानखुर्द आणि 158- जोगेश्वरी विधानसभा मतदारसंघात प्रत्येकी 22 उमेदवार आहेत. 167- विलेपार्ले व 173- चेंबूर विधानसभा मतदारसंघात प्रत्येकी 6 उमेदवार आहेत. मुंबई उपनगर जिल्ह्यातील 26 विधानसभा मतदारसंघांमध्ये दि. 20 नोव्हेंबर 2024 रोजी सकाळी 7 ते सायंकाळी 6 वाजेपर्यंत मतदान होणार आहे.

# 49वी राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धा-प्रदर्शन ; दिवाळी अंक संपादक-प्रकाशकांना आवाहन

■ मुंबई

१९४९ पासून अनेक उपक्रम आणि कार्यक्रमांच्या माध्यमातून सातत्याने कार्यरत असलेल्या आणि वृत्तपत्र लेखन चळवळीचे यंदा अमृतमहोत्सवी सांगता वर्ष साजरे करीत असलेल्या मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही ४९ वी राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. सर्वोत्कृष्ट अंकासाठी मनोरंजनकार का र मित्र स्मृती पुरस्कार तर आवाजकार मधुकर पाटकर पुरस्कृत सर्वोत्कृष्ट विनोदी अंक, साने गुरुजी स्मृती सर्वोत्कृष्ट मुलांचा अंक, सर्वोत्कृष्ट धार्मिक अंक, मराठी विचारधारा प्रतिष्ठान पुरस्कृत वसंतराव होशिंग स्मृती महिला संपादित सर्वोत्कृष्ट अंक, कृष्णराव भानुसे स्मृती उत्कृष्ट दिवाळी अंक, पास्कोल लोबो पुरस्कृत गणेश केळकर स्मृती उत्कृष्ट अंक, मनोहरपंत चिवटे स्मृती सर्वोत्कृष्ट आरोग्य विषयक अंक यासह स्पर्धेत यशस्वी ठरलेल्या अंकांचा उत्कृष्ट आणि उल्लेखनीय अंक म्हणून पारितोषिक देऊन मराठी भाषा दिन २७ फेब्रुवारी रोजी मान्यवर पाहुण्यांच्या उपस्थितीत गौरव करण्यात येतो. स्पर्धा व प्रदर्शनासाठी आलेले हे अंक मुंबई-ठाणे शहरात प्रदर्शन आयोजित करून मांडले जातात. त्यानंतर हे अंक ग्रामीण भागातील शाळा-वाचनालयांना मोफत दिले जातात. दिवाळी अंकांच्या संपादक-प्रकाशकांनी २ प्रती - रवींद्र मालुसरे, अध्यक्ष-मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई, घरकुल सोसायटी, रूम न. ६१२, ६ वा मजला, सेंच्युरी बाजार लेन, भुस्सा इंड. समोर, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५ येथे पाठवाव्यात. असे आवाहन प्रमुख कार्यवाह प्रशांत घाडीगावकर यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी रवींद्र मालुसरे ९३२३११७७०४ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात येत आहे.

# जरांगे यांचा निवडणुकीतून माघारीचा निर्णय स्वागतार्ह

### मुंबईच्या डबेवाल्यांनी केले निर्णयाचे स्वागत

प्रतिनिधी
■ मुंबई

मराठा आरक्षणाचा लढा एकांडे शिलेदारा प्रमाणे लढणारे नेतृत्व म्हणजे मनोज जरांगे पाटील आहेत. त्यांचे नेतृत्वावर मराठ्यांचा विश्वास आहे. मनोज जरांगे पाटील यांचे आरक्षण लढ्यामुळे बरेच मराठा आरक्षणाचे विरोधक अडचणीत आले आहेत त्यांना काहीही करून मनोज जरांगे पाटील यांचे नेतृत्व संपवायचे आहे. म्हणुन त्यांनी नविन डाव टाकला होता. काहीही करून मनोज जरांगे पाटील यांना निवडणुकीच्या मैदानात उतरवयाचे आणि त्यांचा पराभव करायचा.

मनोज जरांगे पाटील यांना आम्ही पत्र लिहून विनंती केली होती हा मराठा आरक्षण विरोधकांचा हा डाव त्यांचेवर उलटवायचा असेल तर सध्या थेट निवडणुक लढुया नको, तर जे नेते मराठा आरक्षणाला विरोध करत आहेत मग ते कोणत्याही पक्षाचे असू द्या त्यांचा पराभव पहिला करा... पहिले विरोधक पाडा मग पुढे आपण सबळ झालो की निवडणुक लढता येईल. असे मुंबई डबेवाला असोसिएशनचे अध्यक्ष सुभाष तळेकर यांनी सांगितले.

मुंबई मधुन मराठा क्रांती मोर्चा यांचे वतीने पहिला मराठा उमेदवार म्हणुन भायखळा विधानसभा मतदार संघा मधुन सुभाष तळेकर यांनी अर्ज भरला होता. परंतू भायखळा विधानसभा मतदार संघ मतदारांची उतरंड पहाता मराठा समाज हा पाचव्या स्थानी होता केवळ मराठा मतांची फुटाफुट होईल व त्याचा फायदा आरक्षण विरोधी उमेदवारांस होईल म्हणुन आम्ही उमेदवारी अर्ज न भरता महाविकास आघाडीचे उमेदावार मनोज जामसुतकर यांना पाठिंबा दिला. असे सुभाष तळेकर यांनी सांगितले.

# केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केली प्रकाश आंबेडकर यांच्या प्रकृतीची चौकशी

प्रतिनिधी
■ मुंबई

रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी आज वंचित बहुजन आघाडी चे अध्यक्ष प्रकाश अंबेडकर यांच्या प्रकृतीची दूरध्वनीद्वारे चौकशी केली. प्रकाश अंबेडकर यांना पुण्यातील रुग्णालयातुन डिस्चार्ज देण्यात आला आहे.आता त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती त्यांच्या पत्नी अंजलिताई प्रकाश आंबेडकर यांनी ना.रामदास आठवले यांना दिली.पुण्यात जाऊन लवकरच आपण प्रकाश अंबेडकर यांची भेट घेणार असल्याचे ना.रामदास आठवले यांनी अंजलीताई अंबेडकर यांना. सांगितले.

महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू आणि आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ नेते ऍड.प्रकाश आंबेडकर यांची प्रकृती अस्वस्थ असल्याने त्यांना



रुग्णालयात दाखल केल्याची माहिती मिळाल्यानंतर ना. रामदास आठवले यांनी अत्यंत काळजीने प्रकाश आंबेडकर यांच्या प्रकृतीची चौकशी दूरध्वनी द्वारे केली.

आता अँड. प्रकाश आंबेडकर यांची प्रकृती स्थिर आहे.त्यांची अँजीयोप्लास्टी करण्यात आली असून आता त्यांची प्रकृती चांगली आहे ऍड. प्रकाश आंबेडकर यांची प्रकृती लवकर चांगली व्हावी अशा शुभेच्छा देऊन लवकरच पुण्यातील निवासस्थानी आपण ऍड. प्रकाश आंबेडकर यांची भेट घेणार असल्याचे ना.रामदास आठवले यांनी सांगितले.

# राज ठाकरेंनी भेट नाकारणे माझ्यासाठी वेदनादायक

### शिवसेना उमेदवार सदा सरवणकर यांची खंत

■ मुंबई

माहिम मतदार संघाचे महायुतीचे उमेदवार आमदार सदा सरवणकर यांनी सोमवारी आपली उमेदवारी कायम ठेवली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार सरवणकर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेण्यासाठी गेले होते मात्र राज ठाकरे यांनी भेट नाकारल्याने अर्ज माघारीबाबत चर्चा झाली नाही. माझ्यासारख्या कार्यकर्त्याची राज ठाकरेंनी भेट नाकारणे माझ्यासाठी वेदनादायक असल्याची खंत सरवणकर यांनी व्यक्त केली. तिसऱ्या उमेदवारामुळे मुंबईत काँग्रेस आघाडीचा फायदा होईल, असे सरवणकर म्हणाले.

मागील आठवडाभरापासून मुंबईतील माहीम मतदार संघ चर्चेचा विषय बनला होता. राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे यांनी माहिम मतदार संघात मनसेकडून उमेदवारी अर्ज भरला आहे. या ठिकाणी तीनवेळा शिवसेनेचे सदा सरवणकर आमदार म्हणून निवडून आले आहेत. महायुतीच्या जागा वाटपात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सदा सरवणकर यांना माहिममधून पुन्हा संधी दिली होती. मात्र सरवणकर यांनी अमित ठाकरेसाठी उमेदवारी मागे घ्यावी, अशा प्रकारचे चित्र निर्माण करण्यात आले होते.

या दरम्यान सदा सरवणकर यांनी राज ठाकरे यांना सोशल मिडियातून वारंवार विनंती केली. मात्र राज ठाकरेंकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. आज उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटच्या दिवशी सरवणकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची वर्षावर भेट घेतली. शिंदेंच्या निर्देशानुसार सरवणकर आपल्या प्रमुख कार्यकर्त्यांसह राज ठाकरे यांच्या निवासस्थानाजवळील शिवसेना शाखेत ठाकरेंच्या भेटीसाठी वाट पाहत होते, पण त्यांची भेट झालीच नाही.

**ANNEXURE 47**
**FORMATS C-1 TO C-8 and CA**
**Format C-1**
(for candidates to publish in Newspapers TV)

**Declaration about criminal cases**

(As per the Judgment dated 25th September 2018, of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs Union of India & Anr)

Name and address of candidate : **SNEHAL SUDHIR JADHAV**
**2/2 Aga Irani Chawl, Prabhadevi, Mumbai 400 013**
Name of Political Party : **MAHARASHTRA NAVNIRMAN SENA**
Name of Election : **MAHARASHTRA LEGISLATIVE ASSEMBLY ELECTION 2024**
Name of Constituency : **180 WADALA**

I, **SNEHAL SUDHIR JADHAV** a candidate for the abovementioned election declare For public information the following details about my criminal antecedents;

**(A) Pending Criminal cases**

| Sr No | Name of Court | Case No and dated | Status of Case (s) | Section (s) of Acts concerned and brief description of offence(s) |
|---|---|---|---|---|
| 1 | 5TH Metropolitan Magistrate Court Dadar, Mumbai | CNR No. MHMM150033122017 | Not Heard | IPC 341, 354, 323,504, 506, 114, |
| 2 | City Civil and Sessions Court, Mumbai | Reg No. 100821/2022 CNR No. MHCC020128702022 | Statement U/s 313 CRPC | IPC 143, 144, 145, 147, 149, 332, 353 Maharashtra Police Act Section 37(3) Section 135 |
| 3 | City Civil and Sessions Court, Mumbai | Reg No. 100821/2022 CNR No. MHCC020128702022 | Statement U/s 313 CRPC | IPC 143, 144, 145, 147, 149, 332, 353 Maharashtra Police Act Section 37(3) Section 135 |

**(B) Details about cases of conviction for criminal offences**

| Sr N | Name of Court & date(s) of order(s) | Description of office (s) & punishment imposed | Maximum Punishment Imposes | |
|---|---|---|---|---|
| | NA | NA | NA | |

### भांडुप तुलशेतपाडा परिसरात गुंडांचे थैमान

# गुंडगिरी विरोधात नागरिक करणार उग्र आंदोलन - रमेश खानविलकर

प्रतिनिधी
■ मुंबई

भांडुप (पश्चिम) येथील ९० फुटी रोड, तुलशेतपाडा गावदेवी रोड येथे १५ ते २० जणांच्या गुंड टोळ्यांनी गेल्या तीन चार महिन्यापासून गुंडगिरीचे थैमान घातले असून संपूर्ण परिसर दहशतीखाली आहे. भांडुप पोलिस ठाण्यात लेखी तसेच तोंडी तक्रारी नागरिकांनी, संस्थांनी, मंडळांनी दिल्या आहेत पण पोलिस कारवाई करत नसल्याचा आरोप होतो आहे. पोलीस कठोर भूमिका घेऊन कारवाई करत नाही त्यामुळे गुंडगिरी वाढली आहे. असा आरोप स्थानिक रहिवासी शिक्षण तज्ञ रमेश खानविलकर यांनी केला आहे. येत्या सात दिवसात ही गुंडगिरी थांबली नाही तर उग्र आंदोलन करण्यात येईल. असे निवेदनही रमेश खानविलकर यांनी पोलिस आयुक्त यांना दिले आहे .

गुंडानी तुलशेतपाडा गावदेवी रोड परिसरात दिपावली मध्ये लक्ष्मीपूजनाच्या दिवशी जितेंद्र ठाकूर यांना जबरी माराहाण केली अनेकांच्या घरात पेटते सुतळी बॉम्ब पेटवून टाकण्यात आले. नरकचतुर्थीच्या रात्री १२.३० वाजता एका नागरिकावर चाकूने हल्ला झाला रात्री आठ ते दोन वाजेपर्यंत ९० फीट रोडवरून जाणाऱ्या सामान्य नागरिकांना माराहाण करून त्यांना लुटणे, रस्त्यावरच दारूच्या पार्ट्या करणे, चरस, गर्द विकणे,गाड्या पार्क करणाऱ्या ३५० ते ४०० वाहन धारकांकडून दर महिन्याला प्रत्येक वाहनामागे ४०० रुपयाप्रमाणे १ लाख ६० हजार जमा करणे,फेरिवाल्यांकडून प्रत्येकी १०० रुपये जमा करणे, कैलास पार्क इमारती मधील गाला क्रमांक ८ हे गुंडांचे लपण्याचे ठिकाण आहे. महिला व मुलींची छेडछाड करून रात्री गाडीच्या मध्ये अश्लील कृत्य करणे,असे कृत्य या गुंड टोळ्यातील गुंड करत असतात. असे खानविलकर यांनी पत्रात म्हटले आहे.

जितेंद्र ठाकूर या नागरिकाला लक्ष्मीपूजनाच्या दिवशी जबर माराहाण करण्यात आ. याबाबत त्याचा भाऊ आकाश ठाकूर यांनी १०० नंबर ला कॉल करून भांडुप पोलीस ठाण्यात जाऊन एन.सी.नोंद क्रमांक ३३०१ दिनांक २/११/२०२४ रोजी नोंदवली. पण भांडुप पोलिस ठाणे यांनी पाच दिवस झाले तरी गुन्हा नोंद केला नाही.

विभागातील दुर्गामाता मंडळाने रामजी पाटकर,शिवशक्ती वेलफेअर सोसायटी व १०० पेक्षा अधिक सह्या केलेले निवेदन याबाबत लेखी तक्रार केली आहे सोमवार ४/११/२०२४ रोजी पुन्हा स्थानिक रहिवासी व तक्रारदार आकाश ठाकूर भांडुप पोलीस ठाण्यात याबाबत गुन्हा नोंद करण्यासाठी गेले असता भांडुप पोलीस ठाणे ड्यूटि ऑफिसर यांनी गुन्हा न नोंदविता, त्यांना उदया या मग गुन्हा नोंदवू असे सांगितले. गुन्हा घडूनही पाच दिवस झाले भांडुप पोलीस ठाणे गुन्हा नोंदवत नाहीत.

याबाबत शिक्षण तज्ञ रमेश खानविलकर म्हणाले की, ही बाब सत्य आहे मी स्वतः लक्ष्मीपूजनाच्या दिवशी वरिष्ठ पोलीस निरीक्षक दत्तात्रय खंडागळे यांना फोन करून वरील सर्व प्रकारची माहिती दिली होती तेव्हा दत्तात्रय खंडागळे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी स्वतः येऊन स्थळ पाहणी केली आहे. त्यांना सर्व प्रकारची माहिती दिली. स्थानिक १०० पेक्षा अधिक नागरिकांचे निवेदन देखील त्यांना दिलेले आहे. गुंडांचे सर्व फोटो त्यांना दिले आहेत. तुलशेतपाडा गुंडांचा अड्डा झाला आहे.

यापूर्वी गेल्या पाच सहा महिन्यापासून याबाबत मी स्वतः लेखी व तोंडी माहिती पोलीस स्टेशनला दिली आहे १५ ते २० जणांचे गुंडटोळी तयार झाली असून ते संध्याकाळी दररोज या विभागात दहशत निर्माण करतात, हत्यारे नाचवतात, चरस, गर्द, दारू खुलेआम विकतात,पार्किंगवाले, बांधकाम व्यावसायिक, फेरीवाले यांच्याकडून हफ्ता वसूल करतात.अशी तक्रार पोलिस ठाण्यात दिल्याची माहिती दिली.

अशक्य असे काहीच नाही. त्याची सुरुवात फक्त स्वप्न पाहण्यापासून होते.



- नेल्सन मंडेला

वृत्तमानस
मुंबई, मंगळवार, ०५ नोव्हेंबर २०२४

# हमाम में सब नंगे

राजकारणात घराणेशाही हा अत्यंत कळीचा आणि सर्वात जास्त चर्चिला जाणारा विषय आहे. भ्रष्टाचाराच्या मुद्द्याप्रमाणेच त्याची सर्वत्र चर्चा होते परंतु निष्कर्ष मात्र काहीच काढला जात नाही. ज्याप्रमाणे राजकारणात भ्रष्टाचाराला अघोषितपणे शिष्टाचार मानले गेले आहे त्याचप्रमाणे घराणे शाळेला देखील सर्वांनीच पक्षाधार दिला आहे. हा मुद्दा फक्त लोकांसमोर टीका करण्यासाठी असतो परंतु प्रत्यक्षात मात्र सगळयात पक्षांना तो हवा असा वाटतो. पूर्वी असणारे राजसाहेब संपर्कत आलेली असली तरी

घराणेशाही मात्र अजूनही शाबूत ठेवली गेली आहे. लोकशाहीच्या राज्यातही घराणेशाही अगदी निर्धास्तपणे नांदते आहे. ज्याप्रमाणे राजाचा मुलगा राजाच होणार असा सर्व मान्यता असलेला कायदा होता त्याचप्रमाणे आता पुढाऱ्यांचा मुलगा पुढारीच होणार असा झाला आहे. लोकशाहीत अशा घराणेशाहीला बिलकुल ठाणा नसतानाही सर्वात पुढाऱ्यांनी आपली ही व्यवस्था भक्कम करून ठेवली आहे. आजचे महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशातील राजकारण ज्या पद्धतीने सुरू आहे त्यामध्ये घराणे शाळेचा मोठा दबदबा निर्माण झाला आहे. नेत्या पुढाऱ्यांना राजकीय वारस तयार करायचा असेल तर कार्यकर्ता कितीही निष्ठावंत, कर्तृत्वान असला तरी त्याच्या गळयात राजकीय वारसाची माळ न घालता घरातील व्यक्तींच्या गळयातच घातली जाते. महाराष्ट्र आणि झारखंड या दोन राज्यांमध्ये विधानसभा निवडणुकीची गडबड सुरू झाली आहे. या गडबडीतच देशातील काही राज्यांमध्ये लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांची पोटनिवडणूक प्रक्रिया देखील सुरू झाली आहे, असे असताना सर्वच पातळीवर पुन्हा घराणेशाहीची चर्चा जोरात सुरू झाली आहे. केवळ सुरूच झालीय असे नाही, तर सर्वात गमतीची गोष्ट ही आहे की बहुतेक सर्वच राजकीय पक्षांनी घराणेशाही या निकषाला प्राधान्य देऊनच उमेदवारांच्या नावाची जरी घोषणा करून तिचे वाटप के आहे. असे वाहुन देखील प्रत्येक जण घराणेशाही या मुद्द्यावरून आपल्या विरोधकांवर टीका करताना दिसत आहेत. भारतीय जनता पक्षाने पूर्वीपासून घराणेशाहीच्या मुद्द्यावरून काँग्रेस पक्षाला टार्गेट केले आहे. या मुद्द्यावरून काँग्रेसला झोडण्याची एकही संधी गमावली नाही. काँग्रेस पक्षाला गांधी घराण्याचा पक्ष असल्याची टीका भाजप करत असतो. पण महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाने जी आपली यादी जाहीर केली आहे त्यामध्ये सुद्धा घराणेशाहीचा प्रभाव दिसत आहे. एकनाथ शिंदे यांनी जाहीर केलेल्या शिवसेनेच्या यादीत आणि अजित पवार यांनी जाहीर केलेल्या राष्ट्रवादीच्या यादीत घराणेशाहीचेच प्रतीक उमटलेले दिसते. महाविकास आघाडीच्या घटक पक्षांची यादीसुद्धा घराणेशाहीमुक्त उमेदवारांची असेल अशी कोणतीही शक्यता नाही. कारण घराणेशाही हा भारतीय राजकारणाचा अविभाज्य घटक झाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावर्षी 15 ऑगस्ट रोजी लाल किल्ल्यावरून भाषण करत असताना देशातील एक लाख सामान्य कुटुंबातील तरुणांना राजकारणात आणण्याचा संकल्प जाहीर केला होता. भारतीय राजकारण घराणेशाही मुक्त करणे आवश्यक असल्याच्या गरजेवर त्यांनी भर दिला होता. पण त्यापूर्वी झालेली लोकसभा निवडणूक असो किंवा त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुका असोत आणि सध्या होणाऱ्या महाराष्ट्र, झारखंड विधानसभा निवडणुका असोत भाजपामध्ये सुद्धा घराणेशाहीचे प्राबल्य आहे हेच समोर येत आहे. काँग्रेस पक्षाचे नेते राहुल गांधी यांनी काही वर्षांपूर्वी कॅलिफोर्निया यूनिव्हर्सिटीमध्ये भाषण करत असताना केवळ भारतच नव्हे, तर जगातील बहुतेक देशांमध्ये सर्वच क्षेत्रांमध्ये घराणेशाही कार्यरत असल्याचा उल्लेख केला होता. राजकारणच नव्हे तर चित्रपट उद्योग आणि शिक्षण क्षेत्रामध्ये सुद्धा घराणेशाही अपरिहार्य असल्याचा युक्तिवाद त्यांनी केला होता. भारतीय जनता पक्षाने सातत्याने काँग्रेसमधील घराणेशाहीवर प्रहार केल्याने त्याला उत्तर देताना राहुल गांधी यांनी अशा प्रकारे आपली बाजू मांडली होती, ती काही प्रमाणात खरीही आहे. कारण ज्याप्रमाणे प्रकारे आपली बाजू मांडली होती, ती काही प्रमाणात खरीही आहे. कारण ज्याप्रमाणे डॉक्टरचा मुलगा डॉक्टर होणार किंवा वकिलाचा मुलगा वकील होणार हे सहजपणे ठरलेले असते त्याच प्रकारे भारतीय राजकारणाच्या व्यासपीठावर भारतीय राजकीय नेत्याचा मुलगा हा राजकारणातच येणार हे जणू काही गृहीतच धरलेले असते. त्यातूनच या घराणेशाहीला बळ मिळते. कोणत्याही राजकीय पक्षाचे ध्येय नेहमी निवडणुकीच्या राजकारणात यश मिळवणे हेच असते आणि या निवडणुकीच्या राजकारणामध्ये उमेदवारांना उतरवताना नेहमीच इलेक्टिव्ह मेरिट म्हणजे निवडून येण्याची क्षमता लक्षात घेतली जाते. राजकीय घराण्यातून येणाऱ्या उमेदवारामध्ये अनेक वेळा ही निवडून येण्याची क्षमता आपोआपच विकसित झालेली असते. त्यातूनच ही घराणेशाही अधिकच विकसित होत जाते. भारतीय लोकशाही राजकारणाला स्वातंत्र्यानंतर आता 75 वर्षे होऊन गेली असल्याने या राजकारणामध्ये घराणेशाहीच्या अनेक पिढ्या दिसल्या आहेत आणि वाढल्या आहेत. भारतीय स्वातंत्र्याच्या सुमारास जो राजकीय नेता सक्रिय होता त्याचा नातू आता विद्यमान कालावधीमध्ये राजकारणात सक्रिय झाल्याचे दिसत आहे. काही सन्माननीय अपवाद वगळता बहुतेक सर्व राजकीय घराण्यातली नवीन पिढी आता राजकारणाचा दरवाजा ठोठावू लागली आहे आणि ही गोष्ट टाळता पण येणारी नाही. कारण पिढ्यान्पिढ्या अशा प्रकारे राजकारण सुरू असल्याने मतदारांचा एक बेस तयार झालेला असतो. उमेदवारांचा चेहरासुद्धा मतदारांना परिचित असतो. घराणेशाहीतून येणाऱ्या अशा उमेदवारांकडे निवडणूक लढवण्याची आर्थिक क्षमताही असते. साहजिकच बहुतेक राजकीय पक्ष एक सेफ गेम म्हणूनच घराणेशाहीतून येणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य देताना दिसतात. सर्वच राजकीय पक्षांमध्ये अशा गोष्टी घडत असल्या तरी भाजपासारखे काही पक्ष हा विषय घेऊन अजूनही टीका करताना दिसतात. कारण त्यांचा रोख हा पक्षाच्या प्रमुख पदावरील जी घराणेशाही आहे त्याच्यावर आहे. निवडणुकीच्या राजकारणामध्ये मात्र भाजपसुद्धा घराणेशाहीच्या दोषापासून मुक्त नाही हे उघड आहे. देशातील बहुतेक राजकीय पक्षांचे प्रमुखपद घराणेशाहीच्या पद्धतीनेच आतापर्यंत चालत आले असल्याने ती गोष्टसुद्धा आता स्वीकारावीच लागणार आहे. दक्षिणेतील राज्य असोत किंवा महाराष्ट्रासारखे राज्य असो, दीर्घकाळ राजकारणात असणार्या घराण्यांनी आपापल्या वारसदारांनाच पक्षाशी धुरा दिलेली आहे, हे वास्तव आहे. म्हणजेच जरी निवडणुकीच्या निमित्ताने पुन्हा एकदा कारण भाजपासह सर्वच राजकीय पक्षांनी घराणेशाही जपली आहे. पूर्वीच्या कालावधीमध्ये राजेशाही असताना ज्या प्रकारे राजाच्या मृत्यूनंतर किंवा निवृत्तीनंतर आपोआपच राज्यकारभार राजपुत्राकडे जायचा त्याच सहजतेने आता राजकारणातील ही वारसदारी पद्धती जपली जात आहे आणि जोपासलीही जात आहे. गेल्या काही वर्षांमध्ये भारतीय राजकारणाचे स्वरूपही बदलत चालल्याने येणाऱ्या कालावधीमध्ये घराणेशाहीची पद्धत अधिकच तीव्रतेने जोपासली जाईल, असेच संकेत सध्या सुरू असलेल्या निवडणुकीच्या प्रक्रियेने दिले आहेत. घराणेशाहीची ही पद्धती स्वच्छ लोकशाहीसाठी बाधा आणणारी आहे. देशात नितळ लोकशाही नांदावी असे वाटत असेल तर कशा घराणेशाहीला मतदारांमधूनच विरोध व्हायला हवा. कारण ही लोकशाही मतदारांसाठीच निर्माण केली गेली आहे. त्यामुळे मतदारांनीच तिची काळजी घ्यायला हवी. नाही तर ही घराणेशाही हुकूमशाहीत बदलायला वेळ लागणार नाही

# येणारी दिवाळी फटाकेमुक्त साजरी होईल का ?

गतवर्षीच्या तुलनेत यंदा दिवाळीपूर्वी मुंबईसह प्रमुख शहरांतील हवेची गुणवत्ता चांगली असल्याने यंदा फटाके फोडण्यावर तितकेसे निर्बंध आणण्यात आले नव्हते. ज्याचा लाभ बच्चे कंपनीसह तरुण मंडळींनी मोठ्या प्रमाणात उचलला. शेवटी अपेक्षित तेच झाले. फटाक्यांच्या धुरामुळे मुंबईतील शिवडी, भायखळा, मालाड, कांदिवली, देवनार यांसारख्या भागातील हवेची गुणवत्ता कमालीची घसरून परिस्थिती चिंताजनक बनली. हवेचा गुणवत्ता निर्देशांक घसरून २०० ते ३०० च्या दरम्यान गेला. लोकसंख्येची दाटीवाटी, विकासकामांमुळे हवेत मिसळलेले धूलिकण, वाढलेल्या वाहन संख्येमुळे प्रतिदिन होत असलेले वायुप्रदूषण आणि त्यातच फटाक्यांच्या धुरामुळे प्रदूषणाने गाठलेली कमाल मर्यादा यांमुळे या चार दिवसांत गर्भवती स्त्रिया, वयस्क, दमा, हृदयविकार असलेल्या रुग्णांना जीव मुठीत घेऊन जगावे लागले. पुणे आणि ठाणे शहरातील स्थितीही याहून वेगळी नव्हती. रात्री १० नंतर फटाके फोडण्यास बंदी असली, तरी शहरी भागांत दिवाळीच्या दिवसांत याहीवर्षी रात्रभर फटाके वाजतच होते. या सर्वांचा लोकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊन खासगी तसेच सरकारी दवाखान्यांसमोर रुग्णांच्या रांगा लागलेल्या दिसून आल्या. प्रदूषणामुळे घसा खवखवणे, खोकला, सर्दी, श्वास घेण्यास त्रास होणे, ताप, डोळे जळजळणे यांसारख्या आजारांनी नागरिक त्रस्त झालेले दिसून आले. यामध्ये लहान मुलांची संख्या अधिक होती.

दरवर्षी फटाक्यांमुळे अनेक ठिकाणी आग लागण्याच्या घटना घडतात ज्यामध्ये वित्त हानी तर होतेच शिवाय काहीवेळा आकस्मिक आग लागल्याने जीवित हानीही होते, अपंगत्व, अंधत्व आणि बहिरेपणाही येतो. एकट्या संभाजी नगरमध्ये दिवाळीनिमित्त फटाके फोडताना ४० जण भाजल्याच्या घटना दिवाळीच्या दिवशी घडल्या आहेत. त्यातील १९ रुग्णांना घाटी रुग्णालयात, तर २१ रुग्णांना खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. भुईनळ्याचा स्फोट झाल्याने एका १२ वर्षांच्या मुलाचा डोळा निकामी झाला, तर सुतळी बॉम्ब हातात फुटल्याने एकाचा पूर्ण हात भाजला. जळता फटाका रिक्षावर पडल्याने येथील एका रिक्षाने पेट घेतल्याची घटना यंदा समाजमाध्यमांवर चांगलीच व्हायरल झाली. शुक्रवारी लक्ष्मी पूजनाच्या दिवशी केवळ पुण्यात ३१ ठिकाणी आगी लागण्याच्या घटना घडल्या. यामध्ये जीवित हानी झाली नसली, तरी वित्तीय हानी मात्र कमालीची झाली आहे. कासारगोड जिल्ह्यातील नीलेश्वरमजवळील मंदिर उत्सवादरम्यान फटाक्यांची आतषबाजी करताना मोठा स्फोट झाला. या दुर्घटनेत १५० हून अधिक जण जखमी झाले, त्यापैकी आठ जण गंभीररित्या भाजले होते. भाग्य नगरमधील एका फटाक्याच्या दुकानाला आग लागल्याने दुकानाजवळ उभ्या केलेल्या १० दुचाकी जाळून खाक झाल्या. फटाक्यांच्या दुकानाशेजारील एक दुकानही या आगीच्या भक्षस्थानी पडले. वरील उदाहरणे केवळ वानगीदाखल असून देशातील सर्वच भागांत दिवाळीदरम्यान फटाक्यांमुळे आगी लागण्याच्या लहान मोठ्या घटना घडतात ज्यामध्ये प्रचंड प्रमाणात वित्तीय हानी होते. अनेकदा या आगीत निष्पापांचे जीव जातात, तर अनेक जण कायमचे जायबंदी होतात. फटाक्यांमुळे अनेक ठिकाणी भांडणे होतात, प्रसंगी मारामाऱ्या होऊन एकमेकांची डोकीही फोडली जातात. या दिवसांत अग्निशमन दलावर आणि पोलीस प्रशासनावर प्रचंड ताण असतो.

दिवाळी खरेतर नातेवाईकांसोबत एकत्र साजरा करण्याचा सण; मात्र फटाक्यांचा जीवघेणा धूर आणि आवाज नको म्हणून शहरातील श्वसनविकार, हृदय विकार असणारे अनेक जण दिवाळीच्या आधीच गावी किंवा शहराबाहेर मित्रमंडळींकडे, अन्य नातेवाईकांकडे काही दिवसांसाठी राहायला जातात. जे इथे आपल्या नातेवाईकांसोबत दिवाळी साजरी करण्यासाठी थांबतात त्यांना फटाक्यांच्या प्रदूषणामुळे जीव नकोसा होऊन जातो. गर्भवती स्त्रिया, मनोरुग्ण यांनाही फटाक्यांच्या आवाजाचा आणि विषारी वायूचा प्रचंड त्रास सहन करावा लागतो. कुत्रे, मांजरी यांसारखे पाळीव प्राणी, पक्षी यांच्या आरोग्यावरही फटाक्यांचा विपरीत परिणाम होतो ज्यामुळे ते भयभीत होऊन सैरावैरा धावू लागतात. भीतीमुळे अनेकदा हे प्राणी आणि पक्षी जीवसुद्धा गमावतात. सोलापूर जिल्ह्यातील चिंचणी नावाचे एक गाव आहे. या गावातील शेतकरी किरण जाधव यांच्या घरी पोमेरेनियन जातीचा भालू नामक पाळीव कुत्रा होता. . जाधव यांच्यासह संपूर्ण गावाला भालूचा लळा लागला होता. १० वर्षांपूर्वी दिवाळीत फटाक्यांच्या आवाजाला घाबरून भालूने जीव सोडला. भालूच्या मृत्यूमुळे गावातील ४५० नागरिक हळहळले. भालूच्या मृत्यूमुळे ग्रामस्थांनी गावात फटाके बंदीचा निर्णय घेतला. तेव्हापासून आजपर्यंत दिवाळीच्या काळात गावातील कोणीच फटाके वाजवत नाहीत. परंपरागत पद्धतीनुसार दिवाळी साजरी करतात. भालूच्या स्मृतिप्रीत्यर्थ ग्रामस्थांनी गावात १० हजार झाडे लावली. त्यामुळे एकेकाळी ओसाड असलेले हे गाव आज हिरवळीने बहरले आहे. जी बाब चिंचणीसारख्या छोट्याशा गावातील लोकांच्या लक्षात आली ती शहरातील सुशिक्षित लोकांच्या केव्हा लक्षात येणार ?

फटाके आणि भारतीय संस्कृतीचा, हिंदू धर्माचा काडीमात्र संबंध नसताना फटाके फोडून दिवाळी साजरी करणे म्हणजे काहीतरी धर्मभिमान जपणे असा समज काही मंडळींचा झालेला दिसून येतो. ख्रिती वर्षाच्या स्वागतार्थ जगभर फटाके फोडले जातात त्यांना कोणीच विरोध करत नाही, मग हिंदूंच्या दिवाळी सणातच फटाक्यांना विरोध का ? असा सूर या दिवसांत ऐकू येऊ लागतो. यातही काही चुकीचे नसून भारतात ३१ डिसेंबरच्या रात्री फोडल्या जाणारा फटाक्यांवरही खरेतर बंदी आणायला हवी. फटाक्यांमुळे कोणतेही लाभ होत असून फटाक्यांमुळे होणारे नुकसान मात्र अपरिमित आहे. दिवाळी हा दिव्यांचा सण आहे. तिमिराकडून तेजाकडे जाण्याची शिकवण देणारा सण आहे ; मात्र दिवाळीतील जीवघेण्या फटाक्यांमुळे आपला प्रवास तेजाकडून तिमिराकडे चालला आहे कि काय असे वाटू लागते. प्रकाशाचे महत्व सांगणाऱ्या या सणानिमित्त फोडल्या जाणाऱ्या फटाक्यांमुळे देशात दरवर्षी सुमारे ५ हजार जणांना आपली दृष्टी गमवावी लागते. दिवाळी आणि फटाक्यांचा काहीच संबंध नाही. फटाक्यांची निर्मिती केवळ आतषबाजीसाठी करण्यासाठी करण्यात आली आहे. दिवाळीच्या काळात आतषबाजी करावी असा उल्लेख कोणत्याही प्राचीन ग्रंथांत अथवा धर्मशास्त्रात नाही, मग दिवाळीसारख्या पवित्र सणात ही प्रदूषणाची खैरात कशासाठी ? फटाक्यांमुळे क्षणिक सुख मिळते मात्र त्यापासून होणारे नुकसान कैकपटीने अधिक असते. केवळ दिवाळीच्या काळात अब्जोवधी रुपयांच्या फटाक्यांचा निव्वळ धूर होतो. ज्या देशाचा काही भाग आजही दारिद्र्य रेषेखाली जगत आहे, ज्यांना दिवसातून २ वेळा अन्न मिळणेही दुरापास्त आहे,अशा देशात फटाके फोडण्यात आणि त्यापासून होणारे नुकसान निस्तरण्यात अब्जोवधी रुपये खर्च होत असतील तर ते देशाला नक्कीच परवडणारे नाही. ज्या गोष्टी धर्मशास्त्रात नाहीत आणि जर त्यामुळे सामाजिक स्वास्थ बिघडणार असेल तर अशा बाबींवर बंदी आणणेच योग्य आहे. फटाक्यांमुळे होणारी वित्त आणि जीवित हानी, फटाक्यांच्या बाबतीत न्यायालयाला करावा लागणार हस्तक्षेप, या दिवसांत प्रशासनावर पडणारा अधिक भार या सर्व बाबी लक्षात घेऊन फटाके फोडण्यावर केंद्र सरकारने देश पातळीवर बंदी आणायला हवी. फटाक्यांमुळे होणारी हानी लक्षात घेऊन फटाक्यांच्या दुष्परिणामांची जाणीव शाळा महाविद्यालयांतून करून द्यायला हवी. दिवाळीला फटाके फोडणे ही आपली संस्कृती नव्हे, याचे ज्ञान पालकांनीही आपल्या पाल्यांना करून द्यायला हवे. दीपावलीच्या प्रकाशाला आलेली फटाक्यांची काजळी दूर करण्याचे कर्तव्य आपलेच असून आपली संस्कृ, आपला धर्म वाचवायचा असेल, तर आपले सणसुद्धा शास्त्रोक्त पद्धतीनेच साजरे व्हायला हवेत !

- जगन घाणेकर,
घाटकोपर, मुंबई

# हॅप्पी बर्थडे किंग कोहली !

क्रिकेटचा किंग, चेस मास्टर, विक्रमवीर, रन मशिन यासारखी अनेक बिरुदावली ज्याच्या नावापुढे लागली आहेत तो भारताचाच नव्हे तर जगातील सर्वोत्तम फलंदाज, भारताचा कोहिनूर विराट कोहलीचा आज ३६ वा वाढदिवस. किंग कोहलीला वाढदिवसाच्या सर्वप्रथम हार्दिक शुभेच्छा! क्रिकेट या खेळाने जगाला अनेक महान खेळाडू दिले. सचिन तेंडुलकर हा त्यापैकीच एक महान खेळाडू. क्रिकेटमधील दैदिप्यमान कामगिरीने तो क्रिकेटचा देव बनला. जवळपास दोन तप त्याने क्रिकेटवर अधिराज्य गाजवले. भारताला अनेक अविश्वसनीय विजय त्याने मिळवून दिले. २०१३ साली त्याने निवृत्ती स्वीकारली. निवृत्ती स्वीकारण्यापूर्वी त्याने विक्रमांचे एव्हरेस्ट गाठले. तो निवृत्त झाल्यावर त्याच्या इतक्या क्षमतेचा खेळाडू पुन्हा भारताला मिळेल का ? असाच प्रश्न संपूर्ण क्रिकेट विश्वाला पडला होता. ज्या प्रश्नाचे उत्तर कोणाकडेच नव्हते त्या प्रश्नाचे उत्तर खुद्द सचिनकडे होते. सचिनला जेंव्हा प्रश्न विचारण्यात आले की तुझा विश्वविक्रम कोणता खेळाडू मोडेल असे तुला वाटते तेंव्हा त्याने क्षणाचाही विलंब न करता उत्तर दिले 'विराट कोहली' सर्वांना त्यावेळी ही अतिशोक्ती वाटली पण सचिनने विराटची गुणवत्ता हेरली होती.

निवृत्त होण्यापूर्वी चार पाच वर्ष तो आणि विराट एकत्र खेळले होते त्यामुळे विराट कोणत्या क्षमतेचा खेळाडू आहे आणि तो काय करू शकतो हे सचिनला माहीत होते त्यामुळेच सचिनने आपला वारसदार म्हणून विराटची निवड केली होती. विराटने सचिनचे म्हणणे अवघ्या दहा वर्षात खरे करून दाखवले आणि



सचिनचा विश्वास सार्थ ठरविला. आज विराट देखील सचिन प्रमाणे विक्रमांचे इमले चढत आहेत इतकेच नाही तर सचिनचे अनेक विक्रम त्याच्या दृष्टिक्षेपात आले आहेत. सचिनच्या एकदिवसीय शतकांचा विक्रम त्याने नुकताच मोडला असून त्याच्या नावावर आता ५० एकदिवसीय शतक आहेत. त्याने त्याच्या कारकीर्दीत एकूण ८० शतक झळकावले आहेत. एकदिवसीय क्रिकेट प्रमाणेच विराट सचिनच्या एकूण १०० शतकांचा विक्रमही लवकरच आपल्या नावे करेल यात शंका नाही कारण आज त्याच्या नावे ८० शतके आहेत. कसोटीत त्याने २९ शतके झळकावली आहेत तर एकदिवसीय सामन्यात ५० शतके त्याच्या नावावर आहेत. टी २० सामन्यातही त्याचे एक शतक आहे. आज तो ३६ वर्षाचा होत आहे. त्याचा फिटनेस जबरदस्त आहे. वीस वर्षाचा खेळाडू देखील त्याच्यासमोर फिका पडेल असा त्याचा फिटनेस आहे त्यामुळे तो आणखी तीन-चार- वर्ष सहज खेळू शकतो. त्यामुळे तो हा विक्रम सहज मोडेल. विशेष म्हणजे त्याच्या जवळपास जगातील दुसरा कोणताच खेळाडू नाही. विराट केवळ विक्रमवीर नाही तर तो आज जगातला महान फलंदाज बनला आहे. उत्तम खेळाडू ते महान खेळाडू बनण्यापर्यंतचा त्याचा प्रवास अचंबित करणारा आहे. अवघ्या दहा बारा वर्षात तो आज जगातला महान खेळाडू बनला आहे. त्याने धावांची टांकसाळ उभारली आहे. प्रत्येक सामन्यात तो खोऱ्याने धावा काढत आहे. त्याची बॅट म्हणजे जणू धावांची मशिन, त्याच्या बॅट मधून धावांची बरसात होत आहे म्हणूनच आकाश चोप्रा त्याला विराट द रन मशिन कोहली असे म्हणतो. त्याने काढलेल्या शतकांपैकी ९५ टक्के शतके भारताच्या विजयास कारणीभूत ठरली आहेत यावरून त्याच्या शतकांचे मोल लक्षात येते. धावांचा पाठलाग करताना तर त्याने सर्वाधिक शतके झळकावली आहेत म्हणूनच त्याला चेस मास्टर असेही म्हंटले जाते. विराटने शतक झळकावले म्हणजे भारत विजयी झाला असेच समीकरण बनले आहे. केवळ शतकच नव्हे तर त्याच्या अनेक छोट्या मोठ्या खेळी भारताला विजय मिळवून देणाऱ्या ठरल्या.

भारताला अनेक अविश्वसनीय विजय त्याने मिळवून दिले आहेत. ऑस्ट्रेलियात झालेल्या टी २० विश्वचषक स्पर्धेतील पाकिस्तान विरुद्धचा सामना आठवा. आपण तो सामना केवळ विराटमुळे जिंकू शकलो. हातातून गेलेला सामना त्याने ज्याप्रकारे खेचून आणला ते पाहून प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फिटले. तशी खेळी फक्त आणि फक्त विराटच खेळू शकतो. मागील वर्षी भारताने जिंकलेल्या टी २० विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेविरुद्ध त्याने ७० धावा काढून भारताला विश्व विजयी केले होते. या दोन खेळी फक्त एक उदाहरण आहे. तशा प्रकारच्या अनेक खेळी करून त्याने भारताला अनेक अशक्यप्राय विजय मिळवून दिले आहेत. कठीण समय येता विराट कामी येई.... असे उगीच क्रिकेटप्रेमी म्हणत नाहीत. टी २० विश्वचषकात भारताला विजय मिळवून देऊन त्याने क्रिकेट प्रेमिंचे एक स्वप्न पूर्ण केले आहे आता यावर्षी होणाऱ्या विश्व कसोटी अजिंक्यपद स्पर्धेत ( WTC ) आणि एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत त्याने भारताला अजिंक्यपद मिळवून द्यावे अशी क्रिकेटप्रेमींची त्याच्याकडून अपेक्षा आहे. सध्या तो त्याच्या सर्वोत्तम फॉर्ममध्ये नाहीये मात्र तो असा खेळाडू आहे जो कधीही फॉर्मात येऊ शकतो. तो लवकरच त्याच्या सर्वोत्तम फॉर्ममध्ये परतेल आणि भारताला कसोटी आणि एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेचे अजिंक्यपद मिळवून देईल यात शंका नाही. विराटला पुन्हा एकदा वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

Happy birthday king Kohli!!

- श्याम ठाणेदार
पुणे

## पत्र मानस

### निवडणूकीतून माघार भूमिका समजूतीची

महाराष्ट्रात मराठा समाजातील लोकांना आरक्षण मिळवून देणारच अशी ठाम व ठोस भूमिका घेणारे एकमेव आक्रमक ठरलेले आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यानी विधानसभेसाठी उमेदवार न देण्याची भूमिका आज अखेरीस घेतलेली आहे. आजपर्यंत दिलेले सर्वच्या सर्व उमेदवार निवडणूकीतून माघारी घेण्याच्या आज शेवटच्या दिवशी ठरविण्यात आल्याने,मराठा समाजाची त्यांच्याकडून अपेक्षाभंग झाल्याचे भावना तीव्र झालेली आहे. मराठा समाजाचे उमेदवार केवळ एकाच जातीवर निवडून येऊ शकत नाही आणि त्यामुळे लढणे शक्य नाही ही बाब जरांगे यानी आज मान्य केली आहे. या राजकीय निर्णयाचा सर्वाधिक नुकसान मराठवाड्याचे होणार आहे. ओबीसी महासंघाने तर जरांगेच्या या निर्णयाचे लागलीच स्वागत केले आहे. मराठा समाजाचे नेते जरांगे यानी मराठा सोबत मुस्लिम समाजाला सुद्धा आरक्षण मिळावे म्हणून यापुर्वीच मागणी केलेली होती. मराठा आरक्षण हा विषय संवेदनशील असल्याने आताच्या निवडणूक काळात तरी राज्यात जातीसंघर्ष नसावा म्हणून समजूतीने भूमिका घेत जरांगे यानी निवडणूकीतून माघार घेतली असावी असे वाटत आहे.

**- संजय गंगाराम साळगांवकर, कुर्ला**

### दहशतवाद कधी गाडणार?

‘जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवाद पुन्हा सक्रिय करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मात्र, आम्ही तो अशा रीतीने गाडून टाकू, की तो पुन्हा तोंड वर काढू शकणार नाही,’ अशी ग्वाही केंद्रीय गृहमंत्र्यांनी दिली होती. जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवाद्यांचा हैदोस अद्यापही सुरुच आहे. गेल्या काही आठवड्यातील चौथा दहशतवादी हल्ला आहे.दहशतवाद्यांनी काल सीआरपीएफच्या बंकरवर केलेल्या ग्रेनेड हल्ल्यात १२ जण जखमी झाले आहेत.मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी आणि जम्मू-काश्मीर काँग्रेसने या हल्ल्याचा फक्त निषेध केला आहे. काश्मिरी पंडित, स्थलांतरित कामगार, सरकारी अधिकारी, नेते आणि सुरक्षा दलांना लक्ष्य करते.नागरिकांवरील हल्ले रोखण्यासाठी केंद्र व राज्य सरकारला अपयश आले आहे. निवडणुका झाल्या नवीन सरकार स्थापन झाले तरी नागरिकांना दहशतवादी हल्ल्यांना सामोरे जाव लागत आहेत. गेल्या काही दिवसांपासून काश्मीर खोऱ्यातील काही भागात हल्ले आणि चकमकीच्या बातम्या वारंवार येत आहेत. सरकारची दहशतवादविरोधी मोहीम पूर्ण झाली आहे का?

**- विवेक तवटे, कळवा, ठाणे**

### फाजील आत्मविश्वास आणि फलंदाजांचा बेजबाबदारपणा नडला

मुंबईत झालेल्या तिसऱ्या कसोटीतही न्यूझीलंडने भारताला नमवून ३ - ० असा व्हाईट वॉश दिला. न्यूझीलंडने भारतात येऊन भारताला क्लीन स्वीप दिल्याने भारताची क्रिकेट विश्वात चांगलीच मानहानी झाली. विश्व कसोटी चॅम्पियनशिपचे अजिंक्यपद ( WTC ) मिळवण्याचे स्वप्न पाहणाऱ्या भारतासाठी हा मोठा धक्का आहे. या पराभवामुळे जागतिक क्रमवारीत भारत दुसऱ्या क्रमांकावर घसरला असून भारतासाठी ही धोक्याची घंटा आहे. भारतीय संघाचा फाजील आत्मविश्वास आणि फलंदाजांचा बेजबाबदारपणा यामुळेच भारताचा हा मानहानीकारक पराभव झाला आहे. भारतीय खेळाडूंनी न्युझीलंड संघाला हलक्यात घेतले. न्युझीलंडला आपण सहज पराभूत करू अशा भ्रमात भारतीय संघ राहिला आणि तिथेच घात झाला. रोहित, विराटसह भारताचे सर्वच फलंदाज न्यूझीलंडच्या गोलंदाजांसमोर ढेपाळले. ही कसोटी मालिका आहे हेच हे खेळाडू विसरले. कसोटीत टी २० प्रमाणे खेळून हिरो बनण्याचा प्रयत्न काही खेळाडूंनी केला त्याचा फटका भारतीय संघाला बसला. कसोटी क्रिकेटसाठी लागणारे तंत्रच भारतीय खेळाडू विसरले. प्रशिक्षक तसेच सपोर्ट स्टाफने देखील खेळाडूंच्या या बेजबाबदारपणाकडे दुर्लक्ष केले. आता भारतीय संघ ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर जाणार आहे. जवळपास हाच संघ ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर असणार आहे. ऑस्ट्रेलियातही या खेळाडूंनी न्युझीलंड विरुद्ध केलेल्या चुकांची पुनरावृत्ती केली तर भारताला तिथेही मोठ्या पराभवास सामोरे जावे लागेल परिणामी विश्व कसोटी चॅम्पियनशिपचे अजिंक्यपद ( WTC) मिळवण्याचे भारताचे स्वप्न स्वप्नच राहील.

**- श्याम ठाणेदार, पुणे**

## लढणार आणि जिंकणार, प्रितम म्हात्रेंचा विश्वास

**पनवेल :** उरणची जागा आम्ही लढणार आणि जिंकणार सुद्धा असा दावा शेकापचे उमेदवार प्रितम जनार्दन म्हात्रे यांनी केला आहे. कार्यकर्ते ही शेकापची ताकद आहे. त्यांच्या निष्ठेने पक्ष वाढत असतो.आम्ही त्यांच्या इच्छेनुसार चालतो. या ठिकाणी स्थानिकांना कमी लेखण्याचे काम काही जण करत असतील तर त्यांना जागा दाखवून देण्यासाठी आम्हाला लढणे आवश्यक आहे. शेकाप हा नेहमी संघर्ष करून यश संपादन करत असतो. पक्षाला चळवळीचा वारसा आहे. एकनिष्ठेचा लाल बावटा हाती घेऊन कार्यकर्त्यांच्या मनाप्रमाणे आम्ही ही निवडणूक लढवणार आहोत.स्थानिकांना रोजगार देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.त्याला प्रत्यक्षरूप येण्यासाठी ही निवडणूक लढणे आवश्यक आहे आणि ती जिंकणे सुद्धा अत्यावश्यक आहे असे मत शेकापचे उमेदवार प्रितम जनार्दन म्हात्रे यांनी व्यक्त करून राजकीय वावड्यांना पूर्ण विराम दिला.



# राष्ट्रवादी काँग्रेस आणि घड्याळ चिन्ह शरद पवारांचेच आणि शिवसेना बाळासाहेबांचीच...

### मुखमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री पवारांवर जाहीर टीका

**प्रतिनिधी**
**■ डोंबिवली**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरेंनी डोंबिलीमध्ये जाहीर सभा घेत प्रचाराचा नारळ फोडला. या सभेत महाराष्ट्रातील पक्ष फोडाफोडीच्या राजकारणावर राज ठाकरेंनी जोरदार टीका केली. ही टीका करत असताना मूळ शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कोणाचा? हे राज ठाकरेंनी सांगितले.




राज ठाकरे म्हणाले, शिवसेना आणि धनुष्यबाण चिन्ह ही एकनाथ शिंदेंची, उद्धव ठाकरेंची प्रॅापर्टी नाही. ती बाळासाहेबांची प्रॅापर्टी आहे. त्याच्यावर तुम्ही कसला दावा सांगताय?

शरद पवारांवर जाहीर टीका करताना मात्र राज ठाकरेंनी राष्ट्रवादी काँग्रेसमधील फूटबाबत वेगळीच भूमिका घेतली. ते म्हणाले, माझे कितीही मतभेद असले तरी राष्ट्रवादी काँग्रेस हे शरद पवारांचे अपत्य आहे. घड्याळ हे त्यांचे चिन्ह आहे. अजित पवार त्याच्यावर कसला दावा सांगतायेत.

पक्ष पळवतायेत निशाणा पळवतायेत. महाराष्ट्राकडे सुजान महाराष्ट्र म्हणून पाहिलं जायचं. या गोष्टी उत्तर प्रदेश, बिहारमध्ये होत होत्या. तसा महाराष्ट्र कारायचा आहे का? असा सवाल देखील राज ठाकरेंनी यांनी विचारला.

एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेत फूट पाडली. फूट पाडताना म्हणाले मी त्या सरकारमध्ये अजित पवार यांच्या मांडीला मांडी लावून बसू शकत नाही. माझा श्वास कोंडत होता. पण आता तेच अजित पवार मांडीवर येऊन बसले, असा टोला राज ठाकरेंनी एकनाथ शिंदेंना लगावला.

लाडकी बहीण कशासाठी?

राज ठाकरे म्हणाले, मुख्यमंत्र्यांच्या सभेपूर्वी त्यांच्या व्यासपीठावर भोजपूरी गाण्यावर एक महिला नाचते. ही आहे का तुमची लाडकी बहीण योजना. आपण कुठे चाललोय. महिलेनी राजकीय सभेच्या आधी व्यासपीठावर नाचण्याची पद्धती यूपी, बिहारमध्ये आहे. हे आपल्याकडे सुरू झालं. म्हातारी मेली याचं दुःख नाही पण काळ सोकावतोय.

# अवैध बांधकामांवरील कारवाईसाठीचे पोलीस बळ इतरत्र वापरू नका

### उच्च न्यायालयाचे नवी मुंबई पोलिसांना आदेश



**प्रतिनिधी**
**■ नवी मुंबई**

अवैध बांधकामांवर कारवाई करण्यासाठी पुरविण्यात आलेले पोलीस बळ इतर कुठल्याही कामाकरता वापरू नये असे आदेश, उच्च न्यायालयाने नवी मुंबई पोलिसांना दिल्याचे समोर आले आहे. यावेळी न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, बेकायदा बांधकामांवर कारवाई करण्यासाठी पुरविण्यात आलेला पोलीस ताफा पुरत नाही. त्यामुळे आता जे पोलीस कारवाईसाठी राखीव ठेवण्यात आले आहेत, त्यांना अन्य कोणतेही काम देऊ नका. खुपच आवश्यकता असेल तर त्यांना दुसरे काम द्या, असे आदेश मुख्य न्यायाधीश देवेंद्र कुमार उपाध्याय व न्या. अमित बोरकर यांच्या खंडपीठाने दिले आहेत.

नवी मुंबईच्या पालिकेसाठी 78 पोलिसांचे पथक बेकायदा बांधकामांवर कारवाई करण्यासाठी नेमण्यात आले आहे. त्यापैकी फक्त 28 पोलीस पालिकेसोबत कार्यरत असतात. तसेच आठ वॉर्डमध्ये कारवाई करताना इतकेच पोलीस पुरेसे नाहीत. कधी-कधी परिस्थिती हाताबाहेर जाते, असे असतानाही उपलब्ध पोलिसांपैकी काही जणांना उत्सवाचा बंदोबस्त किंवा अन्य कामे दिली जातात, असे पालिकेने खंडपीठाच्या निदर्शनास आणून दिले आहे.

सहा वर्षापूर्वी नवी मुंबईमध्ये पालिका, सिडको, एमआयडीसीमधील काही अवैध बांधकामे रोखण्यासाठी न्यायालयाने सविस्तर आदेश दिले होते. तसेच कारवाई करताना हद्दीचा वाद होणार नाही, यासाठी या तिन्ही प्रशासनाने विशेष सेलची स्थापना करावी, असे न्यायालयाने आदेशात नमूद केले आहे. याच्यासह अनेक गोष्टी या आदेशामध्ये नमूद करण्यात आल्या होत्या मात्र अद्याप त्याची अंमलबजावणी झालेली नाही. तसेच प्रशासन आणि त्यांच्या अधिकाऱ्यांचा असा निष्काळजीपणा आम्ही खपवून घेणार नाही, असेही न्यायालयाकडून बजावण्यात आले आहे

# दिवा शहरातील शिवसैनिक धनुष्यबाणासोबत - रमाकांत मढवी

### शिंदेंनाच पुन्हा मुख्यमंत्री करण्यासाठी काम करणार

**प्रतिनिधी**
**■ दिवा**

शिवसेना दिवा शहरप्रमुख रमाकांत मढवी यांना विधानसभेची उमेदवारी नाकारल्यामुळे दिवा शहरातील सर्व नगरसेवक, प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते हे मोठ्या प्रमाणात नाराज झाले होते. सदर नाराजी वेगवेगळ्या समाज माध्यमांसमोर जाहीरपणे मांडली जात होती. पक्षाने उमेदवारी नाकारल्यानंतर शेकडो कार्यकर्त्यांनी रमाकांत मढवी यांची मध्यरात्री भेट घेतली व जोपर्यंत भूमिका स्पष्ट केली जात नाही तोपर्यंत इथून जाणार नाही अशी ठाम भूमिका सर्व कार्यकर्त्यांनी घेतली होती. त्यावेळी रमाकांत मढवी यांनी आपण पुढील चार दिवसात आपली भूमिका स्पष्ट करू व तोपर्यंत मी निवडणूक प्रक्रियेत सहभाग घेणार नाही असं आश्वासन उपस्थित कार्यकर्त्यांना दिलं होतं. त्यानुसार आज दुपारी बारा वाजता दिवा शहरातील सर्व प्रमुख पदाधिकारी, नगरसेवक, महिला कार्यकर्ते, युवासेना व शिवसैनिक यांनी दिवा पूर्व येथील नरहरी समाज मंदिर येथे हजारोंच्या संख्येने उपस्थित राहून तोबा गर्दी केली होती. या बैठकीत उपस्थित सर्व महिला कार्यकर्त्यांनी आपल्या मनातील नाराजी व रोष यावेळी व्यक्त केला तसेच उपस्थित सर्व



पदाधिकारी आणि शिवसैनिकांनी रमाकांत मढवी जे ठरवतील तीच भूमिका घेण्याचे जाहीर केले.

यावेळी सर्व उपस्थित शिवसैनिकांशी बोलताना शहर प्रमुख रमाकांत मढवी यांनी माननीय एकनाथजी शिंदे साहेब यांना पुनश्च मुख्यमंत्री करण्यासाठी आपल्याला काम करावे लागेल, मला पक्षाने उमेदवारी नाकारल्यामुळे आपण निश्चित नाराज असाल परंतु आपल्याला धनुष्यबाणासाठी काम करावं लागेल असे सांगितले. यावेळी नगरसेवक अमर पाटील, नगरसेवक दीपक जाधव, नगरसेविका दिपाली भगत, नगरसेविका सुनीता मुंडे, नगरसेविका दर्शना म्हात्रे, उपशहर प्रमुख अँड.आदेश भगत, गणेश मुंडे, विभाग प्रमुख उमेश भगत, विभागप्रमुख चरणदास म्हात्रे, विभागप्रमुख शशिकांत पाटील, विभागप्रमुख निलेश पाटील, विभागप्रमुख गुरुनाथ पाटील आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कल्याण-डोंबिवलीतील वर्दळीच्या रस्त्यांवरील फटाक्यांचे मंच हटवा

### प्रवाशांसह वाहन चालकांची मागणी

**प्रतिनिधी**
**■ कल्याण**

कल्याण डोंबिवली पालिकेच्या परवानग्या न घेता अनेक विक्रेत्यांनी कल्याण, डोंबिवली रेल्वे स्थानक परिसर, अंतर्गत गल्ल्यांमध्ये वाहतुकीला अडथळा होईल अशा पध्दतीने फटाके विक्रीचे मंच उभारले आहेत. या मंचांमुळे गेल्या आठवडाभर प्रवाशांनी दिवाळी सणामुळे त्रास सहन केला. आता दिवाळी संपल्याने पालिकेने वाहतुकीला अडथळा ठरणारे फटाके विक्रीचे मंच तातडीने हटवावेत, अशी मागणी प्रवाशांकडून केली जात आहे.

विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता सुरू आहे. याच कालावधीत दिवाळी सण आला. पालिकेचा बहुतांशी अधिकारी, कर्मचारी वर्ग निवडणूक कामात व्यस्त आहे. त्यामुळे फटाके विक्रेत्यांना पालिकेतून विहित वेळेत मंच उभारणीची परवानगी मिळाली नाही.




बहुतांशी विक्रेत्यांनी वर्दळीच्या रस्त्यांवरील मिळेल त्या मोक्याच्या जागा बळकावून तेथे मंच उभारले. हे विक्रेते राजकीय मंडळींचे समर्थक होते. एका बड्या राजकीय नेत्याने पालिका आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांना संपर्क करून दिवाळीचे पाच दिवस फटाके विक्री मंचावर कारवाई करू नये अशी मागणी केली होती.

या मागणीचा विचार करून पालिका अधिकाऱ्यांनी वाहतुकीला अडथळा होऊनही या मंचांकडे दुर्लक्ष केले. या फटाके विक्री मंचांमुळे मागील पाच दिवस कल्याण, डोंबिवली शहरे वाहतूक कोंडीत अडकली होती. पालिका, पोलीस कोणीही फटाके विक्रेत्यांना रस्ता का अडविला म्हणून जाब विचारत नव्हते किंवा त्यांच्यावर कारवाई करत नव्हते. त्यामुळे प्रवाशांसह वाहन चालकांची सर्वाधिक अडचण झाली होती.

# डोंबिवलीतील कोपरमध्ये स्थगिती आदेश देऊनही बेकायदा बांधकामाची उभारणी सुरूच

### शासन, केडीएमसीचे आदेश बांधकामधारकांकडून दुर्लक्षित

**प्रतिनिधी**
**■ डोंबिवली**

डोंबिवली पश्चिमेतील कोपर भागात चरू बामा म्हात्रे शाळेच्या पाठीमागे अधिकृत कृष्णा टॉवरच्या बाजुला बांधकामधारकांनी गेल्या महिन्यापासून रस्ता बंद करून बेकायदा इमारतीची उभारणी सुरू केली आहे. या बेकायदा बांधकामाविषयी शासन, कल्याण डोंबिवली पालिका आयुक्तांकडे तक्रारदाराने तक्रार केल्यावर पालिकेच्या ह प्रभागाचे साहाय्यक आयुक्त राजेश सावंत यांनी तातडीने हे बांधकाम थांबविण्याचे आदेश संबंधित बांधकामधारकांना दिले आहेत.



बांधकामे उभे राहत असलेल्या जमिनीची मालकी हक्काची कागदपत्रे, पालिकेच्या बांधकाम परवानग्या इतर आवश्यक कागदपत्रे पालिकेच्या ह प्रभागात दाखल करण्याचे आदेश साहाय्यक आयुक्त सावंत यांनी बांधकामधारकांना दिले आहेत.

गेल्या सहा महिन्यापासून बांधकामधारक चरू बामा म्हात्रे शाळेमागील कॅप्टन तुकाराम हश्या म्हात्रे मार्गावरील वर्दळीचा रस्ता बंद करून कृष्णा टॉवरच्या बाजुला एका बेकायदा इमारतीची उभारणी करत आहेत. या बेकायदा इमारतीच्या चारही बाजुने तीन ते सहा मीटर मोकळी जागा नाही. सामासिक अंतर न ठेवता या बेकायदा इमारतीची उभारणी केली जात असल्याने या इमारतीच्या लगतच्या इमारतींमधील रहिवासी त्रस्त आहेत.

या बेकायदा इमारतीवर कारवाई करावी म्हणून गेल्या दीड महिन्यापासून जागरूक नागरिक विनोद जोशी मुंबईतील आझाद मैदानात उपोषणाला बसले आहेत. नगरविकास विभागाने या उपोषणाची दखल घेतली. कल्याण डोंबिवली पालिका आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांना संबंधित बेकायदा इमारतीवर कारवाई करण्याचे सूचित केले. ह प्रभागाचे साहाय्यक आयुक्त सावंत यांनी कोपर येथे जाऊन म्हात्रे शाळेमागील बेकायदा बांधकामांचा पंचांच्या उपस्थितीत पंचनामा केला. हे बांधकाम राजकीय आशीर्वादने सुरू असल्याची माहिती उपस्थितांनी दिली.

# सिडकोच्या 26 हजार घरांच्या अर्जनोंदणीसाठी अखेरचे 7 दिवस

**प्रतिनिधी**
**■ नवी मुंबई**

सिडकोच्या महागृहनिर्माण योजनेला चांगला प्रतिसाद मिळत असून आतापर्यंत ६८ हजार इच्छुकांनी या महागृहनिर्माणात घर मिळावे यासाठी अर्जनोंदणी केली आहे. ११ नोव्हेंबरपर्यंत ऑनलाईन अर्ज नोंदणीची अखेरची मुदत सिडकोने जाहीर केल्यामुळे अखेरचे सात दिवस इच्छुकांसाठी शिल्लक आहेत. म्हाडाने नूकत्याच काढलेल्या २ हजार घरांच्या सोडतीमध्ये तब्बल १ लाखांहून अधिक अर्जदारांनी सहभाग घेतला होता. मात्र सिडको महामंडळाने दस-याच्या मुहूर्तावर 'माझे पसंतीचे सिडकोचे घर' या २६ हजार घरांच्या जाहीर केलेल्या महागृहनिर्माण योजनेतील घरांच्या किंमती अजूनही जाहीर न केल्याने इच्छुकांमध्ये संभ्रम कायम आहे. पहिल्याच दिवशी या योजनेत २४ तासांतच १२,४०० ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यामुळे सर्वाधिक अर्जनोंदणी होईल अशी अपेक्षा सिडकोच्या पणन विभागाला होती. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस) व अल्प उत्पन्न गटासाठी (एलआयजी) या दोन उत्पन्न गटात सिडकोचे संकेतस्थळ https:\. cidcohomes.com यावर हे अर्ज नोंदणी होत आहेत.




नवी मुंबईच्या विविध उपनगरांमध्ये सिडको मंडळाने ६७ हजार घरांचे बांधकाम हाती घेतले आहे. याच घरांपैकी पहिल्या टप्प्यांतील २६ हजार घरे ग्राहकांना उपलब्ध केली आहेत. यातील निम्मी म्हणजे सूमारे १३ हजार घरे तळोजा परिसरात आहेत. अपुरा पाणी पुरवठा, हवेतील प्रदूषण आणि दळणवळणाचे मेट्रो वगळता इतर पर्याय कमी असल्याने तळोजातील घरांना कमी प्रतिसाद मिळत आहे. सिडको मंडळाने परिवहन केंद्रित विकास तथा ट्रान्झिट ओरिएन्टेड डेव्हलपमेंट या संकल्पनेवर या घरांची निर्मिती केली आहे.

# सिगारेट मागितली म्हणून हत्येचा प्रयत्न

**प्रतिनिधी**
**■ ठाणे**

भिवंडी येथील निजामपूरा भागात सिगारेट मागितली म्हणून एका तरुणाला चाकूने भोसकल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेत तरुण जखमी असून त्याच्यावर ठाणे महापालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी निजामपूरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भिवंडीतील निजामपूरा भागात २९ वर्षीय जखमी तरुण वास्तव्यास आहे. रविवारी रात्री ११.३० वाजताच्या सुमारास तो राज्य परिवहन सेवेच्या (एसटी) आगारात फेरफटका मारण्यासाठी गेला होता. त्यावेळी त्याचे तीन मित्र त्याठिकाणी उपस्थित होते. यातील एकाकडे त्याने सिगारेटची मागणी केली. याचा राग आल्याने दोघांमध्ये वाद निर्माण झाला. या वादात दुसऱ्या एका मित्राने तरुणाला पोटात भोसकले. या घटनेत तरुण गंभीर जखमी झाला. त्याला उपचारासाठी कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# ठाण्यात दिवाळी काळात आगीच्या घटनांमध्ये वाढ

### चार दिवसांत 33 ठिकाणी लागली आग

**प्रतिनिधी**
**■ ठाणे**

ठाणे महापालिका क्षेत्रात दिवाळी काळात फटाक्यांच्या आतषबाजीमुळे हवा आणि ध्वनी प्रदुषणात वाढ झाल्याचे समोर आले असतानाच, त्यापाठोपाठ आता दिवाळी काळातील चार दिवसांत संपुर्ण शहरात एकूण ३३ आगीच्या घटना घडल्या आहेत. या घटनांमध्ये जिवीतहानी झालेली नसून त्याचबरोबर गेल्यावर्षीच्या तुलनेत यंदा आगीच्या घटनांमध्ये घट झाली आहे. या आगीची नेमकी कारणे अद्याप समजू शकलेली नसली तरी फटाके तसेच



अन्य कारणांमुळे आग लागण्याच्या घटना घडल्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे.

ठाणे महापालिका क्षेत्रात मोठ्या उत्साहात दिवाळी साजरी करण्यात येते. दिवाळीनिमित्ताने सर्वत्र फटाक्यांची आतषबाजी करण्यात येते. गेल्या वर्षी प्रमाणेच यंदाही नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर फटाके फोडले. ठाणे पालिका प्रशासनाकडून दिवाळी काळात हवा गुणवत्तेची तपासणी करण्याबरोबर ध्वनी पातळीचे मापन करण्यात येते. यंदाच्या तपासणीत दिवाळीच्या काळात ध्वनी आणि वायू या दोन्हीत वाढ नोंदवली गेली आहे. परंतु यंदा हरित फटाक्यांचा वापर वाढला असल्यामुळे गेल्या दोन वर्षांपेक्षा यंदा ध्वनी आणि वायु प्रदुषण कमी असल्याचा दावा पालिकेने केला आहे. असे असतानाच, दिवाळी काळात शहरात आगीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे दिसून येते.

# 'दिवाळी पहाट'च्या माध्यमातून ठीकठिकाणी मतदारांमध्ये जनजागृती मोहीम

**प्रतिनिधी**
**■ नवी मुंबई**

20 नोव्हेंबर रोजी होणा-या विधानसभा सार्वत्रिक निवडणूक संपूर्ण राज्यात एकाच दिवशी होत असून यामध्ये प्रत्येक नागरिकाने आपला मतदानाचा हक्क कर्तव्य भावनेने बजावावा याकरिता मतदार जागरुकता कार्यक्रम मोठया प्रमाणावर राबविण्यात येत आहेत. यामध्ये दिवाळी कालावधीत ठिकठिकाणी आयोजित केल्या जाणा-या दिवाळी पहाट सांगितिक उपक्रमांमध्येही 150 ऐरोली व 151 बेलापूर विधानसभा मतदारसंघाच्या स्वीप कार्यक्रमाशी संबधित अधिका-यांनी तसेच महानगरपालिकेच्या संबधित विभाग कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी यांनी उपस्थित राहून नागरिकांचे मतदानाविषयी प्रबोधन केले.



वाशीतील विष्णुदास भावे नाटयगृहात 1 व 3 नोव्हेंबर रोजी आयोजित दिवाळी पहाट कार्यक्रमाप्रसंगी मोठया संख्येने उपस्थित नागरिकांना मतदान करण्याविषयी आवाहन करण्यात आले. तसेही नाटयगृहामध्ये दररोज होणा-या नाटयप्रयोग व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या सुरुवातीला, मध्यंतरात व कार्यक्रम संपल्यानंतर मतदान करण्याचे आवाहन करणारी ध्वनीफित प्रसारित करण्यात येत आहे.

अशाचप्रकारे ज्वेल ऑफ नवी मुंबई नेरुळ येथे, करावेगाव येथे तसेच ऐरोली येथे शिवकॉलनी व विविध ठिकाणी आयोजित दिवाळी पहाटच्या सांगितीक कार्यक्रमांप्रसंगी स्वीप पथकाने उपस्थित राहत मतदान करण्याविषयी आवाहन करत जागरुकता निर्माण केली. राजर्षी शाहू महाराज विद्यालय, आंबेडकरनगर, रबाळे येथील दिवाळी संध्या उपक्रमातही मतदार जनजागृती करण्यात आली.

भाऊबीजेच्या दिवशी स्वीप पथकातील महिला कर्मचा-यांनी ऐरोली येथील अग्निशमन केंद्रामध्ये जाऊन अग्निशमन अधिकारी, कर्मचारी यांची ओवाळणी केली व त्यांना ओवाळणी म्हणून 20 नोव्हेंबरला मतदान करण्याचे आवाहन केले.

त्याचप्रमाणे मागील निवडणूकीत कमी मतदान झाले आहे अशा विभागांमध्ये मतदार जनजागृती करण्याबाबत विशेष भर देण्यात येत असून मतदानाची टक्केवारी वाढविण्याकडे बारकाईने लक्ष दिले जात आहे. याचाच एक भाग म्हणून यादव नगर ऐरोली परिसरात घराघरात स्वीप कार्यक्रमांतर्गत जनजागृती करण्यात आली तसेच तेथील रिक्षा स्टँडच्या ठिकाणी रिक्षा चालकांची ओवाळणी करुन मतदानाचे आवाहन करण्यात आले. याशिवाय परिसरात रिक्षाव्दारे आवाहन करण्यात आले.

नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबईतील 150 व 151 विधानसभा मतदारसंघाचे स्वीप नोडल अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त श्री. सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली 150 ऐरोली विधानसभा मतदार संघाच्या स्वीप नोडल अधिकारी तथा उपआयुक्त श्रीम. अभिलाषा म्हात्रे व 151 बेलापूर विधानसभा मतदार संघाचे स्वीप नोडल अधिकारी तथा सहा. आयुक्त श्री. सागर मोरे यांच्या माध्यमातून स्वीप पथकांच्या वतीने विविध माध्यमांतून व्यापक जनजागृती करण्यात येत आहे.

# कल्याणमध्ये भाजपाची बंडखोरी कायम, मतविभाजनाचा मोठा फटका बसणार?

**प्रतिनिधी**
**■ कल्याण**

पश्चिम विधानसभा निवडणुकीच्या रिंगणातून काँग्रेसचे नेते राजाभाऊ पातकर यांनी माघार घेतल्याने महाविकास आघाडीची ताकद वाढली असून भाजपाचे शहर अध्यक्ष वरुण पाटील यांनी आपली बंडखोरी कायम ठेवल्याने महायुतीला त्यांच्या आगामी निवडणुकीत मतविभाजनाचा मोठा फटका बसण्या शक्यता वर्तवली जात आहे.

सोमवारी अर्ज मागे घेण्याची मुदत संपली तेव्हा भाजपचे माजी आमदार नरेंद्र पवार यांनी माघार घेतली. यामुळे आता कल्याण पश्चिम विधानसभेत महायुतीचे उमेदवार विद्यमान आमदार विश्वनाथ भोईर, महाविकास आघाडीचे उमेदवार



सचिन बासरे, मनसेचे उमेदवार उल्हास भोईर आणि भाजप बंडखोर वरुण पाटील यांच्यात चौरंगी लढत पाहायला मिळणार आहे.

विधानसभा निवडणुकीसाठी अर्ज मागे घेण्याची सोमवारी दुपारी ३ वाजेपर्यंतची वेळ होती. त्यामुळे भाजपचे माजी आमदार नरेंद्र पवार आणि विद्यमान शहराध्यक्ष वरुण पाटील हे दोघेही काय भूमिका घेतात याकडे लक्ष लागले होते. कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघामध्ये शिवसेना भाजप राष्ट्रवादी महायुतीचे अधिकृत उमेदवार म्हणून विद्यमान आमदार विश्वनाथ भोईर यांनाच पुन्हा उमेदवारी जाहीर झाली आहे. मात्र त्याविरोधात भाजपचे कल्याण पश्चिमेचे माजी आमदार नरेंद्र पवार आणि विद्यमान शहराध्यक्ष वरुण पाटील यांनी दंड थोपटत आपापले उमेदवारी अर्ज दाखल केले होते.

हे अर्ज मागे घेण्यासाठी गेल्या काही दिवसांपासून पक्षश्रेष्ठींकडून पवार आणि पाटील या दोघांच्याही मनधरणीचे प्रयत्न सुरू होते. या मनधरणीला काही प्रमाणातच यश आलं आणि नरेंद्र पवार यांनी आपला अर्ज मागे घेतला, तर वरुण पाटील यांनी मात्र निवडणुकीच्या रिंगणात उभं राहणं पसंत केलं आहे.

## कार्यक्रमातून उलगडला संत मुक्ताबाईंचा जीवनप्रवास

**पुणे:** भक्तांप्रती असलेला मातृत्वभाव, भक्तीयोगात प्राप्त केलेले उच्च स्थान, सामान्य जीवांना परब्रह्माचे दर्शन घडविण्याची आध्यात्मिक तयारी असणाऱ्या आदिशक्ती मुक्ताबाईंचा अलौकिक जीवनप्रवास 'ब्रह्मचित्कला मुक्ताई' या कार्यक्रमातून उलगडला. महाराष्ट्राला अनमोल आणि अमोघ अशी संत परंपरा लाभली आहे. दिवाळीच्या शुभेच्छा देतानाच संस्कारमूल्य जपणारी एक तरी पणती आपणही लावावी या उद्देशाने पंडित हेमंत पेंडसे यांनी संत मुक्ताबाई यांच्या जीवनकार्यावर आधारित 'ब्रह्मचित्कला मुक्ताई' या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कीर्तनाच्या धाटणीतून आणि अभंगांची जोड देत संत मुक्ताबाई यांचा जीवनपट भावपूर्णतेने पुणेकरांसमोर मांडण्यात आला. पंडित हेमंत पेंडसे, प्रख्यात कीर्तनकार रोहिणी माने-परांजपे यांच्यासह राधिका ताम्हनकर, मेहेर परळीकर यांचा सहभाग होता. अमित वेणू (बासरी), कौस्तुभ परांजपे (ऑर्गन), अजित किंबहुने (तबला), उद्धव गोळे (पखावज), स्वप्नील कुंभार (टाळ) यांनी साथसंगत केली.



# दम नव्हता तर उभेच राहायचे नव्हते

## अखेरच्या क्षणी मधुरिमांनी अर्ज मागे घेतल्याने राजेंवर पाटील भडकले...

प्रतिनिधी
■ कोल्हापूर

कोल्हापूरमध्ये अर्ज मागे घेणाच्या शेवटच्या दिवशी जोरदार राडा बघायला मिळाला आहे. कोल्हापूर उत्तरच्या कॉंग्रेसच्या उमेदवार मधुरिमाराजे यांनी शेवटच्या क्षणी उमेदवारी अर्ज मागे घेतला, त्यामुळे सतेज पाटलांना हा मोठा धक्का मानला जात आहे. यावर सतेज पाटील यांनी देखील संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. तसेच मधुरिमाराजे यांच्या उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या मागे स्वतः शाहू महाराज असल्याचे समोर आले आहे. शाहू महाराजांच्या आदेशानंतर मालोजीराजे यांनी मधुरिमाराजे यांचा हात पकडत बाहेर आणले व उमेदवारी अर्ज मागे घेतला असल्याचे समोर आले आहे.

या सगळ्या राजकीय राड्यानंतर सतेज पाटील मात्र चांगलेच संतापलेले बघायला मिळाले. सतेज पाटील म्हणाले, दम नव्हता तर उभारायचं नव्हतं ना मग, मी पण दाखवली असती माझी ताकद. माझी फसवणूक केली, हे काही बरोबर नाही झाले, अशी संतप्त प्रतिक्रिया त्यांनी दिली. ज्या लोकांनी





आग लावायचे काम केले त्यांना सोडणार नाही, असा इशारा देखील त्यांनी दिला आहे.

कोल्हापूर उत्तर विधानसभेसाठी माजी नगरसेवक राजू लाटकर यांच्या नावाची घोषणा करण्यात आली होती. मात्र पक्षाने एका दिवसातच उमेदवारी बदलली आणि मधुरिमाराजे यांना उमेदवारी दिली. त्यानंतर एकाच घरात दोन पदे नको म्हणून शाहू महाराजांनी मधुरिमाराजे यांना उमेदवारी अर्ज मागे घेण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार मालोजीराजे यांनी मधुरिमाराजे यांचा हात पकडत त्यांचा उमेदवारी अर्ज मागे घ्यायला लावले आहे.राजू लाटकर यांनी बंडखोरी करत उमेदवारी अर्ज मागे घेण्यास नकार दिला होता. यावेळी त्यांनी शाहू महाराजांची दोन वेळा भेट देखील घेतली होती. त्यामुळे कॉंग्रेससमोर मोठा प्रश्न निर्माण झाला होता. त्यामुळे मधुरिमाराजे यांना उमेदवारी अखेर शेवटच्या क्षणी मागे घ्यावी लागली आहे.

## माघार घेऊन रणांगणातून पळाले, उद्या इतिहासजमा होतील...

### लक्ष्मण हाकेंची जरांगेवर बोचरी टीका





प्रतिनिधी
■ पुणे

आरक्षण मुद्द्यावरुन मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे आणि ओबीसी समाजाचे नेते लक्ष्मण हाके यांच्यातील वाद संपूर्ण महाराष्ट्राने पाहिला. मनोज जरांगे यानी विधानसभा लढवण्याची घोषणा केली होती. पण उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख जवळ आली असताना जरांगेंनी माघार घेतली. यावर आता सर्व स्तरातून प्रतिक्रिया येतेय. लक्ष्मण हाके यांनी यावरुन जरांगेवर निशाण साधलाय. 'झी 24 तास'च्या विशेष मुलाखतीत ते बोलत होते.

मनोज जरांगेंनी माघार घेऊन रणांगणातून पळ काढला. सरकार तुमची बाजू ऐकत नसेल तर जनतेच्या दरबारात जाऊन भूमिकेचे समर्थन मिळवण्याची संधी होती. पण जरांगे कोणाच्या तरी सांगण्यावरुन आंदोलन करतात, असा आरोप लक्ष्मण हाके यांनी केला. लोकसभेवेळी महाविकास आघाडीच्या बाजूने सभा घेतल्या. यात महायुतीतले काही लोक आहेत. जरांगेच्या मतांची भीती वाटणाऱ्यांना ओबीसी, व्हीजीएनटीच्या मतांचं काही वाटत नाही, याची खंत वाटत असल्याचे ते म्हणाले. मग शरद पवार खरंच पुरोगामी आहेत का? असा प्रश्न आम्हाला पडतो, असे ते म्हणाले. सर्वोच्च न्यायालयाचा आदेश असतानाही फुले, शाहू, आंबेडकरांच्या महाराष्ट्रात इम्पेरिकल डेटा गोळा केला नसल्याचे हाके म्हणाले.

मी संविधानाच्या बाजूने बोलतो. संविधानाची शपथ घेऊन मंत्रिपदावर गेलेल्यांची जबाबदारी आहे. आम्हाला सामाजिक न्यायासह समता निर्माण करायची आहे. बेकायदा मागण्या करायच्या, सुप्रीम कोर्टाने वेळोवेळी वेगळी भूमिका घेतली आहे. मराठा समाजाला कुणबी समजणं म्हणजे सामाजिक मुर्खपणा असेदेखील म्हटले गेले असल्याचे लक्ष्मण हाके म्हणाले. संदिपान भुमरेंनी वेळोवेळी जाऊन अनेकदा जरांगेंना महत्व दिलंय. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह महत्वाच्या पदावर असलेल्या नेत्यांनी ओबीसींच्या हिताच्या बाजुने ठाम भूमिका घेतली नाही. जो समाज सरासरी लाईनच्या मागे आहे. त्या लोकांचे प्रतिनिधित्व म्हणजे आरक्षण आहे, असे ते म्हणाले.

जरांगे लढले असते तर त्यांच्या मागे किती ताकद आहे ते कळले असते. त्यांच्या मागे किती मराठे आहे ते कळले असते, असे लक्ष्मण हाके म्हणाले. लोकसभेत जरांगे फॅक्टर चालला. पण भाजप नको हे नेरेटिव्ह दलित आणि मुस्लिमांमध्ये पसरले. एका जातीला आरक्षण मिळत नसतं. महाराष्ट्रात पाणी, बेरोजगार, आयटी असे अनेक प्रश्न आहेत.

## ज्येष्ठ नागरिकावर अनैसर्गिक अत्याचार

### पुण्याच्या धानोरी परिसरातील संतापजनक घटना

प्रतिनिधी
■ पुणे

एका 57 वर्षीय व्यक्तीवर दारुच्या नशेत अनैसर्गिक लैंगिक अत्याचार करण्यात आल्याची संतापजनक घटना पुण्याच्या धानोरी परिसरात घडली आहे. या प्रकरणी एका 24 वर्षीय आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, प्रिन्स प्रेमकुमार सिंग (वय-24, रा.धानोरी, पुणे) असे आरोपीचे नाव आहे. तो पीडित व्यक्तीच्या ओळखीचा आहे. आरोपीने तक्रारदार ज्येष्ठ नागरिकास दारू पाजून दारुच्या नशेत त्यांच्याशी अनैसर्गिक लैंगिक अत्याचार केला. एवढेच नाही तर त्याचे अश्लील फोटो काढून ते नातेवाईक, ओळखीचे लोक व मित्र यांच्यात व्हायरल करण्याची धमकी देत दिली. तसेच चाकूचा धाक दाखवत जीवे मारण्याची धमकीही दिली.

आरोपीने तक्रारदार व्यक्तीकडूनी नवीन मोटारसायकल व मोबाईलही




घेतला. तसेच वेळोवेळी 2 हजार, 5 हजार असे एकूण 20 ते 25 हजार रुपयेही घेतले. तो सातत्याने तक्रारदार व्यक्तीकडून पैशांची मागणी करत होता. हा त्रास सहन न झाल्यामुळे अखेर पीडित व्यक्तीने पोलिस ठाणे गाठून आपबिती कथन केली. त्यातून हा संतापजनक प्रकार उजेडात आला. या प्रकरणी विश्रांतवाडी पोलिस ठाण्यात आरोपी प्रिन्स प्रेमकुमार सिंग याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी पीडित व्यक्तीचे मागील दीड वर्षांपासून बदनामी करण्याची धमकी देत लुटमार व लैंगिक शोषण करत होता. विश्रांतवाडी पोलिस पुढील तपास करत आहेत.

## तडीपार गुंडाची कोयते उगारून दहशत

■ पुणे

तडीपार गुंडाने कोयते उगारुन दहशत माजविल्याची घटना मंगळवार पेठेत घडली. याप्रकरणी गुंडासह साथीदाराविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला. प्रतीक विजय माने (वय २३, रा. कुंजीर वस्ती, मांजरी), आकाश ज्ञानेश्वर तानवडे (वय २३, रा. जहाँगीरनगर, मुंढवा) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याबाबत पोलीस कर्मचारी चेतन होळकर यांनी फरासखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. माने सराइत गुन्हेगार असून, त्याच्याविरुद्ध गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. परिमंडळ पाचचे पोलीस उपायुक्त आर. राजा यांनी त्याला एप्रिल महिन्यात पुणे शहर, पिंपरी-चिंचवड, तसेच जिल्ह्यातून तडीपार करण्याचे आदेश दिले होते. तडीपार केल्यानंतर तो शहरात वावरत होता. 'या भागातील आम्ही दादा आहोत. आमच्या नादी लागला तर कोणाला सोडणार नाही', अशी धमकी देऊन त्याने परिसरात दहशत माजविली.

## थोरातांची शिष्टाई फळाला, बंडखोराची केली मनधरणी

### मविआच्या 180 जागा आल्यास आश्चर्य नाही

प्रतिनिधी
■ नंदुरबार

विधानसभा निवडणूक रणधुमाळीला सुरुवात झाली आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस होता. महाविकास आघाडीतील बंडखोरांनी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचे आवाहन, तिन्ही पक्षांच्या नेत्यांनी केले. काँग्रेसचे गटनेते बाळासाहेब थोरात आज नंदूरबार दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी शहादा -तळोदा मतदारसंघातील बंडखोर उमेदवाराची मनधरणी केली आणि काँग्रेसच्या अधिकृत उमेदवाराचा मार्ग मोकळा केला. तसेच त्यांनी महाविकास आघाडीला बहुमत तर मिळणारच, पण 180 जागा मिळाल्या तरी आश्चर्य वाटायला नको, असा विश्वास व्यक्त केला आहे.

काँग्रेसचे गटनेते बाळासाहेब थोरात आज नंदुरबार जिल्ह्याच्या



दौऱ्यावर होते. नंदुरबार जिल्ह्यातील शहादा तळोदा मतदार संघात काँग्रेसचे जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुहास नाईक यांनी बंडखोरी करत उमेदवारी अर्ज दाखल केला होता. या बंडखोरीला रोखण्यासाठी पक्ष श्रेष्ठींकडून प्रयत्न करण्यात येत होते. आज (सोमवार) काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात यांनी नाईकांसोबत चर्चा केली. सुहास नाईक यांच्या घरी जात त्यांनी त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला आणि त्यानंतर लगेचच सुहास नाईक यांनी उमेदवारी अर्ज माघार घेण्याची घोषणा केली. त्यामुळे काँग्रेस तथा महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार राजेंद्र गावित यांना मोठा फायदा होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. सुहास नाईक यांच्या भेटीनंतर बाळासाहेब थोरात यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले की, राज्यात महाआघाडीच्या 180 जागा आल्यास आश्चर्य वाटू नये. मुख्यमंत्रीपदाच्या प्रश्नावर थोरात म्हणाले की, आम्हाला पहिले महायुतीचे सरकार घालवणे महत्त्वाचे आहे. कारण त्यांचे सरकार संविधानाविरोधी आहे.

## अर्ज माघारीदरम्यान भाजप-ठाकरे गटाचे कार्यकर्ते भिडले

### अकोला जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रकार

प्रतिनिधी
■ अकोला

अकोल्यात निवडणूक अर्ज मागे घेतेवेळी शिवसेना ठाकरे गटाचे कार्यकर्ते आणि भाजप कार्यकर्त्यांमध्ये बाचाबाची झाल्याचे पाहण्यास मिळाले. जिल्हाधिकारी कार्यालयातल्या अकोला पश्चिम निवडणूक कार्यालयासमोरच हा प्रकार घडला आहे. यामुळे काहीवेळ तणावाचे वातावरण झाल्याचे पाहण्यास मिळाले.

अकोला पश्चिम मतदारसंघातील ठाकरे गटाचे बंडखोर उमेदवार राजेश मिश्रा यांचे बंड कायम राहिले आहे. राजेश मिश्रा यांनी अकोला पश्चिम मतदारसंघातून आपला अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला होता. महाविकास आघाडीकडून ते इच्छुक होते. मात्र, मविआमध्ये हा मतदारसंघ काँग्रेसच्या वाटेवर गेला.



त्यामुळे मिश्रा हे नाराज होते. त्यांनी काँग्रेसचे उमेदवार साजिद खान पठाण यांच्या विरोधात बंड पुकारत अपक्ष उमेदवारी दाखल केला होता.

दरम्यान आज माघारीचा दिवस असल्याने कोण माघारी घेणार यानंतर मतदारसंघातील चित्र स्पष्ट होणार आहे. मात्र राजेश मिश्रा यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे न घेण्याचा निर्णय घेतला आहे. राजेश मिश्रा हे ठाकरे गटाचे माजी नगरसेवक आणि शिवसेना शहर प्रमुख आहेत. तर ठाकरे गटाचे शहर प्रमुख आणि बंडखोर अपक्ष उमेदवार राजेश मिश्रा आणि भारतीय जनता युवा मोर्चाचे शहराध्यक्ष पवन महल्ले यांच्यात राजेश मिश्रा यांनी उमेदवारी मागे न घेतल्यामुळे भाजपच्या उमेदवाराची मते कापली जाणार असल्याने भाजप कार्यकर्त्यांनी राजेश मिश्रा याना विरोध केला. यावरून दोन्ही बाजूचे कार्यकर्ते एकमेकांच्या अंगावर धावले. मात्र पोलिसांनी मध्यस्थी केल्याने पुढचा वाद टळला आहे.

## निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची गाडी पेटवली

### दृष्टिहीन उमेदवाराचे कृत्य, पोलिसांनी घेतले ताब्यात



प्रतिनिधी
■ पुणे

विधानसभा निवडणुकीचे रणसंग्राम सुरु आहे. निवडणुकीच्या रिंगणात उमेदवारांनी दाखल केलेल्या अर्जाची आज माघारीचा दिवस होता. यामुळे निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात वर्दळ होती. दरम्यान चिंचवड विधानसभा निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात एका अधिकाऱ्याची चारचाकी वाहन एका दिव्यांग व्यक्तीने आग लावून पेटवून दिल्याचा प्रकार घडला आहे.

सदरच्या घटनेमुळे पिंपरी-चिंचवड शहरात मोठी खळबळ उडाली आहे. थेरगाव येथील पिपरी चिंचवड महापालिकेच्या ग क्षेत्रीय कार्यालय आहे. त्या ठिकाणी सध्या चिंचवड विधानसभा निवडणुकीचे कामकाज सुरू आहे. याच ठिकाणी चिंचवड विधानसभेचे निवडणूक निर्णय अधिकारी यांचे देखील कार्यालय आहे. त्याच कार्यालयात अगदी काही मिनिटापूर्वी एका दिव्यांग व्यक्तीने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या एका अधिकाऱ्याची चार चाकी वाहनाला आग लावून पेटवून दिला आहे. विधानसभा निवडणुकीची सध्या वर्दळ सुरु आहे. याच वेळी हा प्रकार घडल्याने परिसरात खळबळ उडाली होती.

## स्पेशल विमान पाठवूनही माघार नाहीच, विखे पाटलांची डोकेदुखी वाढली

### शिर्डीत फडणवीसांची शिष्टाई निष्फळ

प्रतिनिधी
■ शिर्डी

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक 2024 साठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज अखेरचा दिवस होता. बंडखोरांच्या मनधरणीसाठी महायुती आणि महाविकास आघाडीकडून जोरदार प्रयत्न केले गेले. शिर्डी विधानसभा मतदारसंघात भाजप नेते डॉ. राजेंद्र पिपाडा यांनी बंडखोरी केली होती. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोन दिवसापूर्वी पिपाडा यांना स्पेशल विमानाने बोलवून घेत त्यांची मनधरणी करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र शिर्डी विधानसभा मतदारसंघात बंडखोरी कायम राहिली आहे. त्यामुळे आता मविआकडून प्रभावती घोगरे , महायुतीकडून राधाकृष्ण विखे पाटील तर अपक्ष राजेंद्र पिपाडा यांच्यात तिरंगी लढत पाहायला मिळणार आहे.



शिर्डी विधानसभा मतदारसंघात भाजपच्या राजेंद्र पिपाडा यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला होता. भाजपकडून राजेंद्र पिपाडा यांची बंडखोरी शमवण्यासाठी भाजपकडून प्रयत्न केले जात होते. राजेंद्र पिपाडा आणि त्यांच्या पत्नीला मुंबईत चर्चेला आणण्यासाठी भाजपकडून शिर्डीत स्पेशल चार्टड फ्लाईट पाठवण्यात आले होते. मात्र भाजपचे प्रयत्न निष्फळ ठरले. शिर्डी विधानसभा मतदारसंघात राधाकृष्ण विखे पाटील भाजपाचे अधिकृत उमेदवार आहेत. गेल्या काही महिन्यांपासून राजेंद्र पिपाडा राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर टीका करत होते. शिर्डी विधानसभा मतदारसंघात महायुतीतील बंडखोरी रोखण्यासाठी स्वतः उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना प्रयत्न केले.

# राहुल, सम्राट आणि सत्यजित ही जोडी शिराळ्याला नक्की वैभवाचे दिवस आणतील!

## भाजपा गटनेते दरेकरांनी व्यक्त केला विश्वास

प्रतिनिधी
■ सांगली

येथील शिराळा विधानसभा मतदारसंघाचे भाजपा महायुतीचे उमेदवार सत्यजित देशमुख यांच्या प्रचारार्थ सम्राट महाडिक यांच्या महाडिक युवा शक्ती संघटनेमार्फत 'विजयाचा निर्धार' मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याला भाजपा विधानपरिषद गटनेते आमदार प्रविण दरेकर यांची प्रमुख उपस्थिती होत.शिराळयात इतिहास घडवायचा आहे. राहुल, सम्राट आणि सत्यजित ही जोडी शिराळयाला नक्की वैभवाचे दिवस आणतील, असा विश्वास यावेळी दरेकरांनी व्यक्त केला.

यामेळाव्याला भाजपा महायुतीचे उमेदवार सत्यजित देशमुख, भाजपचे तरुण तडफदार नेते सम्राट महाडिक, राहुल महाडिक, संपतराव देशमुख, फत्तेसिंह देशमुख, भाजपा जिल्हध्यक्ष हणमंतराव पाटील यांसह आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

मेळाव्यात बोलताना दरेकर म्हणाले कि, आज ऐतिहासिक क्षण आहे. उमेदवारी मागणारा नेता उमेदवारी मागे घेतो. आपल्या पक्षासाठी, नेतृत्वासाठी, मी पक्षाने दिलेल्या उमेदवाराला निवडून आणेन अशा मोठया मनाचे सम्राट महाडिक या सभेतून आपल्याला दिसले. उमेदवारी मिळवणे, मागणे आणि ती



नाकारल्यानंतर आपली, कार्यकर्त्यांची मानसिक अवस्था काय होते हे मी एकदा नव्हे तर चार वेळा भोगलेय. सर्व प्रक्रियेतून मी गेलोय. सम्राट महाडिक तुम्ही शिराळयाच्या विकासासाठी जो काही त्याग केलात तो भाजपा आणि देवेंद्र फडणवीस व्याजासकट भरून देणार हा शब्द जाहीरपणे देण्यासाठी मी आलो असल्याचे दरेकर म्हणाले. तसेच ही पवित्र भूमी शिराळयाची आहे. ही सभा सम्राट महाडिक व महाडिक कुटुंबियांसाठी कार्यकर्त्यांनी आभार सभा म्हणून घेतलीय. मोठ्या मनाचा माणूस म्हणून शिराळयाच्या इतिहासात सम्राट महाडिक आपली नोंद झाल्याशिवाय राहणारनाही, असा विश्वाही दरेकरांनी दिला.

दरेकर पुढे म्हणाले कि, महाराष्ट्राच्या विकासासाठी देवेंद्र फडणवीस पाच वर्ष राज्याचे मुख्यमंत्री होते. परंतु ठाकरे यांच्या कार्यकाळात महाराष्ट्र ठप्प झाला होता. अशा वेळी पाच वर्ष मुख्यमंत्री असलेल्या फडणवीसांनी विडा उचलला राज्यात सत्ता बदल केला पाहिजे, अन्यथा राज्य अधोगतीला जाईल. त्यानंतर शिंदे, अजित पवारांना बरोबर घेऊन राज्यात महायुती सरकार स्थापन झाले. तिथे फडणवीसांनी विचार केला नाही मी मुख्यमंत्री होतो उपमुख्यमंत्री म्हणून काम कसे करणार. शिंदे, अजित पवारही मोठे नेते त्यांनीही विचार केला नाही. सत्ता ही महाराष्ट्राच्या विकासासाठी आहे हा एकच विचार त्यांनी केला. महाराष्ट्राच्या विकासासाठी एकत्र आले. तोच पायंडा आपण पाडतोय. शिराळयाच्या विकासासाठी एकत्र आलात. ही शिराळयाची जनता आयुष्यभर आपल्याला धन्यवाद दिल्याशिवाय राहणार नाही, असेही दरेकर म्हणाले. तसेच 'आज आहे प्रसंग बाका, शिराळयाचा विजय करेल पेट नाका, पेट नाका, असे सांगत सम्राट महाडिक यांच्यासारख्या कार्यकर्त्याची महाराष्ट्राला गरज आहे. तुमच्यासारख्या हिऱ्याला पैलू पाडण्याचे काम देवेंद्र फडणवीस केल्याशिवाय राहणार नाही, असा शब्दही दरेकरांनी यावेळी उपस्थितांसमोर दिला.

***विजयाचा गुलाल उधळायची संधी द्या!***

*दरेकर म्हणाले कि, सम्राट महाडिकांचा सन्मान होणार. विधिमंडळ म्हणा किंवा त्याहीवर जाऊन त्यांचा सन्मान झालेला निवडणुकीत दिसेल. त्यांचा सन्मान हा तुमचा सन्मान आहे. मघाशी कोणीतरी म्हटले कि सम्राटरावांना विमान पाठवले, बाकीचे म्हणाले आम्हाला का नाही पाठवले. विमान हे येड्यागबाळ्याला पाठवत नाही. सम्राट महाडिक यांच्या हातात शिराळ्याची कमान आहे म्हणून त्यांना विमान पाठवले. देवेंद्र फडणवीस यांनी जो विश्वास दिलाय त्याला तडा जायला देणार नाही. आम्हाला विजयाचा गुलाल उधळायची संधी द्या, फडणवीसांना सांगू शिराळ्याचा विजय साजरा करण्यासाठी तुम्ही स्वतः या. मी त्यांना घेऊन आपल्या दर्शनासाठी येईन, असे आश्वासनही दरेकरांनी दिले.*

## श्री क्षेत्र खंडोबा वाकडी देवस्थानात एक हजार जोडप्यांनी घातले जागरण गोंधळ



प्रतिनिधी
■ शिर्डी

'येळकोट येळकोट जय मल्हार'च्या गजरात वाकडी इथल्या खंडेराय महाराज मंदिरात एक हजार नागरिकांनी जागरण गोंधळ घातला. राज्यातील हजाराच्या वर नागरिकांनी वाकडीत एकाच वेळी जागरण गोंधळ घातल्यानं वातावरण भक्तिमय झालं. अहिल्यानगर जिल्ह्याची प्रती जेजुरी समजल्या जाणाऱ्या श्री क्षेत्र खंडोबाची वाकडी इथं रामनाथ बाबा कोते ( भगत ) यांच्या पुढाकारानं सुरु झालेला खंडेरायाच्या मूर्ती प्राणप्रतिष्ठापणा वर्धापन दिन सोहळा मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. यावेळी राज्यातील अनेक नामवंत वाघ्यांनी हजेरी लावली.

भाऊबीजेच्या दिवशी पहाटे काकड आरती, भजनानंतर खंडोबा देवाला अभिषेक घातल्यानंतर "येळकोट येळकोट जय मल्हार"चा जयघोष करण्यात आला. यावेळी कोटमा भरून दत्तात्रय कोते यांच्या हस्ते भंडारा उधळण करून जागरण कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला. वाकडी पंचक्रोशीसह अहिल्यानगर, नाशिक, पुणे, छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यातील खंडोबाचे 1000 च्या वर नागरिकांच्या जोडीनं घट मांडून जागरण गोंधळ घालण्यात आला. या शिवाय या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्यातील नामवंत गायक, वाघे मंडळींनी हजेरी लावली. यावेळी शेकडो वाघे मंडळींचे ताफे आले.

दरम्यान राज्यातील अनेक वाघे मंडळींनी आपली हजेरी लावली. या कालावधीत प्रत्येक ताफ्यानं 2- 2 खंडोबाची गाणी गायली. तब्बल 6 तास खंजिरी, तुणतुणं, डफ यांच्या निनादासह खंडेरायाची स्तुती करणारी गाणी सादर करण्यात आली. घरगुती जागरण गोंधळ करण्यासाठी पाच ते दहा हजाराचा खर्च येतो.

*मुंबई : १२८व्या हॅरिस ढाल शालेय क्रिकेट स्पर्धेला सोमवारी मारिन लाईन्सच्या पारसी जिमखान्यावर प्रारंभ झाला. स्पर्धेचे उदघाटन मुंबई क्रिकेट संघटनेचे (एमसीए ) अध्यक्ष अजिंक्य नाईक यांनी टॉस उडवून केले. याप्रसंगी एमसीए अपेक्स काउन्सिल सदस्य संदीप विचारे मंगेश साटम, अंडर १६ निवड समिती अध्यक्ष ओंकार खानविलकर ,अंडर १४ निवड समिती अध्यक्ष रवी कुलकर्णी , केरसी पावरी ,माजी रणजीपटू झुल्फिकार परकार, अझीम खान आणि मान्यवर पिच क्युरेटर व एमएसएसएचे क्रिकेट सचिव नदीम मेमन हे मान्यवर या सोहळ्याला उपस्थित होते. यंदा प्रथमच या स्पर्धेत एसजी चेंडूंचा वापर केला जाणार आहे.*



# महाराष्ट्राची कबड्डी लीग पुढील वर्षी मे महिन्यात!

## सचिव बाबुराव चांदेरे यांची घोषणा

प्रतिनिधी
■ मुंबई

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या विद्यमाने पुढील वर्षी मे महिन्यात महाराष्ट्राची कबड्डी लीग घेण्यात येणार आहे, अशी माहिती राज्य कबड्डी संघटनेचे सचिव बाबुराव चांदेरे यांनी दिली.

पुणे बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलात शनिवार, दि. २३ ऑक्टोंबर रोजी झालेल्या कार्यकारी मंडळाच्या सभेत या विषयावर धोरणात्मक चर्चा करून मंजुरी घेण्यात आली. याबाबत चांदेरे यांनी सांगितले की, "लीगकरिता पुरुष आणि महिलांचे असे एकूण १६ संघ तयार करण्यात येतील. यासाठी खेळाडूंची लिलाव प्रक्रिया राबवण्यात येईल. राज्यातील प्रो कबड्डी लीग खेळलेल्या खेळाडूंचाही या लीगमध्ये समावेश असेल. इतर राज्यातील (बाहेरील राज्यातील) एका खेळाडूस प्रत्येक संघात स्थान देण्यात येईल. राज्यातील पुणे आणि मुंबई या दोन शहरांत ही स्पर्धा घेण्यात येईल. स्पर्धा साधारणत: पुढील वर्षाच्या मे महिन्यात घेण्याचा संघटनेचा मानस आहे. लीगचे नियम आणि अटी लवकरच निश्चित करण्यात येणार आहेत."

चांदेरे पुढे म्हणाले की, "यापुढे खाजगी संस्थांना कबड्डी लीग घेण्यासाठी राज्यात परवानगी देण्यात येणार नाही."

# भारताला आत्मपरीक्षण करणे गरजेचे - सचिन तेंडुलकर

## मायदेशात खरे तर ३-० ने विजय मिळवायला हवा होता

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबईत खेळल्या गेलेल्या तिसऱ्या कसोटी सामन्यात न्यूझीलंडने भारताचा 25 धावांनी पराभव केला. या विजयासह न्यूझीलंडने कसोटी मालिकेत भारताचा 3-0 असा क्लीन स्वीप करून इतिहास रचला. अखेरच्या डावात भारताला विजयासाठी 147 धावांचे लक्ष्य होते. रोहित शर्माचा संघ केवळ 121 धावांवर ऑलआऊट झाला.मुंबई कसोटीच्या पहिल्या डावात न्यूझीलंडने 235 धावा केल्या होत्या. दुसऱ्या डावात 174 धावा केल्या. प्रत्युत्तरात भारताने पहिल्या डावात 263 धावा केल्या. दुसऱ्या डावात संपूर्ण संघ 121 धावांवर आटोपला.



या पराभवानंतर सचिन तेंडुलकरने भारतीय संघाला आत्मपरीक्षण करण्याचा सल्ला दिला आहे. त्याचवेळी भारताचा माजी अष्टपैलू खेळाडू इरफान पठाण म्हणाला, घरच्या मैदानावर टीम इंडियाची ही लाजिरवाणी कामगिरी आहे.

'मास्टर-ब्लास्टर' सचिन तेंडुलकरने सामन्यानंतर ट्विट केले, 'घरच्या मैदानावर ३-० ने हरणे खूप कठीण आहे, आणि आत्मपरीक्षण आवश्यक आहे. हा तयारीचा अभाव होता का, खराब शॉटची निवड होती की सामन्यापूर्वी सरावाचा अभाव होता? हि गोष्ट बारकाईने पाहायला हवी.खरे तर मायदेशातील मालिका ३-० ने जिंकणे हा यजमान संघासाठी सर्वोत्तम निकाल ठरला असता असे ' ब्लास्टर - मास्टर' तेंडुलकर म्हणाला. भारताचा माजी फलंदाज वसीम जाफर म्हणाला, या कामगिरीसाठी न्यूझीलंडचे पुरेसे कौतुक केले जाऊ शकत नाही. न्यूझीलंड क्रिकेट इतिहासातील सर्वात मोठा क्षण. किवी संघाने भारताला प्रत्येक डावात हरवून विजय मिळवला. ते सर्व प्रशंसा आणि सन्मानाला पात्र आहेत.

> *'घरच्या मैदानावर टीम इंडियाची ही लाजिरवाणी कामगिरी आहे. निर्णय घेणाऱ्यांनी याचा खूप विचार करायला हवा. या उत्कृष्ट कामगिरीबद्दल न्यूझीलंडचे अभिनंदन.'*
> ***- इरफान पठाण ,माजी अष्टपैलू क्रिकेटपटू***

# टीम इंडिया द. आफ्रिकेविरुद्धच्या टी-20 मालिकेसाठी सज्ज

## ८ नोव्हेंबरपासून रंगणार ५ सामन्यांची झटपट मालिका

वृत्तसंस्था
■ नवी दिल्ली

भारतीय संघाने नुकतीच न्यूझीलंडविरुद्ध कसोटी मालिका खेळली. या मालिकेत टीम इंडियाची खूपच निराशाजनक कामगिरी पाहायला मिळाली. या मालिकेत न्यूझीलंडने टीम इंडियाचा ३-० असा पराभव केला आहे. या पराभवामुळे भारतीय संघाला जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या गुणतालिकेतही मोठे नुकसान झाले आहे. यादरम्यान आता टीम इंडिया पुढील मालिकेसाठी सज्ज झाली आहे. भारतीय संघ दक्षिण आफ्रिकेविरूद्ध चार सामन्यांची टी-२० मालिका खेळणार आहे.

भारत वि दक्षिण आफ्रिकेतील टी-२० मालिका ८ नोव्हेंबरपासून खेळवली जाणार आहे. या मालिकेसाठी भारतीय संघही दक्षिण आफ्रिकेत पोहोचला आहे. या मालिकेतील पहिला सामना ८ नोव्हेंबर रोजी किंग्समीड, डर्बन येथे होणार आहे. मालिकेतील दुसरा सामना १० नोव्हेंबर रोजी सेंट जॉर्ज पार्क, गकेबरहा येथे होणार आहे. तिसरा सामना १३ नोव्हेंबर रोजी सेंच्युरियन येथील सुपरस्पोर्ट पार्क येथे होणार आहे. शेवटचा सामना १५ नोव्हेंबरला जोहान्सबर्ग येथे होणार आहे.

टीम इंडियाने यावर्षी टी-२० विश्वचषक २०२४ मध्ये दक्षिण आफ्रिकेला अंतिम फेरीत पराभूत करत विजेतेपद पटकावले. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात टीम इंडियाचा विक्रम खूपच अटीतटीचा आहे. दोन्ही संघांमध्ये आतापर्यंत एकूण २७ टी-२० सामने खेळवले गेले आहेत. ज्यामध्ये टीम इंडियाने १५ सामने जिंकले आहेत, तर दक्षिण आफ्रिकेने ११ सामने जिंकले आहेत. दोन्ही संघांमधील केवळ एका सामन्याचा निकाल जाहीर होऊ शकला नाही. पण एकंदरीत पाहिल्यास टीम इंडिया कायमचं एक पाऊल पुढे राहिली आहे. या मालिकेत टीम इंडियाचे कर्णधारपद सूर्यकुमार यादवकडे आहे. तर दक्षिण आफ्रिकेचे कर्णधारपद एडन माक्ररमकडे आहे.

| भारत वि दक्षिण आफ्रिका टी-२० मालिकेचे वेळापत्रक | | | |
|---|---|---|---|
| ८ नोव्हेंबर | पहिला सामना | डरबन | रात्री ८ वा |
| १० नोव्हेंबर | दुसरा सामना | गकेबेहरा | रात्री ८ वा |
| ३ नोव्हेंबर | तिसरा सामना | सेंच्युरियन | रात्री ८ वा |
| १५ नोव्हेंबर | चौथा सामना | जोहान्सबर्ग | रात्री ८ वा |

***उभय संघ असे असतील***

***भारत :*** *सूर्यकुमार यादव (कर्णधार), अभिषेक शर्मा, संजू सॅमसन (यष्टीरक्षक), रिंकू सिंग, तिलक वर्मा, जितेश शर्मा (यष्टीरक्षक), हार्दिक पंड्या, अक्षर पटेल, रमणदीप सिंग, वरुण चक्रवर्ती, रवी बिश्नोई, अर्शदीप सिंग, विजयकुमार वैशाक, आवेश खान, यश दयाल.*

***दक्षिण आफ्रिका :****एडन मार्कर्म (कर्णधार), ओटनील बार्टमन, गेराल्ड कोएत्झी, डोनोव्हन फरेरा, रीझा हेंड्रिक्स, मार्को जॅन्सन, हेनरिक क्लासेन, पॅट्रिक क्रुगर, केशव महाराज, डेव्हिड मिलर, मिहलाली मॅपोंगवाना, नकाबा पीटर, रायन रिकेल्टन, एंडिले सिमलेन, लूथो सिम्पाला, ट्रिस्टन स्टब्स*

# पराग शाह यांच्या मध्यवर्ती कार्यालयाचे उदघाटन आशिष शेलार यांच्या हस्ते संपन्न

प्रतिनिधी
■ मुंबई

घाटकोपर पूर्व विधानसभा मतदारसंघातील भारतीय जनता पार्टी महायुतीचे उमेदवार पराग शाह यांच्या मध्यवर्ती निवडणूक कार्यालयाचे उदघाटन मुंबई अध्यक्ष ॲड आशिष शेलार यांच्या हस्ते संपन्न. भाजप उमेदवार पराग शाह यांच्या घाटकोपर पूर्व च्या 60 फूट रोड, आराध्य वन पार्क येथील मध्यवर्ती निवडणूक कार्यालयाचे उदघाटन झाले.



याप्रसंगी यावेळी महायुती माजी खासदार मनोज कोटक, किरीट सोमय्या, प्रवक्ता भालचंद्र शिरसाठ, शिवसेना विभाग प्रमुख परमेश्वर कदम, राष्ट्रवादी काँग्रेसचे शिवाजीराव नलावडे, आरपीआय साळवी, मंडल अध्यक्ष रवी पुंज, धर्मेश गिरी आदिसह मोठ्या संख्येने भाजप व महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी आशिष शेलार म्हणाले की कार्यालयाचे उदघाटन जरी आज निवडणूक निमित्त झाले असले तरी सतत लोकांच्या सेवेत उपलब्ध असलेले शाह यांच्यासाठी प्रचाराची सुरुवात आहे. त्यांच्या सेवाभावी वृत्ती मुळे त्याचा विजय दुपटीने होईल ही जमेची बाजू आहे, येथे महायुतीचे वारे दिसत असून सर्व जागा महायुतीचे जिंकेल अशी अशा व्यक्त करतो.

शाह यांची उमेदवारी जरी शेवटी जाहीर झाली असली तरी निवडणूक विजय निकाल प्रथम पराग शाह यांचाच लागेल.पराग शाह म्हणाले की मी इतके वचन देतो की पुढील 5 वर्षात उर्वरित सर्व काम मी पूर्ण करणार आहे.

# टीम इंडियाचा यष्टीरक्षक रिद्धिमान साहाची निवृत्ती

## यंदाचा रणजी हंगाम शेवटचा

वृत्तसंस्था
■ कोलकाता

भारतीय यष्टीरक्षक-फलंदाज रिद्धिमान साहाने क्रिकेटच्या सर्व फॉरमॅटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. ४० वर्षीय साहा गेल्या ३ वर्षांपासून संघाबाहेर आहे. त्याने शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना २०२१ मध्ये न्यूझीलंडविरुद्ध वानखेडेवर खेळला.

सोशल मीडिया प्लॅटफॉर्म X वर तो म्हणाला की सध्याचा रणजी करंडक हंगाम ही त्याची शेवटची स्पर्धा असेल. क्रिकेटमधील शानदार प्रवासाबद्दल त्याने बंगाल क्रिकेटचे आभार मानले आहेत.



वृद्धिमान साहाने भारतासाठी ४० कसोटी खेळल्या आहेत. ज्यामध्ये 29.41 च्या सरासरीने 1,353 धावा केल्या आहेत. साहाने कसोटी क्रिकेटमध्ये ३ शतके आणि ६ अर्धशतकेही केली आहेत. तो त्याच्या यष्टिरक्षण कौशल्यासाठी ओळखला जातो.

एमएस धोनीच्या निवृत्तीनंतर साहा कसोटी क्रिकेटमध्ये भारताचा यष्टिरक्षक फलंदाज होता. कसोटीत भारतीय यष्टीरक्षकांनी झळकावलेल्या शतकांच्या बाबतीत साहा धोनी आणि ऋषभ पंतनंतर तिसऱ्या स्थानावर आहे.

> *''क्रिकेटमधील संस्मरणीय प्रवासानंतर हा रणजी हंगाम माझा शेवटचा असेल. शेवटी बंगालचे प्रतिनिधीत्व केल्याचा मला सन्मान वाटतो. निवृत्तीपूर्वी फक्त रणजी ट्रॉफी खेळणार आहे.'*
> ***- रिद्धिमान साहा , टीम इंडियाचा यष्टीरक्षक***

# बेस्ट कर्मचाऱ्यांनाही मिळणार बोनस पण निवडणूक आयोगाची मान्यता मिळाल्यानंतर

प्रतिनिधी
■ मुंबई

ऐन दिवाळीत २५ हजार बेस्ट कामगार, कर्मचारी व अधिकाऱ्यांना पालिका कर्मचाऱ्यांसोबत सानुग्रह अनुदान मिळाले नाही.त्याचे पडसाद बेस्ट मध्ये चांगलेच उमटले. बेस्ट कर्मचाऱ्यांनी बेस्ट च्या महाव्यवस्थापकांचा व पालिका आयुक्तांचाही निषेध केला. ३ व ४ नोव्हेंबर रोजी कर्मचाऱ्यांनी सामूहिक रजा आंदोलन केले. एकीकडे ही रस्त्यावरची लढाई सुरू असताना बेस्ट कामगार सेनेचे अध्यक्ष सुहास सामंत हे प्रशासनाशी बोनस बाबत चर्चा करण्यासाठी त्यांना भेटत होते. अखेर पालिका आयुक्तांनी बेस्ट ला काल ८० कोटी रुपये कर्मचाऱ्यांना बोनस देण्यासाठी दिले आहेत. पण आचारसंहितेची आडकाठी मध्ये आली आहे. त्यासाठी निवडणूक आयोगाची परवानगी घेण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे सुहास सामंत यांनी सांगितले.

काल बेस्ट समिती सभगृहात बोनस संदर्भात बेस्ट प्रशासानासोबत बैठक झाली त्यावेळी बेस्ट मधील सर्व युनियनचे नेते उपस्थित होते. यावेळी महाव्यवस्थापकांनी पालिकेकडून पैसे मिळाल्याची माहिती देण्यात आली. बेस्टच्या सर्वच कर्मचारी वर्गास दिवाळी बोनस मिळावा म्हणून करण्यात आलेल्या प्रयत्नांना मोठे यश आले आहे.



महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी आज तत्काळ बेस्टच्या खात्यात रू.८० करोड ऑनलाईन पैसे पाठवले असून सद्या निवडणूक आचारसंहिता असल्याने बेस्टचे महाव्यवस्थापक अनिल डिग्गीकर यांनी निवडणूक आयोगाची परवानगी घेऊन पुढील दोन दिवसात बेस्टच्या सर्वच कर्मचारी वर्गाच्या खात्यात बोनसचे पैसे जमा होतील असे आश्वासन दिले असल्याचे सुहास सामंत यांनी सांगितले. महापालिका आयुक्त भूषण गगराणी ,बेस्टचे महाव्यवस्थापक अनिल डिग्गीकर ,बेस्ट कृती समिती मधील सहकारी नितीन भाऊराव पाटील, रंगनाथ सातवसे हेही यावेळी उपस्थित होते.

# भगतसिंगनगरमधील दूषित पाणीपुरवठ्याबाबत नागरिकांची सहाय्यक आयुक्तांशी चर्चा

प्रतिनिधी
■ मुंबई

दिवाळीमधील अभ्यंगस्नानच्याच दिवशी भगतसिंग नगर एकच्या क्रांती चाळीमध्ये दूषित पाणी येत असल्यामुळे नागरिकांनी आंघोळच केली नाही. तसेच सदर ठिकाणाबरोबरच लक्ष्मी नगरमध्ये अपुरा पाणीपुरवठा येत असल्यामुळे स्थानिक नागरिक संतप्त झाले होते. याबाबत स्थानिक नागरिकांबरोबर सामाजिक कार्यकर्त्या माधवी राणे, गौरव राणे यांनी पी दक्षिण विभागाच्या सहाय्यक आयुक्तांशी चर्चा केली. या चर्चेदरम्यान तात्काळ संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना बोलावून पाणी समस्या निकाली काढण्याचे निर्देश दिले. तसेच भगतसिंगनगर, लक्ष्मीनगरमधील दूषित व अपुऱ्या पाणीपुरवठ्याबाबत दोन ते तीन दिवसात पाईपलाईनची साफसफाई व इतर सर्व कामे करण्यात येतील, असे आश्वासन सहायक आयुक्तांनी दिले.



गोरेगाव पश्चिम येथील प्रभाग क्रमांक 57 च्या भगतसिंग एक, दोन, लक्ष्मी नगरमध्ये गेल्या अनेक वर्षापासून अपुरा पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. परंतु ऐन दिवाळीच्या दिवशी सदर परिसरातील नागरिकांना दुर्गंधीयुक्त घाण पाणी नळाद्वारे आले. या पाण्याने अंघोळ केल्यामुळे महिला व लहान मुलांना अंगावर सफेद डाग आले आहेत. तसेच एक मुलगा हॉस्पिटलमध्ये ॲडमिट आहे. याबाबत स्थानिक नागरिकांनी माधवी राणे यांना सांगीतले. सदर मूलभूत समस्या नागरिकांच्या आरोग्याशी निगडित असल्यामुळे राणे यांनी स्थानिक नागरिकांसह काल तात्काळ सहाय्यक आयुक्त संजय जाधव यांच्याशी चर्चा केली. या चर्चेदरम्यान अपुरा व दूषित पाणी पुरवठ्याबाबत स्थानिक नागरिक संतप्त झाले होते. तात्काळ जाधव यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना बोलवून पाणी समस्या सोडवण्याचे निर्देश दिले. त्यामुळे स्थानिक नागरिकांनी माधवी राणे, गौरव राणे यांच्यासह संजय जाधव यांचे आभार मानले. दरम्यान, नियमितपणे आम्ही पाण्याचे बिल भरत असूनसुद्धा आम्हाला पाणी अपुरे मिळत आहे. अनेक ठिकाणी चोरीचे कनेक्शन घेऊन पाणी चोरी केले जात आहे. तसेच संबंधित विभागाचे कर्मचारी राजकीय दबावाखाली येवून आमच्या परिसरात कमी दाबाने पाणीपुरवठा करीत आहेत, असा आरोपही स्थानिक नागरिकांनी केला.

# बोनस बेस्ट कामगारांच्या खात्यात जमा होणार

## कामगार नेते गजानन नागे यांच्या प्रयत्नांना यश



प्रतिनिधी
■ मुंबई

भाजपा बेस्ट कामगार संघ* सरचिटणीस गजानन देविदास नागे यांनी काल बेस्ट महाव्यवस्थापक यांच्यासोबत दिवाळी बोनस बद्दल चर्चा केली असता महाव्यवस्थापकाने कामगारांना दिवाळी बोनस सानुग्रह अनुदान 29 हजार रुपये व कोविड भत्त्याची रक्कम देखील कामगारांच्या खात्यामध्ये जमा करण्याचे आश्वासन दिले आहे त्याकरिता येत्या दोन दिवसांमध्ये निवडणूक आयोगाकडे शिफारस करून व त्यांची मंजुरी घेऊन कामगारांच्या खात्यामध्ये बोनस व कोविड भत्ता जमा करण्यात येईल असे आश्वासन बेस्ट महाव्यवस्थापक यांनी दिले आहे.

भाजपा बेस्ट कामगार संघ सरचिटणीस गजानन नागे साहेब यांनी दिलेला आव्हानाला कर्मचाऱ्यांनीदिनांक 3 नोव्हेंबर 2024 रोजी भाऊबीज सण आपल्या कुटुंबासोबत साजरे करण्याचा निर्णय कामगारांनी घेतला व सामूहिक रजा घेतली कामगारांच्या एकीला यश आलेu आहे व कामगारांच्या या निर्णयामुळे बेस्ट प्रशासन सुद्धा हादरले आहे.

भाजपा बेस्ट कामगार संघाने केलेल्या प्रयत्नांना आज यश आले आहे. सर्व कामगारांकडून भाजपा बेस्ट कामगार संघाचे सरचिटणीस गजानन देविदास नागे यांचे आभार मानण्यात आले. यावेळी धारावी आहे अध्यक्ष श्री. पृथ्वीराज जाधव कार्याध्यक्ष श्री. मुकेश इगवे, संतोष काटकर, अनिल यादव, आनंद जरक, श्रीकांत गलांडे, सुनील राठोड, दिलीप चव्हाण, सर्व पदाधिकारी कार्यकर्ते आणि मान्यवर मंडळी मीटिंगमध्ये उपस्थित होते.

*मुंबई : आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांच्या १७९ साव्या जयंतीनिमित्त धोबीतलाव मेट्रो सिनेमासमोरील क्रांतीवीरांच्या अर्धपुतळ्याला त्यांचे नववे वंशज राज सराफ यांनी पुष्पहार घातला ,यावेळी आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके स्मारक समितीचे कार्यवाह जयेंद्र सराफ ,उपकार्याध्यक्ष श्रीराम देवधर गुरूजी ,सहकार्यवाह उज्ज्वला सराफ , सुप्रिया पोवळे ,विजय पोवळे , विजय फडके ,मनिष हळदणकर आणि पालिका 'ए 'विभाग पालिका विभागाच्या उद्यान विभागाचे अधिकारी प्रविण म्हावळे ,कर्मचारी मेन्टेंनन्स विभागाचे कर्मचारी उपस्थित होते .*



# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शिवसेना उमेदवार दिलीप लांडे यांच्या मध्यवर्ती कार्यालयाचे उदघाटन संपन्न

प्रतिनिधी
■ मुंबई

१६८- चांदिवली विधानसभा मतदार संघ शिवसेना, भाजपा, राष्ट्रवादी, आर.पी.आय. महायुतीचे उमेदवार दिलीप लांडे यांच्या निवडणूक मध्यवर्ती कार्यालय भव्य उद्‌द्धाटन सोहळा रविवार दिनांक ३ नोव्हेंबर रोजी मुख्यमंत्री, मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. हॉटेल पेनीनसुला समोर, ९० फिट रोड, साकीनाका येथील कार्यालयाचे शानदार उदघाटन मुख्यमंत्र्यांनी केले.

याप्रसंगी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले की आपले लाडके उमेदवार दिलीप लांडे यांच्या कार्यालयाचे शुभारंभ आज माझ्या हस्ते झाले आहे. लांडेनी प्रचाराचा नारळ फोडला आहे आता तुम्हाला चौकार चटकर छटकर मारायची जबाबदारी घ्यायची आहे. सर्व जातीधर्माच्या लोकांसाठी मामा काम करतात ना मग त्यांना 20 तारखेला निवडून द्या मामा पुढेही तुमच्यासाठी काम करणार आहेत. लाडकी बहीण योजने बाबत विरोधी पक्ष कोर्टात गेली आहे या सावत्र भावाचं सरकार येऊ देणार नाही मला माझ्या बहिणींना लखपती होताना पहायचं आहे.



सर्व जाती धर्माच्या बहिणींना कोणी मदत केली. मामा पुन्हा एकदा निवडून येतील, यावेळी आमदार दिलीप लांडे यांनी सांगितले की या कार्यालयातून मतदारसंघातील प्रचाराची संपूर्ण यात्रणा कामाला लागणार आहे. येथे सर्व पक्षाचे प्रमुख पदाधिकारी नेते उपस्थित राहणार आहेत.

या कार्यालय उदघाटन प्रसंगी शिवसेना विधानसभा प्रमुख अशोक माटेकर, भाजपा चांदिवली मंडल अध्यक्ष प्रकाश मोरे, आरपीआय चे दादासाहेब भोसले, युवा सेना कार्यकारणी सदस्य प्रयाग लांडे, निवडणूक समन्वयक शुभ्राशु दीक्षित, प्रणव लांडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी महायुतीचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संग्राहक, स्तंभलेखक मकरंद करंदीकरांनी जमवलेल्या प्राचीन दिव्यांचे शनिवारी प्रदर्शन

प्रतिनिधी
■ मुंबई

दैनिक वृत्तमानसमध्ये विविध विषयांवर आणि प्राचीन वस्तूंच्या संग्रहावर लिखाण करणारे स्तंभलेखक मकरंद करंदीकर यांनी जमवलेल्या प्राचीन आणि ऐतिहासिक दिव्यांचे प्रदर्शन आणि माहिती उपक्रम त्रिपुरारी पौर्णिमेचे औचित्य साधून शनिवार. ९ नोव्हेंबर २०२४ संध्याकाळी ५ वाजता माहीम सार्वजनिक वाचनालय (दूरध्वनी : ०२२ २४४६३४७३) येथे आयोजित करण्यात येणार आहे.

आपण सहसा न बघितलेल्या, वेगळयाच धाटणीच्या, वैशिष्ट्यपूर्ण,अद्भुत दिव्यांचे प्रदर्शन आणि त्या संबंधी रसपूर्ण माहिती; तसेच ते जमवताना आलेले अनुभव, मजेशीर किस्से करंदीकर याप्रसंगी सांगणार आहेत.

मकरंद करंदीकर हे १५०० पेक्षा जास्त दिवे, तेल ठेवण्याची विविध भांडी, पानाचे डबे, अडकित्ते, लेखण्या, जुने बैठे खेळ, गंजिफा, सोंगट्या, पट, फासे, वैचित्र्यपूर्ण कुलपे, संगीत वाद्यांच्या लहान प्रतिकृती इ. वस्तूंचे संग्राहक आहेत. पण जागेच्या मर्यादेमुळे माहीम येथील प्रदर्शनात निवडक विशेष दिवेच मांडण्यात येणार आहेत. या प्रदर्शनाबाबतच्या अधिक तपशीलासाठी इच्छुकांनी ०२२ ६२५१३२८० भ्रमणध्वनी : ९३२१३०५०१३ वर संपर्क साधावा.

## इंडोनेशियामध्ये ज्वालामुखीचा उद्रेक, 10 जणांचा मृत्यू

**जकार्ता:** इंडोनेशियाच्या पूर्वेकडील फ्लोरेस बेटावरील माउंट लिओटोबी लाकी-लाकी ज्वालामुखी येथे सोमवारी झालेल्या उद्रेकात 10 जणांचा मृत्यू झाला, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. न्यूयॉर्क टाइम्सच्या वृत्तानुसार, रविवारी (3 नोव्हेंबर) सुमारे 24 मिनिटे ज्वालामुखीचा स्फोट झाला. यानंतर, रात्रभर त्याचा अनेक वेळा स्फोट झाला आणि सकाळी 6 वाजण्याच्या सुमारास राखेचा ढग 300 मीटर उंचीवर येताना दिसले. ज्वालामुखीच्या उद्रेकामुळे डझनभर भूकंपही झाले. सध्या इंडोनेशिया सरकारने आणखी धक्के बसण्याची भीती व्यक्त केली आहे. ज्वालामुखीच्या उद्रेकामुळे 7 गावांमध्ये राहणाऱ्या 10 हजार लोकांचे नुकसान झाले आहे. यावेळी अनेक घरेही जळून खाक झाली. लोकांनी सांगितले की, स्फोटानंतर आगीचे गोळे घरांवर पडल्यासारखे वाटत होते. लोक घर सोडून इकडे तिकडे धावू लागले. प्रशासनाने लोकांना ज्वालामुखीच्या 7 किलोमीटरच्या त्रिज्येपासून दूर राहण्याचा सल्ला दिला आहे.



# 'अदानी पॉवर'चा बांगलादेशला वीज खंडित करण्याचा इशारा

## मोहम्मद युनूस सरकार थकीत वीज बिल भरणार?

वृत्तसंस्था
ढाका

बांगलादेशाकडे अदानी पॉवरचे वीज बिल मोठ्या प्रमाणात थकले आहे. त्यामुळे हे थकीत वीज बिल भरण्यासाठी अदानी पॉवरकडून बांगलादेशाला चार दिवसांची मुदत देण्यात आली होती. थकीत वीज बिलाचे पैसे न दिल्यास अदानी पॉवर बांगलादेशाची वीज खंडित करण्याचा इशारा कंपनीकडून देण्यात आला आहे. बांगलादेशाला थकीत वीज बिल भरण्यासाठी चार दिवसांचा वेळ देण्यात आला आहे.

दरम्यान, अदानी पॉवर झारखंड लिमिटेड या कंपनीचे तब्बल ८४.६ दशलक्ष डॉलर्सचे बिल थकल्यामुळे बांगलादेशाला करण्यात येणारा वीजपुरवठा निम्म्याने कमी केला होता. एवढेच नव्हे तर ३० नोव्हेंबरपर्यंत थकबाकी न भरल्यास वीजपुरवठा पूर्णपणे बंद करण्यात येणार असल्याचा इशारा कंपनीकडून देण्यात आला होता. मात्र, अदानी पॉवर झारखंड लिमिटेड कंपनीच्या इशाऱ्यानंतर बांगलादेशाने तातडीने पावलं उचलत हे थकीत वीज बिल भरण्यासाठी पावलं उचलली आहेत. यासंदर्भातील वृत्त मनी कंट्रोलने दिलं आहे.



अदानी पॉवरचे बांगलादेशाकडे मोठ्या प्रमाणात वीज बिल थकल्यानंतर अदानी पॉवरकडून बांगलादेशावर दबाव आणण्यात सुरुवात करण्यात आली आहे. यासंदर्भात बांगलादेशाला तातडीने हे थकीत वीज बिल लवकरात लवकर भरण्यासाठी सांगत चार दिवसांची मुदत दिली होती. तसेच बांगलादेशाला पुरवण्यात येणाऱ्या एकूण वीजपुरवठ्यात निम्म्याने घट केली होती. त्यामुळे लोकांना देखील मोठ्या समस्याला समोरं जावं लागत असल्याने आता बांगलादेश सरकारकडून तातडीने हे बिल भरण्यास सुरुवात करण्यात येणार असल्याची माहिती सांगण्यात येत आहे.

बांगलादेश सध्या वीजेच्या संकटाचा सामना करत आहे. त्यामुळे याचे अनेक दुष्परिणाम बांगलादेशाच्या अर्थव्यवस्थेवरही होऊ शकतात. भारतातून १,६०० मेगावॅट गोड्डा प्लांटमधून ढाक्याला वीज निर्यात करणाऱ्या अदानी पॉवरने वीजनिर्मितीसाठी आवश्यक असलेल्या कोळशाच्या आयातीतील आव्हानांना तोंड देत थकबाकी मिळविण्याची अंतिम मुदत बांगलादेशाला निश्चित केली आहे.

गौतम अदानी यांच्या मालकीच्या कंपनीने या महिन्यात बांगलादेशाला करण्यात येणारा वीजपुरवठा सुमारे १,४०० मेगावॅटवरून ७०० ते ८०० मेगावॅटपर्यंत कमी केला असल्याची माहिती बांगलादेश पॉवर डेव्हलपमेंट बोर्डाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने रॉयटर्सला सांगितल्याचं वृत्तात म्हटलं आहे.

# जम्मू-काश्मीर विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनात गदारोळ



## PDPच्या आमदाराने 370 हटवण्याचा प्रस्ताव मांडला, भाजपने विरोध केला

वृत्तसंस्था
श्रीनगर

जम्मू-काश्मीरमधील विधानसभेच्या अधिवेशनाचा पहिला दिवस सोमवारी गदारोळात सुरू झाला. खरं तर, पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टी (पीडीपी) आमदार वाहिद पारा यांनी ऑगस्ट 2019 मध्ये कलम 370 रद्द करण्याच्या विरोधात एक प्रस्ताव मांडला होता. याच्या निषेधार्थ भाजप आमदारांनी सभागृहात गदारोळ केला. काही आमदारही वेलमध्ये पोहोचले.

यावर अध्यक्ष रहीम अब्दुल राथेर यांनी असा कोणताही प्रस्ताव अद्याप स्वीकारलेला नसल्याचे सांगितले. मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला म्हणाले, '370 वर सभागृहात चर्चा कशी होईल? हा निर्णय कोणत्याही एका सदस्याकडून घेतला जाणार नाही. आज आणलेल्या प्रस्तावाला महत्त्व नाही. यामागे काही हेतू असेल तर पीडीपीच्या आमदारांनी आधी आमच्याशी चर्चा केली असती.

अब्दुल्ला म्हणाले, भाजपकडून कलम 370 बहाल करण्याची अपेक्षा करणे मूर्खपणाचे आहे. आम्हाला माहिती होते की 370 वर प्रस्ताव येणार आहे. केंद्र सरकारने 5 ऑगस्ट 2019 रोजी घेतलेला निर्णय जम्मू-काश्मीरमधील जनतेला मान्य नाही हे वास्तव आहे. तो मान्य केला असता तर आज निकाल वेगळा लागला असता.

प्रोटेम स्पीकर मुबारक गुल यांनी स्पीकर रादर यांना स्पीकरच्या खुर्चीवर बसण्यासाठी आमंत्रित केले. सीएम उमर यांनी राथेर यांचे अभिनंदन केले. या गोंधळापूर्वी नॅशनल कॉन्फरन्सचे ज्येष्ठ आमदार अब्दुल रहीम राथेर यांची अध्यक्षपदासाठी निवड करण्यात आली आहे. प्रोटेम स्पीकर मुबारक गुल यांनी राथेर यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला, तोही मंजूर झाला.

रादर हे सातव्यांदा आमदार झाले आहेत आणि केंद्रशासित प्रदेशातील पहिल्या विधानसभेतील ते सर्वात वयस्कर आमदार आहेत. रविवारी सीएम ओमर अब्दुल्ला यांनी विधिमंडळ पक्षाची बैठक बोलावली होती, ज्यामध्ये रादर यांना स्पीकर बनवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या बैठकीला काँग्रेस, माकप, आम आदमी पक्ष आणि अपक्ष आमदारांनी हजेरी लावली होती.

पान ९ वरुन

### रशियाने केला मदतीचा हात पुढे

सुखोई-७५ हे अमेरिकेच्या F-३५ स्टेल्थ फायटर जेटला उत्तर मानले जाते. सुखोई-७५ हे फायटर जेट प्रगत एव्हीओनिक्स आणि एआयने सुसज्ज आहे. या एका विमानाची किंमत सुमारे ३० ते ३५ दशलक्ष डॉलर्स आहे. हे अमेरिकन एफ-३५ (८२.५ दशलक्ष) च्या निम्म्याहून कमी आहे. रशिया आणि भारत यांच्यात जर हा करार होतो तर दोन्ही देशांमधील संबंध अधिक दृढ होतील. पाश्चिमात्य देशांनी रशियावर निर्बंध टाकले आहे. त्यामुळे रशियाच्या अर्थव्यवस्थेला मोठा धक्का बसत आहे. पण जर भारताने ही डील केली तर रशियाच्या अर्थव्यवस्थेला मदत मिळणार आहे. यासोबतच भारत देखील या विमानाची निर्यात करून पैसा कमवू शकेल, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. रशियाने अनेक दशकांपासून भारताला मिग ते सुखोई अशी अनेक लढाऊ विमाने पुरवली आहेत. सुखोई 2025 मध्ये होणाऱ्या एरो इंडिया २०२५ प्रदर्शनात आपले SU-75 सादर करणार आहे. सूत्रांचे म्हणणे आहे की रशिया भारताला हे अत्याधुनिक विमान आपल्या देशात बनवण्याची ऑफर देणार आहे. ज्यामुळे भारत ते इतर देशांना देखील विकू शकेल. रशिया आपला जवळचा मित्र चीन याची पर्वा न करता भारताला ही ऑफर देत आहे.

### मनोज जरांगेंची निवडणुकीतून माघार

माझ्याकडे रात्री साडेतीन वाजता उमेदवारांची यादी होती. मात्र, मित्र पक्षांनी त्यांची यादी पाठवली नसल्याचे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे. त्यामुळे एका जातीवर कसे लढणार? यामुळेच निवडणुकीतून माघार घेत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. महाविकास आघाडी असो की, महायुती असो, दोन्ही कडचे नेते हे सारखेच आहेत. त्यामुळे कोणाला पाठिंबा देत नाही किंवा कोणालाही निवडून आणा, असे देखील म्हणत नाही. केवळ माझे आंदोलन सुरू राहणार असल्याचे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे. मात्र माझ्या आंदोलनात मला कोणी डिवचले तर मी त्याला सोडणार नसल्याचे जरांगे पाटील यांनी म्हटले आहे. ही माझी माघार नसून हा गनिमी कावा असल्याचा दावा मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. मराठा समाजाच्या माध्यमातून मराठा समाजाच्या ज्या इच्छुकांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घ्यावा, असे आवाहन जरांगे पाटील यांनी म्हटले आहे. आपण कोणत्याही उमेदवाराला पाठिंबा देणार नसल्याचे त्यांनी म्हटले आहे.

# दिल्लीत फटाके का फोडले ? बंदी का नाही

## सरकार-पोलिसांनी आठवडाभरात उत्तर द्यावे-कोर्टाचा सवाल

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

दिवाळीच्या काळात दिल्लीत न्यायालयाच्या आदेशांचे उल्लंघन केल्याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली सरकार आणि पोलिसांना फटकारले आहे. स्वत:हून कारवाई करत न्यायालयाने म्हटले की, राज्यात फटाक्यांवर बंदी क्वचितच लागू केली जाऊ शकते. पुढील वर्षी दिवाळीत फटाक्यांवर बंदी घालणाऱ्या आदेशांचे उल्लंघन होऊ नये, यासाठी काहीतरी केले पाहिजे, असे न्यायालयाने म्हटले आहे.



मीडिया रिपोर्ट्सचा हवाला देत, न्यायमूर्ती अभय एस ओका आणि न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज मसिह यांच्या खंडपीठाने सांगितले की, बंदीचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कॅम्पस सील करण्यासारख्या कठोर कारवाईची गरज आहे.

या प्रकरणाबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली सरकार आणि पोलिस आयुक्तांकडून फटाक्यांवर बंदी लागू करण्यासाठी काय पावले उचलली आहेत यावर आठवडाभरात उत्तर मागितले आहे. पुढील सुनावणी 14 नोव्हेंबरला होणार आहे.

1 नोव्हेंबरच्या सकाळी, दिल्लीत AQI 300 पेक्षा जास्त नोंदवले गेले, ज्यापासून मुक्त होण्यासाठी अँटी स्मॉग गन सोडण्यात आल्या. पंजाब-हरियाणाकडूनही परालीबाबत उत्तर मागितले सुनावणीदरम्यान ॲमिकस क्युरी म्हणाले की, दिवाळीच्या काळात शेतात आग लागण्याच्या घटना मोठ्या प्रमाणात होतात. दिवाळीच्या एक दिवस आधी 160 शेतांना आग लागली होती, तर दिवाळीच्या दिवशी ही संख्या 605 वर पोहोचली. प्रदूषणाची टक्केवारी 10 वरून 30 पर्यंत वाढली होती.

खंडपीठाने पंजाब आणि हरियाणा सरकारांना ऑक्टोबरच्या शेवटच्या 10 दिवसांमध्ये शेतांना आग लागणे आणि शेतातील पराली जाळण्याच्या घटनांमध्ये वाढ झाल्याबद्दल 14 नोव्हेंबरपर्यंत उत्तर दाखल करण्यास सांगितले आहे.

कोर्टाने असेही म्हटले आहे की, दिल्ली सरकार प्रतिज्ञापत्र दाखल करताना हे देखील सांगेल की राज्याच्या हद्दीत शेतात आग लागण्याच्या घटना घडल्या आहेत का.

## लाईव्ह सामन्यादरम्यान कोसळली वीज; एका खेळाडूचा मृत्यू

पेरु

क्रीडा विश्वातून एक दु:खद घटना समोर आली आहे. या घटनेने चाहत्यांना आणि क्रीडाप्रेमींना मोठा धक्का बसलाय. एका फुटबॉल सामन्यादरम्यान मैदानावर अचानक वीज कोसळली. या वीजेमुळे एका खेळाडूचा जागीच मृत्यू झाला, तर रेफ्रीसह अनेक खेळाडू गंभीर जखमी झाले आहेत.

ही दु:खद घटना 3 नोव्हेंबर रोजी पेरू देशात घडली आहे. पेरूच्या चिलाका येथे जुव्हेंटुड बेलाविस्ता आणि फॅमिलिया चोका, या दोन देशांतर्गत क्लबमध्ये सामना सुरू होता. यावेळी ही दुर्दैवी घटना घडली. या घटनेतील गंभीर जखमी खेळाडू आणि रेफ्री यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

सामना सुरू असताना ही घटना घडली. तोपर्यंत जुव्हेंटुड बेलाविस्ताने सामन्यात 2-0 अशी आघाडी घेतली होती. यादरम्यान हवामान अधिकच बिघडले, ज्यामुळे रेफ्रींनी शिट्टी वाजवून खेळ थांबवला. तसेच खेळाडूंना मैदान सोडण्यास सांगितले. यावेळी, अचानक विजेचा कडकडाट झाला अन् ही वीज 39 वर्षीय जोस ह्यूगो डे ला क्रूझ मेसा याच्यावर पडली. या घटनेत तो जागीच मरण पावला, तर रेफ्रीसह 5 खेळाडू जमिनीवर कोसळून गंभीर जखमी झाले.

## अल्पवयीन मुलाने आपल्याच घरात केली ४० लाखांची चोरी

रांची

उत्तराखंडच्या गोपेश्वर येथे राहणाऱ्या चंपा गैरोला या आपल्या मुलीला भेटण्यासाठी डेहराडूनला गेल्या होत्या. त्या जेव्हा आपल्या घरी परतल्या. तेव्हा त्यांना असता घराचा दरवाजा तुटलेला दिसला. तसेच सासूच्या खोलीतील लॉकर तोडून त्यात ठेवलेले मौल्यवान दागिने गायब असल्यातचं दिसलं. अंदाजे ३५ ते ४० लाख किमतीचे दागिने चोरीला गेले होते.

चंपा यांनी लगेचच या घटनेची माहिती पोलिसांना दिली असून पोलिसांनी अज्ञातांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. चमोलीचे पोलीस अधीक्षक सर्वेश पनवार यांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन चोरट्यांना पकडण्यासाठीचे आवश्यक निर्देश दिले. यानंतर पोलिसांची पथकं तयार करण्यात आली. या प्रकरणाच्या मूळापर्यंत जाण्यासाठी चमोलीचे पोलीस उपअधीक्षक संजय गरब्याल यांनी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची कसून तपासणी केली असून तांत्रिक पथकाचीही मदत घेण्यात आली आहे. सीसीटीव्ही फुटेज आणि टेक्निकट टीमच्या मदतीने पोलिसांनी या घटनेत सहभागी असलेल्या दोन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतलं.

## कारमध्ये अडकलेल्या 4 मुलांचा मृत्यू

### कारमध्ये खेळत होती मुले

वृत्तसंस्था
अमरेली

गुजरातच्या अमरेलीमध्ये हृदयाला पिळवटून टाकणारी घटना घडली आहे. कारमध्ये अडकून एकाच कुटुंबातील चार चिमुकल्या मुलांचा मृत्यू झाला आहे. अमरेलीतील रंधिया गावात रविवारी(दि.3) दुपारी ही दुर्दैवी घटना घडली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळ गाठून चारही मुलांचे मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवले. अमरेलीचे पोलीस उपायुक्त चिराग देसाई यांनी दिलेल्या माहितीनुसार, सध्या दुर्घटनेच्या कलमांतर्गत हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, या दुर्घटनेचे खरे कारण शोधण्यासाठी पोलीस सर्व बाजूंनी या प्रकरणाचा तपास करत आहेत.

चिराग देसाई यांनी दिलेल्या माहितीनुसार, मुलांचे पालक मध्य प्रदेशातील शेतमजूर असून, कामासाठी गुजरातमध्ये राहतात. रविवारी भरत मंदानी हा शेतमालक मुलांच्या पालकांना सोबत घेऊन शेतात कामाला गेला. शेतात जात असताना भरत मंदानी यांनी त्यांची कार शेतमजूरांच्या घराबाहेर उभी केली होती. आई-वडील आणि शेतमालक निघून गेल्यावर सर्व मुले गाडीत घुसली आणि खेळू लागली. यादरम्यान अचानक कारचा दरवाजा बंद झाला आणि गेट लॉक झाले. मुलांना गेट कसे उघडायचे किंवा काच खाली कशी करायची, याची माहिती नव्हती. काही वेळातच गाडीच्या आत ऑक्सिजनची कमतरता निर्माण झाली आणि त्यामुळे मुलांचा गुदमरायला लागला. मुलांनी गाडीतून बाहेर पडण्याचा खूप प्रयत्न केला, पण बाहेरून कोणीही त्यांच्याकडे लक्ष दिले नाही. वेळेत मदत न मिळाल्याने या मुलांचा गुदमरुन मृत्यू झाला. सायंकाळी कार मालक व या मुलांचे पालक शेतातून घरी परतले असता कारमध्ये मुलांचे मृतदेह आढळून आले. या चार मुलांचे वय दोन ते सात वर्षांच्या दरम्यान आहे.

## मित्रांसोबत लावलेल्या पैजेमुळे गेला तरुणाचा जीव

**बंगळुरु ।** कर्नाटकच्या बंगळुरूमधून धक्कादायक बातमी समोर आली आहे. फटाके फोडताना काही तरुणांच्या पैजेमुळे एका तरुणाचा मृत्यू झाला. याप्रकरणी पोलिसांनी सहा जणांना अटक केली आहे. आरोपींनी तरुणासोबत पैज लावत त्याला फटाक्यांवर बसण्यास सांगितले होते. मात्र फटाक्याच्या स्फोटानंतर तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. हा सगळा धक्कादायक प्रकार एका सीसीटीव्हीमध्ये कैद झाला असून त्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. ही घटना ३१ ऑक्टोबर रोजी बंगळुरुच्या कोननकुंटे पोलीस ठाण्यांतर्गत विव्हर्स कॉलनी येथे घडली होती. फटाके फोडताना शबरिश नावाचा तरुण गंभीर जखमी झाला होता. त्यावेळी घडलेला सर्व प्रकार सीसीटीव्हीत कैद झाला होता. या घटनेनंतर शबरिश याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र २ नोव्हेंबर रोजी त्याचा मृत्यू झाला.

## मी निर्दोष आहे, मला फसवण्यात आलं

### आरोपी संजय रॉयने सरकारवर केला गंभीर आरोप

वृत्तसंस्था
कोलकाता



कोलकाता येथील आरजी कर मेडिकल कॉलेजमध्ये झालेल्या डॉक्टर बलात्कार-हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी संजय रॉय याने पहिल्यांदाच कोर्टात कॅमेऱ्यासमोर आपला जबाब नोंदवला आहे. यावेळी त्याने आपण पूर्णपणे निर्दोष असल्याचं सांगितलं. तसेच त्याने हा गुन्हा केलेला नाही आणि त्याला यामध्ये अडकवण्यात आलं असल्याचं म्हटलं आहे.

मुख्य आरोपी संजय रॉय याने कोर्टात दिलेल्या माहितीनुसार, "मी बलात्कार आणि हत्या केलेली नाही. मी निर्दोष आहे. मला फसवण्यात आलं आहे. सरकारने मला फसवलं आहे. त्यांनी मला गप्प राहण्याची धमकी दिली आहे. माझ्या विभागाने (कोलकाता पोलिसांनी) मला धमकी दिली आहे." ११ नोव्हेंबरपासून कोर्ट आता या प्रकरणाची दररोज सुनावणी सुरू करणार आहे.


सीबीआयने आपल्या आरोपपत्रात संजय रॉयला गुन्हेगार ठरवलं आहे. यासोबतच हा सामूहिक बलात्कार नसल्याचं देखील सांगितलं. संजय रॉयनेच हा गुन्हा केला आहे. सीबीआयने दावा केला आहे की, सीएफएसएल रिपोर्टमध्ये वीर्य हे संजय रॉयचं असल्याची पुष्टी झाली आहे.

## कॅनडातील हिंदू सभा मंदिरावर खलिस्तानींचा हल्ला

### भाविकांना मारहाण, ट्रूडो म्हणाले, हिंसाचार स्वीकार्य नाही

वृत्तसंस्था
ओटावा

कॅनडातील ब्रॅम्प्टनमध्ये रविवारी हिंदू सभा मंदिरात आलेल्या लोकांवर खलिस्तानी समर्थकांनी हल्ला केला. हल्लेखोरांच्या हातात खलिस्तानी झेंडे होते. त्यांनी मंदिरात उपस्थित लोकांवर लाठ्या-काठ्यांनी हल्ला केला. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.



या घटनेचा कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रूडो यांनी निषेध केला आहे. ते सोशल मीडियावर म्हणाले, ब्रॅम्प्टन येथील हिंदू सभा मंदिरात आज झालेला हिंसाचार स्वीकारता येणार नाही. प्रत्येक कॅनेडियनला मुक्तपणे आणि सुरक्षितपणे त्यांच्या धर्माचे पालन करण्याचा अधिकार आहे. कॅनडाचे विरोधी पक्षनेते पियरे पॉइलीव्हरे म्हणाले की असे हल्ले पूर्णपणे अस्वीकार्य आहेत. सर्व कॅनेडियन लोकांनी त्यांच्या धर्माचे शांततेत पालन करावे.

या घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण आहे. मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. पील प्रादेशिक पोलिस प्रमुख निशान दुराईप्पा यांनी जनतेला संयम बाळगण्याचे आवाहन केले आहे. हिंसा आणि गुन्हेगारी खपवून घेतली जाणार नाही, असे ते म्हणाले.

हल्ल्यावर कोण काय म्हणाले ब्रॅम्प्टनचे महापौर पॅट्रिक ब्राउन कॅनडामध्ये धार्मिक स्वातंत्र्य हे मूलभूत मूल्य आहे. प्रत्येकाला आपापल्या प्रार्थनास्थळी सुरक्षित वाटले पाहिजे. प्रार्थनास्थळाबाहेर कोणत्याही प्रकारच्या हिंसाचाराचा मी तीव्र निषेध करतो. शांतता राखण्यासाठी आणि हिंसाचार करणाऱ्यांना जबाबदार धरण्यासाठी पोलिस त्यांच्या सामर्थ्याने सर्वकाही करतील. नेपियन खासदार चंद्र आर्य खलिस्तानी अतिरेक्यांनी सीमा ओलांडली आहे, हे कॅनडातील निर्लज्ज हिंसक अतिरेक्यांच्या उदयाचे प्रतिबिंब आहे. खलिस्तानींनी मंदिरातील भाविकांवर केलेला हल्ला कॅनडामध्ये किती खोलवर अतिरेकी झाला आहे हे दिसून येते.

खासदार म्हणाले की, खलिस्तानी अतिरेक्यांना भाषण स्वातंत्र्याखाली मोकळा हात मिळाला आहे. हिंदू-कॅनेडियन लोकांनी स्वत:चे संरक्षण करण्यासाठी आणि त्यांच्या हक्कांसाठी लढण्यासाठी पुढे आले पाहिजे. त्यांना त्यांच्या नेत्यांवर दबाव आणावा लागेल.


## स्पेनच्या राजा-राणीवर लोकांनी चिखल फेकला

### पीएम सांचेझ यांच्या गाडीवरही हल्ला, पूर रोखता न आल्याने लोक संतप्त

वृत्तसंस्था
माद्रिद

स्पेनमधील पूरग्रस्त व्हॅलेन्सिया भागात भेट देण्यासाठी गेलेल्या राजा फिलिप आणि त्यांची पत्नी राणी लेटिजिया यांच्यावर लोकांनी चिखलफेक केली. बीबीसीच्या म्हणण्यानुसार, तिथे उपस्थित लोकांनी 'किलर' आणि 'शेम ऑन यू' अशा घोषणाही दिल्या.

राजा फिलिपसोबत स्पेनचे पंतप्रधान पेड्रो सांचेझही उपस्थित होते. पूर रोखण्यासाठी नेत्यांनी अगोदर काहीच का केले नाही, असा सवाल लोक त्यांना विचारत होते.



जमावाला रोखण्यासाठी पोलिसांना पुढे यावे लागले. या हल्ल्यात तैनात असलेले दोन सुरक्षा रक्षक जखमी झाले आहेत. कपाळातून रक्त वाहत असल्याचे दिसले. यानंतर, स्पॅनिश राजा आणि पंतप्रधानांना त्यांचा दौरा अपूर्ण सोडून राजधानीत परतावे लागले. यावेळी लोकांनी पंतप्रधानांच्या गाडीवरही हल्ला केला.

चेहऱ्यावर आणि कपड्यांवर चिखल असूनही राजा आणि राणी लोकांचे सांत्वन करताना दिसत होते. महिलांशी बोलताना राणी लेटिजिया रडली.

8 तासात 1 वर्षाचा पाऊस, 50 वर्षांचा विक्रम मोडला 29 ऑक्टोबर रोजी, स्पेनच्या पूर्वेकडील शहर व्हॅलेन्सियामध्ये अवघ्या 8 तासांत वर्षभराचा पाऊस पडला. यामुळे अचानक पूर आला, त्यामुळे अनेकांना सुरक्षित ठिकाणी जाण्याची संधी मिळाली नाही. व्हॅलेन्सियाचे खासदार जुआन बॉर्डेरा म्हणाले की, राजा फिलिप यांनी पूरग्रस्त भागाला दिलेली भेट हा 'खूप वाईट निर्णय' होता. लोक खूप संतापले. याबाबत अधिकाऱ्यांनी त्यांना ताकीद दिली होती मात्र त्यांनी त्यांचे ऐकले नाही.

स्पेनमध्ये यापूर्वीचा सर्वात मोठा पूर 1973 मध्ये आला होता. त्यानंतर 150 लोकांचा मृत्यू झाला. त्याआधी 1957 मध्ये व्हॅलेन्सिया शहरात भीषण पूर आला होता, ज्यामध्ये 81 लोकांचा मृत्यू झाला होता.